

११६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३२८

# मराठी साहित्य दर्शन ७

REFBK-0011524

अनंत काणेकर

अ. वि. गृह प्रकाशन पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३०८७५ वि: विवांधी
क्रमांक ११२८ नों: दि: २२।८।५९.

अ. वि. गृह प्रकाशन

# मराठी साहित्य-दर्शन

पुष्प सातवें : प्रा. अनंत काणेकर, एम्. ए.

★

संपादन व प्रस्तावना

प्रा. पां. श्री. घारे, एम. ए.

विद्वान् सर्वत्र पूज्यते
अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणें

११५२४

मार्च ] [ १९६१

REFBK-0011524

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

★

प्रथमावृत्ति, मार्च १९६१
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

★

: मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें की, एखाद्या लेखकाचींसुद्धा असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हा अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळे तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांही नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूने मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकाने लिहिलेले शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूने आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना ही माला अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

मार्च १९६१

व्यवस्थापक,
अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

# प्रस्तावना

प्रा. अनंत काणेकर यांचें वाङमय विविध तऱ्हेचें आहे. कादम्बरी हा वाङमयप्रकार सोडून बाकी सर्व तऱ्हेचें वाङमय त्यांनीं लिहिले आहे. काव्य, लघुनिबंध, लघुकथा, नाटकें, प्रवासवर्णन, एकांकिका, रूपककथा, अग्रलेख, टीकालेख, भाषांतरित वा अनुवादित पुस्तिका इत्यादि विविध तऱ्हेचें त्यांचें वाङमय उपलब्ध आहे. या विविध तऱ्हेच्या वाङमयाखेरीज चित्र-रसग्रहण व राजकीय टीकाचित्रें याहि क्षेत्रांत त्यांनीं अलौकिक यश संपादन केले आहे. त्यांच्या या विविध वाङमय-प्रकारांतून कांहीं निवडक वाङमयाचें दर्शन वाचकांना घडावे या हेतूनें येथे उतारे, लेख, कविता इत्यादि घेण्यांत आले आहेत.

वाङमयाच्या अनेक क्षेत्रांत प्रा. काणेकर प्रसिद्ध असले तरी काणेकरांची स्मृति येतांच मनांत उभे राहतात ते काणेकर लघुनिबंधकार काणेकर होत. या लघुनिबन्धांतून आपणाला भेटणारे 'गणूकाका' हे सर्वांच्या परिचयाचे व सर्वांच्या ध्यानांत राहणारे असे आहेत. (अगदीं शाळकरी मुलांच्या सुद्धां) जुन्याचे अभिमानी म्हणून गणूकाकांचा प्रवेश लघुनिबंधांत झाला तरी त्यामुळे नव्या मताच्या अनेक बाजू समजून आल्या हा फायदाच म्हटला पाहिजे. वादविवादांत दोन्ही बाजूंचे लोक सुयोग्य असले म्हणजे वादविवादाला चांगला रंग चढतो. गणूकाकांच्या रूपानें प्रा. काणेकरांना एक चांगला भिडू मिळाला. खुद्द प्रा. काणेकर गणूकाकांविषयी म्हणतात — "मतापेक्षां माणुसकीला अधिक किंमत आहे. असं मला नेहमी वाटतं. असं आहे म्हणूनच विविध रंगरूप आणि चित्रविचित्र मतं असलेलीं माणसं मिळून आपली मानवजात बनलेली असली तरी ती अजून टिकून आहे. माझ्यासारखी मतं असलेल्या कांही लोकांपेक्षांहि प्रत्येक बाबतींत माझ्या विरुद्ध असलेले गणूकाका मला कधींच विसरत नाहीत... मतापेक्षां माणुसकीला अधिक किंमत आहे. पांडित्य, कला, विद्वत्ता ही कुठंहि दिसली कीं मोठा माणूस असें पुष्कळांना वाटतें. पण हे सर्व अंगीं असूनहि माणुसकी

नसेल तर त्याच्या मोठेपणाचा कांही उपयोग नाही... सामान्य माणसांतहि केव्हा केव्हा असामान्य माणुसकी दिसून येते. गणूकाका ही अशाच सामान्य व्यक्तींपैकीं एक आहे.--"

प्रा. अनंत काणेकरांच्या लघुनिबंधांचें वैशिष्टय सांगावयाचें झाल्यास त्यांतील विचारसंपदा हें सांगता येईल. जीवनांतील विसंगति नेमकी हेरून त्यावरचे आपले विचार आटोपशीर शब्दांत, दुसरी बाजू मांडून, व्यक्त करतात. त्यामधील कोटिक्रम, समाजांतील रूढ समजुतींच्या नेमके विरुद्ध विचार त्यांनी यांतून व्यक्त केले, ह्या गोष्टी चटकन् ध्यानांत येतात. 'दोन मेणबत्त्या' या सारख्या लघुनिबंधांतून त्यांचे मानवी जीवनासंबंधीचे तात्त्विक विचार प्रगट होतात.

प्रा. अनंत काणेकर हे एक वरच्या दर्जाचे कवि आहेत. (कित्येकांच्या मतें 'होते.') हें या संग्रहांतील कवितांवरूनहि सांगतां येईल. १९३३ सालीं त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. कवि म्हणून त्यांना कीर्ति मिळाली तत्पूर्वीच त्यांचे काव्यलेखन मंदावले होते. प्रा. अनंत काणेकर हे एखाद्या विशिष्ट संप्रदायांतील कवि आहेत असे मला वाटत नाही. तरुण माणसाच्या मनांत येणारे विविध विचार, प्रेम, ध्येय, सौंदर्यास्वाद, इ. उपरोध, विडंबन इत्यादि विविध मार्गांनी त्यांनी आपल्या काव्यांतून व्यक्त केलेले आहेत. त्यांचे कित्येक विचार अगदीं वास्तववादी आहेत. त्यांची भावगीतें सुप्रसिद्ध आहेत. कांहीं विडंबनगीतेंहि त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांच्या काव्यांतून निष्कारण हळवेपणा दिसून आला नाही तरी त्यांत गांभीर्य नाही असें म्हणतां येणार नाही. वास्तववादी दृष्टि असली तरी 'ध्येय' नाही असें म्हणतां येणार नाही.

प्रा. काणेकरांची स्वत:ची अशी रचनाशैली आहे. त्यांची शैली आशयाशीं एकरूप होते. त्यांच्या कवितेसंबंधीं श्री. रमेश तेंडुलकर लिहितात, "ह्या शैलीचें आणखी एक सौंदर्य तिच्या कमालीच्या आटोपशीरपणांत आणि शब्दांच्या मोजकेपणांत आहे; त्यामुळें पाल्हाळाला किंवा शैलीच्या प्रदर्शनाला मुळीं वावच उरत नाही ! काणेकरांचें लक्ष नेहमी त्यांना जाणवलेल्या भावप्रसंगांतील नाट्यावर किंवा नेमक्या मर्मावर खिळते आणि तितक्याच

नाटयात्मक पद्धतीनें थोडक्यांत पण चमकदार रीतीनें ते त्याचा आविष्कार करतात. त्यामुळें ती शैली विलक्षण वेगवती आणि चलाख झाली आहे. कविता कुठे सुरू करावी आणि कुठे थांबवावी ह्याची कल्पना यायला काणेकरांचीच कविता वाचली पाहिजे. "

प्रा. काणेकरांचीं नाटकें हीं अनुवादित आहेत. त्यामुळें 'नाटककार' म्हणून प्रा. काणेकर वाङ्मयाच्या क्षेत्रांत फार गाजले नाहीत. आरंभी इंग्रजी नाटकांचा अनुवाद करतांना भाषेच्या सफाईकडे त्यांचें लक्ष गेलें नाही. तथापि त्यामुळे तीं नाटकें वाचनीय नाहीत असे मात्र नाही. नाटकांचा अनुवाद करतांना मूळ लेखकाच्या प्रवृत्तीशीं अनुवाद करणारा समरस झाला तरच नाटकांचा अनुवाद सरस होणार! पण कोणत्याहि अन्य भाषेंतील नाटकाचें रूपान्तर करतांना आपोआपच कांही मर्यादा येऊन पडतात. अनुवाद ज्या प्रमाणांत स्वैर असेल त्या प्रमाणांत ही मर्यादा कमी जास्त होणार. आरंभी आरंभी प्रा. काणेकरांनी ही मर्यादा फार पाळली असावी आणि म्हणून मूळ लेखकाच्या प्रवृत्तीशीं समरस होऊनहि भाषेच्या सफाईकडे त्यांचें दुर्लक्ष झालें आणि हें त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणें मान्यहि केले आहे. 'स्वत:ला नाटककार म्हणवून घेणे मला बरोबर वाटत नाही' असे खुद्द काणेकरांनी म्हटलें आहे. [ हा व अशाच तऱ्हेचा प्रामाणिकपणा अनेक क्षेत्रांत फार दुर्मीळ आहे ! ]

नाटककार म्हणून प्रा. काणेकर प्रसिद्ध नसले तरी त्यांच्या एकांकिका –विशेषत: 'घर' ही एकांकिका–चांगल्या आहेत, सोनपरी–चांदपरी हें परीनाटय उत्तमच आहे.

प्रा. काणेकरांनी 'रुपेरी वाळू' या नांवाने रूपक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला–तो खलिल जिब्रानच्या नावाने प्रसिद्ध केला. त्यावर आलेले कांही अभिप्राय त्यांनी आपल्या 'मी महाकवि ? ' या लेखांत प्रसिद्ध केले आहेत. या रूपककथा खलिल जिब्रानच्या नाहीत, प्रा. काणेकरांच्या आहेत हें आतां सर्वांना ज्ञात झाले म्हणून त्यांची किंमत कमी होण्याचें मुळींच कारण नाही. त्यावर आलेले अभिप्राय "वास्तववादी" आहेत असे म्हटल्यास चूक होणार नाही.

प्रा. काणेकरांच्या लघुकथा, लेखसंग्रह आणि अन्य संकीर्ण वाङ्मय इतकें विपुल आहे कीं त्या सर्वांचा परामर्ष या छोटयाशा प्रस्तावनेंत घेणें कठीण आहे. लघुकथा-लेखक म्हणून काणेकर गाजले नाहीत याचें कारण अन्य क्षेत्रांत नेत्रदीपक यश त्यांनी मिळविले म्हणून या क्षेत्रांतले काणेकर फिके वाटतात. म्हणजे तुलनात्मकदृष्टीने, हें ध्यानांत ठेवायला पाहिजे. रूढ समजुतीला धक्का देणारे काणेकर या क्षेत्रांतहि आपणांस भेटतात. प्रवास-वर्णनांच्या द्वारा त्यांनी वाचकांच्या पुढे उभी केलेली अनेक चित्रें वाचकांच्या सहज ध्यानांत राहतील अशीं सुंदर आहेत.

प्रा. अनंत काणेकर यांच्या आजपर्यंतच्या प्रकाशित वाङ्मयाची यादी शेवटीं दिली आहे. अभ्यासूंना त्याचा फायदा होईल. या छोटयाशा पुस्तकांत प्रा. काणेकरांच्या शक्यतों सर्व वैशिष्टयांचा समावेश करण्याचा प्रयत्न मीं केलेला आहे. प्रा. काणेकरांचें 'साहित्य–दर्शन' या पुस्तकाच्या द्वारां वाचकांना होईल अशी मला आशा वाटते.

प्रा. अनंत काणेकर यांच्या साहित्याचें संपादन करण्याचें काम माझ्याकडे सोपविले याबद्दल अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशनाच्या व्यवस्थापकांचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणें प्रा. अनंत काणेकर यांनीहि समक्ष भेटींत बहुमोल सल्ला दिला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. 'काणेकर, व्यक्ति आणि वाङ्मय' या ग्रंथाची मला मदत झाली हें नमूद करून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों.

२० फेब्रुवारी १९६१ }

— **पां. श्री. घारे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | यथेच्छ झोपा | १ |
| २. | माझं लहानपण | ४ |
| ३. | दोन पदरी गोफ | ६ |
| ४. | सामान्यांचें असामान्यत्व | ९ |
| ५. | प्रगतीची किल्ली | १२ |
| ६. | दोन मेणबत्त्या | १५ |
| ७. | व्यवस्थितपणाचें वेड | १९ |
| ८. | निळे डोंगर तांबडी माती | २२ |
| ९. | धुक्यांतून लाल ताऱ्याकडे | २९ |
| १०. | घरकुल | ३९ |
| ११. | निशिकान्ताची नवरी | ५२ |
| १२. | कुमारिका | ६० |
| १३. | घर | ६७ |
| १४. | भाषा व मानवी जीवन | ८१ |
| १५. | प्रश्नोत्तरें | ८६ |
| १६. | ताजवा | ८७ |
| १७. | मी महाकवि ? | ८८ |
| १८. | मी 'आम्ही' होतो तेव्हां. | ९२ |
| १९. | उत्सवमूर्ति | ९६ |
| २०. | सरकार आणि साहित्यिक | १०१ |
| २१. | घंटा कोणी बांधावी ? | १०४ |
| २२. | काव्य | १०५ |

दा. क्र. ११५२४
ग्रं. : शाखा (स्थळ प्रत)
... ग्रंथालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ३०८२५ दि: ...
क्रमांक १३२५ नों. दि. २/१८/६८

१

# यथेच्छ झोपा

अनेकांना अनेक कारणांसाठी नेपोलियन आवडतो. कुणाला तो एक अद्वितीय योद्धा म्हणून आवडतो, तर कुणाला एक मोठा देशभक्त म्हणून त्याच्याविषयीं आदर वाटतो. मला मात्र तो एका निराळ्याच कारणामुळे आवडतो. नेपोलियनविषयीं असें सांगतात की, त्याला वाटेल तेव्हा वाटेल तिथे झोप येत असे. त्याची झोप हुकमी होती. रणांगणावर शत्रूशीं तुंबळ युद्ध जुंपलेलें असतांना सुद्धा तो मध्ये घोड्यावर बसल्या बसल्या पांच दहा मिनिटें झोप काढून ताजातवाना होऊं शकत असे. खरोखरच नेपोलियनचा मला हेवा वाटतो ! आणि यामुळेच तो मला फार आवडतो. योद्धे आणि वीरपुरुष, देशभक्त आणि जगज्जेते हवे तितके मिळतील; पण असा खंदा निद्रावीर कुठे मिळेल ?

नेपोलियनविषयीं मला कमालीचा आदर कां वाटतो हें जेव्हा मी गणूकाकांना सांगितलें तेव्हा क्षणभर ते स्तंभितच झाले, आणि नंतर रागाने दातओठ खात म्हणाले, " मूर्खा ! स्वत:च्या आळसावर पांघरूण घालायला एका इतिहासप्रसिद्ध पुरुषाच्या मागे लपायला पाहतोस काय ? आधीच मनुष्यमात्राचं निम्मं आयुष्य झोपेंत फुकट जातें. त्यांत दिवसा रात्री वाटेल तेव्हा झोपा काढून तूं आपलं नव्वद टक्के आयुष्य वाया घालवतोस. आणखी उरलेले दहा टक्के कांही तरी उपयुक्त किंवा चांगलं काम करीत घालविण्याऐवजीं नेपोलियनसारख्या थोर पुरुषाच्या आयुष्यांतल्या इतर सगळ्या चांगल्या गोष्टी सोडून देऊन त्याच्या झोपेचं उदाहरण डोळ्यापुढे ठेवतोस काय ? नेपोलियन वाटेल तेव्हा झोपूं शकत असे हें तुझ्या मतें त्याचें मोठेपण ! लाज नाही वाटत सांगायला तुला ?"

गणूकाकांनी शिव्यांचा कितीहि वर्षाव केला तरी मला नाही पटत त्यांचें म्हणणें. झोपेंत गेलेलें आयुष्य फुकट जातें असें मला वाटतच नाही मुळीं. उलट माझ्या मतें जागेपणांतल्या जीवनापेक्षाहि झोपेंतलें जीवन किती तरी अधिक महत्त्वाचें नी अधिक सुन्दर असतें. फार काय, पण जागेपणीं जें कधीच शक्य नाही असें सुंदर जीवन झोपेंतच जगतां येतें! झोपेंत दिसणारीं गोड आणि सर्वांगसुंदर स्वप्नें जागेपणीं तुम्हाला कधीतरी दिसतील काय? प्रत्येक मानवी अंतःकरणाची गाभ्यांत अगदी खोल दडून राहिलेली एखादी तरी अशक्य कोटींतील--वेडगळपणाची पण अत्यंत प्रिय अशी इच्छा असते. जागृत जीवनांत या इच्छेची पूर्तता तर दूरच राहो; पण ती नुसती बाहेर बोलून दाखविली, तरीसुद्धां लोक तुम्हांला वेड्यांत काढतील. या असल्या वेड्याबगड्या इच्छांच्या सफलतेचा लोकोत्तर आनंद स्वप्नसृष्टींत नेऊन सोडणाऱ्या झोपेंतच तुम्हाला मिळेल.

इतरांच्या अशा काय इच्छा असतील कुणाला ठाऊक, पण सर्वजण मला हसतील याची पूर्ण जाणीव असूनहि माझ्या एका असल्याच वेड्या इच्छेचें उदाहरण मला सांगितल्याशिवाय रहावत नाही. लहानपणापासून ही इच्छा माझ्या मनांत दबा धरून बसलेली असे आणि अजूनहि ती तिथे जशीच्या तशी आहे. या इच्छेच्या पूर्ततेचा अवर्णनीय आनंद मीं अनेक वेळां झोपेंत चाखला आहे; आणि पुढेहि अनेक वेळां चाखीन अशी आशा आहे हें स्वप्न गेल्या कित्येक वर्षांत मीं पुन्हा पुन्हा पाहिलें आहे,—किंवा अधिक समर्पक भाषेंत बोलायचें म्हणजे हें स्वप्न मी 'जगलों' आहें. पक्ष्यासारखें आपणाला उडतां यावें, अशी तीव्र इच्छा लहानपणापासून माझ्या मनांत आहे! विमानांत बसून किंवा यंत्राच्या सहायाने वर उडण्यांत मला विशेष मजा नाही वाटत. आपल्या बाहूंत आणि पायांत विजेसारखी कांहीतरी अद्भुत शक्ति स्फुरित व्हावी आणि स्वतःच्या जोरावर मन मानेल तसें हवेंत तरंगत फिरावें, ही माझी खरी इच्छा.

लहानपणीं तर अरबी भाषेंतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी किंवा पुराणांतले मारुतीचे पराक्रम वाचलें, की मला विलक्षण उत्साह आणि आशा वाटे. घरांतलीं माणसें बाहेर गेलीं आहेत, असें पाहून किती तरी वेळां दारें बंद करून घेऊन मी सुपांची जोडी किंवा फाटक्या चादरीचे

तुकडे दोऱ्यांच्या सहाय्याने हातांना आणि पायांना बांधले आहेत, आणि खांदे दुखून येईपर्यंत फडफड करून वर उडण्याचा प्रयत्न केला आहे! अलीकडे तसा प्रयत्न मीं केला नाही; पण स्वप्नांत मात्र माझा हा प्रयत्न संपूर्ण यशस्वी झाला आहे! एक अफाट, क्षितिजापर्यंत पसरलेलें सपाट मैदान मला स्वप्नांत दिसतें. त्या मैदानांत एखाद्या शर्यतींत धावावें त्याप्रमाणें मीं धावायला सुरवात करतों. धावतां धावतां एकदम माझे दोन्ही पाय जमिनीपासून उचलले जातात, आणि मग झालेंच. कमरेवर हात ठेवून वाटेल तसा, वाटेल त्या वेगाने मी तरंगत पुढे जाऊं शकतों. झोपाळ्यावर बसून झोके घेतांना ज्याप्रमाणें आपण जमिनीवर जोराने पाय दाबतों म्हणजे झोका उंच जातो त्याप्रमाणेंच हवेंत जितक्या जोराने पाय दाबावे तितक्या अधिक वेगानें मी पुढे जातों! हें स्वप्न अनेक वेळां मीं पाहिलें आहे, किंवा अधिक खरें बोलायचें म्हणजे अगदी वास्तवपणें हें स्वप्न मी अनेक वेळां 'जगलों' आहें. इतक्या खरेपणाने जगलों आहें, की स्वप्नांतून जागा झाल्यानंतर सुद्धा एक क्षण दोन क्षण त्या अद्‌भुत अनुभवाची गोड भिरभिरी माझ्या पायांत भिरभिरत राहिली. आणि आता आपण क्षणापूर्वी जें सहजपणें केलें तें जागेपणीं कां करतां येऊं नये, अशी वेडी आशा माझ्या मनांत कैक वेळां डोकावून गेली आहे.

इहलोकांत ज्यांची भेट आपणाला पुन्हा कधीच होणार नाही अशा आपणाला सोडून गेलेल्या प्रियजनांची कांही क्षणांपुरती का होईना पण जवळजवळ जिवंत भेट एक काय ती झोपेंतली स्वप्नसृष्टीच करूं जाणें. जगाच्या दुःखांतून सुटून जाण्याकरितां मृत्यु हा एकच उपाय आहे, असें कांही लोक सांगतात. त्यांना मी सांगेन की बाबांनो, हा शेवटचा उपाय अमलांत आणण्यापूर्वी दुसरा एक उपाय करून पहा. मृत्यूचे सर्व फायदे ज्यांत आहेत, पण तोटा मात्र एकहि नाही अशी एक गोष्ट जगांत आहे; ती म्हणजे झोप!

गणूकाका आणि त्यांच्यासारखे इतर शहाणे लोक डोळ्याला डोळा लागूं न देतां अहर्निश काम करूं द्यात आणि नावलौकिक, मोठेपणा मिळवूं द्यात. मी मात्र मिळेल तेव्हा आणि मिळेल तेथे उशींत डोकें खुपसणार आणि शक्य तितकें झोपून घेणार!

● ● ●

२

# माझं लहानपण

विचारलं म्हणून सहज आठवलेल्या लहानपणच्या दोन आठवणी सांगतों–

शास्त्रीय शोधासंबंधीचें लेख लहानपणीं मीं अगदी अधाशासारखे वाचीत असें. विजेच्या दिव्याचा शोध, वाफेच्या यंत्राचा शोध, ग्रामोफोनचा शोध, रेडियमचा शोध, हेलियमचा शोध यांचीं सुरस वर्णनें वाचतांना मला अतिशय आनंद व्हायचा. आपणहि कुणी तरी मोठा शास्त्री संशोधक व्हावं अशी तीव्र इच्छा मला व्हायची. एकदा कुठं तरी वाचलं की दत्त किंवा अशाच कांहीतरी नांवाच्या एका वीस वर्षांच्या बंगाली मुलाने खाणींत उत्पन्न होणाऱ्या एका विशिष्ट वायूचा शोध लावला, आणि जगांतल्या मोठमोठ्या शास्त्रज्ञांनी त्याचें त्याबद्दल कौतुक केलें. एवढा लहान मुलगाहि शोध लावूं शकतो, हें वाचल्यापासून तर मला अगदी चैनच पडेना. त्यावेळीं मी तेरा-चौदा वर्षांचा असेन. आतां पांच-सहा वर्षांत कांही तरी केलंच पाहिजे. काय करावं तें मला सुचेना. शेवटीं बी.एससी. चा अभ्यास करणारा एक कॉलेजचा विद्यार्थी माझ्या ओळखीचा झाला होता. त्याला भीत भीत मीं विचारलं "काय हो, अजून शोध लागायचे आहेत तरी कसले कसले? एक दोन-चार नांवं सांगून टाका बघूं मला!"

'कां बुवा?' त्यानं विचारलं.

'मला कांही तरी शोध लावायचाय्' मीं गंभीरपणें उत्तर दिलें. तो पोट धरून हसूं लागला.

'अरे जो शोध लागायाचा आहे त्याचं नांव मी तुला कसं सांगूं?' तो म्हणाला. माझा उत्साह जागच्या जागींच थंडावला.

वर्तमानपत्रांतील कांही विशेष समजत नसलं तरी मिळेल तें

वर्तमानपत्र लहानपणीं वाचण्याचा मला खूप नाद होता. त्या वेळचं मुख्य वर्तमानपत्र म्हणजे अर्थात् केसरी. आम्ही ज्या चाळींत गिरगांवांत रहात होतों तिथले आमचे एक शेजारी नेमाने केसरी घ्यायचे, आणि तो मी अगदी नेमाने वाचायचा. त्यावेळीं १९१४–१८ चें पहिलें महायुद्ध चालू होतें. 'केसरींत' नकाशासह महायुद्धावर मोठमोठे लेख यायचे. ते वाचतांना मला मोठी मौज वाटायची. त्या चाळींत एक चहाचें हॉटेल होतें, आणि मला 'केसरी' वाचतांना पाहून त्या हॉटेलमधले नोकर मला लढाईच्या बातम्या विचारायचे. मोठ्या उत्साहाने तिखटमीठ लावून युद्धाच्या बातम्या त्यांना मी सांगत असें. मला ते भलताच विद्वान समजायचे आणि मलाहि अधिक चेव यायचा. एकदा माझ्या विद्वत्तेने त्यांना मीं गार करून टाकलें. परवाच्या युद्धाप्रमाणेंच त्यावेळेलाहि जर्मनांचा विजय झाला कीं हिंदुस्थानांतल्या लोकांच्या मनांत आनंदाच्या उकळ्या फुटायच्या. ब्रिटिशांचा द्वेष प्रत्येकाच्या रोमरोमांत भिनलेला होताच.

'जर्मनीचा या युद्धांत नक्की विजय होणार' एके दिवशीं हॉटेलमधल्या माझ्या दोस्तांना मी छाती पुढं काढून सांगितलें.

'तें कसें काय बाबू ?' ते विचारते झाले.

'अरे असं पहा' केसरींत आलेला फरान्स-जर्मनीचा नकाशा दाखवीत त्यांना मी सांगूं लागलों, हा जर्मनी वर आहे, फरान्स त्याच्या खाली आहे, आहे की नाही ?'

नकाशांतल्या वर असलेल्या जर्मनीकडे आणि खाली असलेल्या फरान्सकडे पहात ते 'हो' म्हणाले.

'मग अेवढी साधी गोष्ट तुम्हाला समजत नाही !' मी म्हणालों, 'अरे जर्मनीने वरून तोफांचा भडिमार केल्यावर विचारा फरान्स खालून वर तोफा कशा काय चालवणार ?'

'अरे हो, खरंच ! असं म्हणून चहा, चिवडा, शेव, भजीं, शंकरपाळ्यांत वावरणारे माझे ते मित्र नितांत आदरानें माझ्याकडे पाहूं लागले.

त्यांचे भोळेभाबडे चेहरे मला अजून आठवतात.

• • •

२

# दोन पदरी गोफ

गणूकाकांच्या त्या प्रश्नाना उत्तरें देणें खरोखरच कठीण होतें. मी म्हणत होतों की, इतिहासाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत अडखळत कां होईना, पण जगाची सारखी प्रगति होते आहे–जग सुधारत आहे. गणूकाकांच्या मतें जगाची सारखी परागति होते आहे–जग दिवसेंदिवस वाईट होत आहे. आणि माझ्या युक्तिवादाला त्यांनी दिलेलीं उत्तरेंहि समर्पक होतीं. मी म्हणालों, ज्या वेळीं क्षुधाशमनासारखी मामुली गोष्ट करण्यासाठी मानवप्राणी दिवसरात्र हिंस्त्र श्वापदांशीं झुंज करून चार कंदमुळें मिळवीत होता, झाडांच्या सालींनी आपल्या अब्रूचें रक्षण करीत होता आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याकरितां कित्येक दिवस पायांनी रखडत होता, त्यावेळच्या माणसापेक्षा वाटेल तेव्हा वाटेल तिथे बसून चहाकॉफी पिणारा, तलम रेशमी वस्त्र परिधान करणारा आणि हजारों मैलांचें अंतर हां हां म्हणतां ओलांडून जाणारा आजचा मानव अधिक पुढे गेलेला–सुधारलेला–तुम्हाला वाटत नाही काय ? इतकं असूनहि जग दिवसेंदिवस मागे जात आहे–वाईट होत आहे, असंच तुम्हाला वाटतं ?"

माझें म्हणणें पुरें करूं देण्याइतकासुद्धां गणूकाकांना धीर नव्हता. मी थांबलों मात्र, आणि गणूकाकांनी आपली सरवत्ती सुरू केली, "तुझं म्हणणं सगळं ठीक आहे," ते म्हणाले, "पण सर्व प्रगतीचा–सुधारणेचा हेतु काय ? माणसाचं सुख हाच ना ? तुझ्या सुधारणेबरोबर माणसांची दुःखेंहि शतपटीने वाढली आहेत. पूर्वी आगगाड्या आणि मोटारी नव्हत्या, पण त्यामुळे माणूस अधिक सुखी होता. तुमच्या मोटारींनी तुम्ही हां हां म्हणतां इकडून तिकडे जातां खरे; पण तुझ्या मुंबई शहरांतच रोज शेकडों माणसें मोटारखालीं सापडून मरतात ! पूर्वीचीं माणसें कंदमुळावर भूक

भागवीत होतीं आणि वल्कलांनी अब्रु झाकीत होती हे खरं आहे, पण चहा आणि कॉफी यथेच्छ नंतर अमक्याचें फ्रुट-सॉल्ट आणि तमक्याच्या लिव्हर-पिल्स घेत डॉक्टरांचे उंबरठे झिजविणाऱ्या तुम्हां लोकांपेक्षा ती सुखी होती खास !"

सुखाचीच कसोटी सुधारणेला लावायची–आणि तीच लावणें योग्य आहे–तर काकांच्या या भडिमाराने मी थोडा वेळ सर्द झालों हें कबूल केलेंच पाहिजे, पण थोडा वेळच. तेव्हा मोटारी आणि यांत्रिक सुधारणा नसल्यामुळें अपघात होत नव्हते आणि म्हणून त्या वेळचे लोक सुखी होते, आणि आज यांत्रिक सुधारणेच्या काळांत शेंकडो लोक हरघडीं मोटरखाली सापडले जाऊन चिरडले जातात म्हणून आजचे लोक दुःखी आहेत, हें म्हणणें, प्रतिपक्षाला क्षणभर निरुत्तर करून टाकणारें असलें, तरी नुसत्या गणिती हिशोबाने सुद्धा ते अजिबात फोल आहे हें दाखवून देतां येईल. फार काय पण त्या वेळच्या सुखदुःखांचीं वजाबाकी करून उरलेल्या सुखा-पेक्षा आजच्या सुखांतून दुःख वजा जातां उरलेलं सुख कदाचित काकणभर अधिक भरेल, हेंहि सिद्ध करणें कठीण नाही. त्या वेळी मोटारीचे अपघात नव्हते, पण हिंस्त्रश्वापदांनीं गजबजलेल्या मार्गांनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातांना किंवा नुसती रोजची भूक भागविण्याकरिता भयंकर जंगलांतून कंदमुळें धुंढाळतांना किती माणसें मृत्युमुखीं पडत होतीं ! आणि कंदमुळांवर राहिल्यामुळें त्यांना लिव्हर-पिल्स किंवा फ्रुटसॉल्टची जरुरी भासत नसेल; पण जर का एखादी विकृति शरीरांत उद्‌भवली तर योग्य औषधांच्या किंवा शस्त्रक्रियेच्या अभावीं किती लोक असह्य वेदनांनी व्याकुळ होत प्राण सोडीत असतील ?

गणूकाकांना गप्प करायला हा आकडेवारी हिशेब खूप झाला; पण माझें स्वतःचेंच त्याने तितकेसें समाधान होत नाही. टोपलींतल्या आंब्या-प्रमाणें किंवा गोणींतल्या तांदळप्रमाणें सुख दुःखाचे मोजमाप थोडेंच करतां येतें ? मग उगाच वजाबाक्या करण्यांत अर्थ काय ? मानवी सुधारणेच्या इतिहासांत सुखाबरोबर दुःखाची वाढ झाली हें कबूल; पण गणूकाकांसारख्यांचें तोंड बंद करायचें म्हणजे, त्यांच्या म्हणण्याचा अर्थ खरा आहे असें धरून चालल्यास त्यापासून अनर्थ कसा होतो हे

दाखवून देऊन सुखाबरोबर दुःखे वाढलीं म्हणून सुधारणेला जर कुधारणा म्हणून हसायचें, किंवा प्रगतीची परागति म्हणून हेटाळणी करावयाची; तर डोंगरमाथ्यावरून उषःकाल पहाणाऱ्या माणसाचीं खालीं पायथ्याकडे काळोखांत उभ्या राहिलेल्या माणसाने कींव करायला हरकत नाही! तो मनुष्य अभिमानाने म्हणूं शकेल, कीं 'या डोंगरमाथ्यावरल्या माणसाचा पाय घसरला तर खाली कोसळून त्याला किती भयंकर मृत्यु येण्याचा संभव आहे! मला तसली कांहीच भीति नाही—मी खंबीर जमिनीवर उभा आहें!' किंवा क्लिओपात्रारख्या त्रैलोक्य सुंदरीच्या प्रेमाचीं माधुरी चाखून भग्नहृदय झालेल्या सीझरसारख्या पुरुषश्रेष्ठाला एखादा सामान्य कारकून सुद्धा छाती फुगवून सांगू शकेल की 'मी किती सुखी आहें पहा! तुझ्यासारखी तळमळत आणि तडफडत मला माहित सुद्धा नाही कारण प्रेम आणि प्रणय असल्या भानगडींत मीं कधींच पडलों नाही.' आणि याच हिशेबाने माणसापेक्षां दगड अत्यंत सुखी ठरेल—कारण त्याला भूक नाही की तहान नाही रोग नाही कीं राई नाही, ताणाताण नाही की कसली यातायात नाही, कसला लढा नाही की झगडा नाही!

सुखाच्या कल्पना करतांना आम्ही विसरतों तें हेंच. कीं जीवन म्हणजें झगडा. जीवन म्हणजे कांही सारखी लांबत जाणारीं एकपदरी माळ नव्हे,—जीवन म्हणजे परस्पर विरुद्ध प्रवृत्तींचा ना आदि ना अंत, असा दोन पदरी गोफ! प्रगत जीवन मोठें जीवन म्हणजे लढा—तीव्र झगडा मोठ्या लढ्यांत जखमा मोठ्याच होणार पण या लढ्यांतील विजयहि मोठा. आणि त्या विजयाचें सुखहि मोठेच नव्हे काय? पूर्वीच्या मानवापेक्षा आम्हां आजच्या मानवांना मोठ्या दुःखांशीं लढण्याचा मोठा मान मिळाला आहे. झालें तर. हीच आमची प्रगति!

● ● ●

४

# सामान्यांचें असामान्यत्व

कांही कांही लोकांची संगत मी तास तास, दोन दोन तास कशी सहन करूं शकतों, याचें माझ्या एका हुशार आणि बुद्धिमान मित्राला आश्चर्य वाटतें. परवा तर त्यानें तसें स्पष्ट बोलून दाखविलें. निळचा काळचा शाईच्या पुड्या विकून उदरनिर्वाह चालविणारा एक माणूस माझ्या ओळखीचा आहे. तो केव्हा केव्हा माझ्याकडे येऊन गप्पा मारीत बसतो. परवा सकाळीं असाच तो माझ्याकडे तासभर बसला होता. माझ्या शेजारीं राहणारा माझ्या हुशार आणि बुद्धिमान मित्र तो असताना दोनतीनदा माझ्या खोलींतून डोकावून गेला. तो शाईवाला निघून गेल्यावर तो आंत आला आणि मोठ्यांदा हसून म्हणाला, "कमाल आहे बुवा तुझी ! या शाईवाल्याच्या गप्पासुद्धा तूं तास तास कशा सहन करूं शकतोस, तें मला समजत नाही. भिडस्तपणाला कांही मर्यादा असाव्या. तो आला की त्याला तूं तावडतोब घालवून कां देत नाहींस ?"

"दारावर आलेल्या माणसाला तडकाफडकी घालवून देण्याचें शौर्य तुम्हा लोकांत आहे, याबदल मला तुमचा हेवा वाटतो" मी म्हणालों, "आणि माझ्यांत तितकें शौर्य नाही, हें मी कबूल करतों पण केवळ भिडस्तपणामुळे या लोकांना मी जवळ करतों, असं मात्र तूं समजूं न ेस. केव्हा केव्हा हुशार आणि बुद्धिमान माणसाच्या संगतीपेक्षा या सामान्य लोकांचा सहवासच मला मनापासून आवडतो !"

या उत्तरानें माझ्या मित्राची विशेषशी खात्री पटली नाही; पण तो गप्प बसला, हें मात्र खरें. माझ्या या भिडस्तापणाकडे किंवा सामान्य माणसाविषयीं मला वाटणाऱ्या आपलेपणाकडे माझा हा मित्र निदान सहानुभतीच्या दृष्टीने तरी पहातो; पण माझ्या ओळखीचे दुसरे एक

अतिहुशार गृहस्थ त्यांचा माझ्यावर निराळाच आरोप आहे. त्यांच्या मतें निर्बुद्ध सामान्य लोकांचा घोळका मी माझ्या भोवती जमवितों, याचें कारण हे लोक माझे चाहते किंवा स्तुतिपाठक असतात, आणि त्यांच्यामुळे माझी अनायासें जाहिरातहि होते ! त्याशिवाय स्वतःचीं स्तुतिस्तोत्रेंहि ऐकण्याचा आनंद मिळतो तो वेगळाच ! हे गृहस्थ एक प्रथितयश लेखक आहेत, आणि राजहंस ज्याप्रमाणें फक्त मोत्याच्या चाऱ्यावर जगतो त्याप्रमाणें हे गृहस्थ आपला फुरसतीचा वेळ बहुधा आपल्यासारख्याच निवडक बुद्धिवंतांच्या संगतींत काव्यशास्त्र-विनोद करीत घालवीत असावेत--सामान्यांच्या वाऱ्यालासुद्धा ते उभे रहात नसावेत ! त्याचप्रमाणें यांच्या स्तुतीचा कुणी चुकून जरी शब्द उच्चारला तर ते कानांत घट्ट दट्टे घालीत असावेत. या थोर माणसांची बरोबरी करण्याची मला मुळीच महत्त्वाकांक्षा नाही. स्वतःची स्तुति ऐकली की सर्वसाधारण माणसाच्या अंतःकरणाला गुदगुल्या होतात आणि मलाहि माझी कुणी स्तुति केली की आवडते, हें मी कबूल करतों. उपरोक्त महात्म्यांना सुद्धा स्वतःची स्तुति आवडत नाही असें नाही ! स्वतःच्या चार ओळींबद्दल कुणी स्तुतिपर उद्गार काढले की हे गृहस्थ ती बातमी गावभर स्वतःच सांगत फिरतात. मग माझ्यावर किंवा इतर कांही साहित्यिकांवर या गृहस्थाचा असा आरोप कां ? द्राक्षें आवाक्याबाहेर असलीं की ती कोल्ह्याला आंबट वाटतात. त्यांतला तर हा प्रकार नाही ना ? मी एकदा त्यांना तसें म्हटलें सुद्धा—

" काय हो," मी म्हटलें, " तुमच्या भोवती आमच्याकडे येतात त्याप्रमाणें निर्बुद्धच काय पण कुणीसुद्धा येत नाही, याचा विषाद तर तुम्हाला वाटत नाही ना ?"

त्यावर ते चिडून म्हणाले, "तुमच्यासारखा वाटेल त्याला मी जवळ करीत नाही. मी फक्त बुद्धिवंताशींच मैत्री करतों!" या कबुलीजबाबानें आमच्यापेक्षा-हि आपण खरे पटाईत जाहिरातबाज आहोंत, हें त्यांनी नकळत पण आपोआप कबूल केलें. कारण बुद्धिमान आणि प्रथितयश लोकांच्या हातीच जाहिरातीची साधनें अधिक असतात आणि त्यांच्याशीं मैत्री स्वतःची करूनच जाहिरात करून घेण्याची शक्यता असते. सामान्य किंवा निर्बुद्ध लोकांनी केलेल्या स्तुतीने स्वतःचा फायदा होण्यापेक्षा तोटाच अधिक होतो, हें समजण्याइतकी

अक्कल या गृहस्थांना जितकी आहे तितकीच किंबहुना त्यापेक्षा किंचित अधिक मला किंवा ज्या इतर साहित्यिकांवर हे गृहस्थ वरच्यासारखे आरोप करतात त्यांना खास आहे. आपली जाहिरात व्हावी, या हेतूने कुणी निर्बुद्ध माणसांना जवळ करील असें मला नाही वाटत.

पण सुदैवाने माझ्याकडे येणाऱ्या लोकांत माझी जाहिरात करूं शकतील असे सुबुद्ध किंवा निर्बुद्ध साहित्यसेवी बहुधा कुणी नसतातच मुळी. माझ्याकडे येणारे आणि मला मनापासून आवडणारे म्हणजे त्या शाईविक्यासारखे सामान्य लोक. बुद्धिवैभवाने ते तळपत नाहीत किंवा वाङ्मयाची ते चिकित्सा करूं शकत नाहीत हें खरें आहे, पण जीवनावरल्या पुस्तकांसंबंधी बोलण्यापेक्षा ते प्रत्यक्ष जीवनासंबंधीच बोलतात, आणि म्हणूनच मला ते आवडतात. तसें बुद्धीचें महत्त्व मला कळतें आणि माणसाला आपल्या बुद्धीचा थोडाबहुत अहंकार असावा, हेंहि मला मान्य आहे; पण बुद्धीपेक्षाहि खरी मानवता अंतःकरणांतच दिसून देते. आणि काय असेल तें असो, ज्याप्रमाणे एखाद्याला दृष्टी नसली म्हणजे त्याचें स्पर्शेंद्रिय तीव्र असतें किंवा वाचा नसणारांचें घ्राणेंद्रिय तीव्र असतें त्याचप्रमाणें बुद्धि कमी असणारांचें अंतःकरण बहुधा मोठें असतें, असा माझा अनुभव आहे. बुद्धिवंताच्या संगतींत क्षणभर आपले डोळे दिपून जातील, आणि जीवनाचें पृथक्करण करून त्याने शोधून काढलेले रूक्ष पण भव्य सिद्धान्त आपल्याला चकितहि करून टाकतील; पण सामान्य माणसाच्या संगतींत मिळणारा जीवनाचा एखादा अपूर्व अनुभव किंवा दृष्टोपत्तीला येणारें जीवनाचें एखादें नवीन स्वरूप इतकें अमोल असतें की, प्रत्यक्ष जीवनाच्या निर्मल झऱ्यांतच बुडी मारल्याचा अवर्णनीय आनंद आपणाला होतो. आम्हीं बुद्धिमान लोक अपत्यवात्सल्याशिवाय रसाळ कविता लिहूं किंवा मित्रप्रेमावर एखादा फर्डा लेखहि खरडूं; पण आमचा मित्र आजारी पडला असतां इकडची काडी तिकडे करण्याचें कांही आम्हाला जमणार नाही! पण तेंच एखादा सामान्य माणूस स्नेह्याच्या आजारांत त्याची शुश्रूषा करण्याचें आणि घाण उपसण्याचें काम आमच्यापेक्षा शतपट अधिक चोखपणे करतो. सामान्यांतच असामान्य माणुसकी असते, असें मला वाटतें आणि बुद्धीपेक्षा मला माणुसकीची किंमत अधिक वाटत असल्यामुळेच सामान्यांचीच संगत मी अधिक पसंत करतो.

...ग्रंथालय, ठाणें. स्थळ... ३०९२५

५

# प्रगतीची किल्ली

अलीकडे गणूकाकांना माझा राग येऊं लागला आहे. एकदोन दिवसांपूर्वी कसल्या तरी तत्त्वज्ञानाच्या गोष्टी करीत मी आणि माझा एक मित्र बसलों होतों. इतक्यांत गणूकाका तेथे आले. आमच्या गोष्टी त्यांच्या कानांवर पडल्याबरोबर इतके दिवस मनांत धुमसत असलेला राग बोलून दाखवायला त्यांना चांगलीच संधि मिळाली मला मध्येच थांबवून ते म्हणाले,

" अलीकडे तूं फारच शहाणपणा दाखवूं लागला आहेस ! कांही तरी एखादी क्षुल्लक गोष्ट घ्यायची, किंवा मी चुकून बोललेला एखादा शब्द धरायचा आणि त्यांतून मोठं कांही तरी तत्त्वज्ञानाचं अवडंबर काढायचं ! तूं तोडलेले अकलेचे तारे गेले कित्येक दिवस वाचतोंय मी. मला त्यांत कांही तथ्य वाटत नाही. हो, स्पष्ट सांगतों "—

" अहो, पण काका," मी माझी बाजू मांडण्याकरितां त्यांना थांबवून बोलण्याचा प्रयत्न करूं लागलों.

" तें कांही सांगूं नकोस मला." आपला आवाज अधिकच चढवून काका ओरडले, " तुम्ही अलीकडचें लोक स्वतःच्या फायद्याकरितां केलेली एखादी बारीकसारीक गोष्टसुद्धा केवढी फुगवून, जणं काय जगाच्या कल्याणाकरितां ती केली आहे असं भासवतां ! इकडचीं तिकडचीं इंग्रजी पुस्तकं वाचतां आणि त्यांत सापडलेल्या मोठमोठ्या जाडजूड शब्दांचा भडिमार करून आम्हां लोकांना चकित करून सोडतां. आम्हाला तें कांही जमत नाहीं. आम्हीं आपले सरळ मार्गी लोक. आम्हांला आमच्या तरुणपणीं एखादी चांगली मुलगी दिसली तर आम्हीं आमच्या आईबापांना सांगत असूं की, मुलगी चांगली आहे. इच्याशीं लग्न करून मला संसार

करायचा आहे नी चारपोरांचं धनी व्हायचं आहे! तुम्ही एखादी सुंदर पोरगी पाहिलीत की काय शब्दांचं वादळ उडवतां! दिव्य प्रेम काय, अमरज्योति काय नि काय काय! आणि इतकं करून शेवटीं केलं तेंच करतां! –"

"मीं असं केलं तरी काय, काका?" मी म्हणालों.

'सांगतो, धीर धर." काका म्हणाले, "परवां तू एका लेखांत लिहिलंस, की लिहा म्हणून आमच्या मानेवर कुणी गोणी ठेवलेल्या नाहीत किंवा या लेखाबद्दल चार पैसेसुद्धा मिळणार नाहीत. तरी लिहिल्याशिवाय राहावतच नाही का? तर म्हणें, प्रवृत्ति निवृत्तीची रस्सीखेंच यंव आणि त्यंव! अरे, लेखक म्हणून तुम्हाला मिरवायला पाहिज, कीर्तीची हाव आहे, चार लोकांनी वर म्हटलेलं तुम्हाला हवं आहे! कसली रस्सीखेंच नी कसलं काय!"

"अस्सं अस्सं" मी म्हणालों, "चांगलाच सूड घेतलात काका तुमच्या नांवावर तत्त्वज्ञानाचा बकवा केल्याबद्दल!"

"याची गोष्ट एक सोडून द्या, काका." माझा मित्र म्हणाला, "हा असेल आपमतलबी तुम्हीं म्हणतां तसा. पण मोठमोठे शास्त्रज्ञ, संशोधक, राजकारणी पुरुष, स्वतःच्या जिवाची पर्वा न करतां जें कार्य करून ठेवतात, तें काय कीर्तीच्या स्वार्थी आशेने? देशकार्यासाठी ऐहिक सुखावर लाथ मारणारे स्वातंत्र्यवीर किंवा मानवजातीच्या सुखांत भर घालणारा एखादा शोध लावण्यासाठी सर्वस्वाचीच नव्हे, तर स्वतःच्या जीवाचीहि राखरांगोळी करायला मागेपुढे न पहाणारे शास्त्रज्ञ, हे कुठलंहि कार्य केवळ स्वार्थी हेतूने करतात, असं मला नाहीं वाटत. साहित्यिकाची साहित्यनिर्मिती किंवा शास्त्रज्ञाच संशोधन कीर्ति किंवा नांव मिळविण्यांच्या स्वार्थी लालसेने केली जातात अस तुम्हांला वाटतें, तर तारे तोडणाऱ्या आमच्या या दोस्ताला कांहीतरी करावंसं वाटणं, ही एक प्रवृत्तिनिवृत्तीची हेतुशून्य रस्सीखेंच किंवा जीवन म्हणजे एक अर्थविहीन डोंबाऱ्याचा खेळ वाटतो. मला वाटतं, मानवी अंतःकरणांत जगण्याची जशी प्रबळ इच्छा निसर्गानें ठेवून दिली आहे, तशीच निर्मितीची स्वतःचं असं जगांत कांहीतरी करून दाखविण्याची–बलवत्तर आवड उपजतच तिथं आहे स्त्री पुरुषामधल्या आकर्षणाचा निसर्ग ज्याप्रमाणे मानव जातीचं सातत्य राखण्याकरितां उपयोग करून घेतो, त्याप्रमाणं मला

वाटतं, या निर्मितीच्या आवडीचा फायदा घेऊन तो मानवी प्रगतीचं गाडं चालू ठेवतो! स्वतःच्या सुखासाठी म्हणून या आकर्षणामुळे स्त्री-पुरुष एकत्र येत असतील; पण मृत्युमुळें मानवजातींत पडणारी तूट जन्मानं भरून काढण्याचं कार्य निसर्ग परस्पर त्यांच्याकडून करून घेत असतो! त्याच प्रमाणं शास्त्रज्ञ किंवा साहित्यिक या निर्मितीच्या नादानं कीर्तीसाठी जीवापाड झटत असतील; पण मानवी सुधारणेंत, संस्कृतींत किंवा प्रगतींत अविरत भर घालण्याचें काम निसर्ग त्यांच्या हातून साधतो. या निर्मितीच्या नादांतच प्रगतीची किल्ली आहे."

माझ्या मित्राचें हे जोरदार व्याख्यान ऐकून गणूकाका तर सर्दच झाले; पण मींहि बराच चमकलों. मात्र त्याच्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें मला वाटतें. कीर्तीच्याच आशेने मनुष्य एखादें चांगलें कार्य करतो असें म्हणतां येणार नाही. आपल्या कार्याचा किंवा आपल्या नांवाचा जगाला मागमूसहि लागणार नाही, हें माहित असूनहि सत्कार्य करणारे अज्ञात वीर काय थोडे आहेत? पेटलेल्या खाईवर देहाचा पूल करून शिवाजीला पुढे जाऊं देणाऱ्या स्वामिनिष्ठ मावळ्यांनीं तें वीरकृत्य काय कीर्तीच्या आशेने केलें? कांही तरी चागले कार्य करण्याची अनावर इच्छा–निर्मितीचा नाद-हेंच त्याचें खरें कारण. यावरहि कदाचित् गणूकाका म्हणतील, की असलें कार्य करतांना होणाऱ्या आनंदाच्या स्वार्थी हेतूने हे लोक असलीं कार्यें करीत असतील! या प्रश्नांना मात्र माझ्याजवळ उत्तर नाही!

• • •

६

# दोन मेणबत्त्या

स्वाक्षरी घेण्याकरितां म्हणून माझ्याकडे त्या दिवशीं आलेल्या त्या मला खरोखरच मोठ्या पेचांत टाकले होते. द्यावी स्वाक्षरी आणि मुलाने एकद मोकळं व्हावं म्हणून त्याच्या हातांतलें पुस्तक घेऊन मी सही करणार, तों तो एकदम म्हणाला, "छे, छे! मला नुसती स्वाक्षरी नको. माझा एक प्रश्न आहे; आणि त्याला उत्तर म्हणून ५।६ ओळी लिहून नंतर तुम्ही सही केली पाहिजे."

"कसला प्रश्न?" मी म्हणालों.

"मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता?" तो पोरगा गंभीरपणे उदगारला, "या प्रश्नाला एक चारपांच ओळीचें उत्तर लिहा, आणि नंतर सही करा."

त्याचा प्रश्न ऐकून मी थक्कच झालों. "अरे बाबा," मी म्हणालों, "ज्या प्रश्नाचं उत्तर देतांना मोठमोठ्या तत्त्वज्ञान्यांच्या सुद्धा नाकीं नऊ आले, त्या प्रश्नाचं उत्तर तूं माझ्याकडं मागतोस? काय वेड लागलंय तुला? मला नाही कांही उत्तर देतां येत या प्रश्नाचं. पाहिजे तर सही घे आणि जा."

"तत्त्वज्ञान्यांचीं मतं मला नकोत." तो म्हणाला, तुमच्या सारख्या लोकांचींच हवीं आहेत. तुम्हांला काय वाटेल तें लिहा. हीं पहा, पुष्कळ लोकांनी या प्रश्नाला उत्तरं लिहिलीं आहेत."

"मी नाही त्यांच्याइतका शहाणा!" मी त्रासून म्हणालों, "मला खरंच कांही सुचत नाहीं. काय थट्टा आहे काय या प्रश्नाचं ताबडतोब उत्तर द्यायचं म्हणजे?"

"आत्ताच देऊं नका, तो काकुळतीस येऊन म्हणाला. "ती चोपडी इथंच राहूं द्या. मी उद्या येतों. परवा येतों,—तुम्हीं सांगाल तेव्हा येतों."

त्या हुशार छोकऱ्याच्या पाणीदार डोळ्यांत इतकी कळकळ दिसत होती, की मला नाही म्हणवेना. "बरं, ठेवून दे ती चोपडी इथं," मी म्हणालों, "आणि ये उद्या परवा"

त्या दिवशीं दुपारपर्यंत मी कामांत असल्यामुळे त्याच्या प्रश्नाचा विचार करायला मला वेळच मिळाला नाहीं. पण त्यानंतर संध्याकाळीं एकामागून एक तीन प्रसंग घडले. ते मात्र माझ्या मनांत घोळत असलेल्या त्या प्रश्नाचं उत्तर देण्याकरतांच घडले असें आता मला वाटतें. खूप श्रीमंत असलेल्या माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाकडे कांही कामाकरितां मी गेलों. तो घरी नव्हता. त्याची वायको चिंतातुर चेहरा करून बसली होती.

"काय हो, कुठं गेले?" मीं विचारलें.

" तो नवीन जर्मन डॉक्टर आला आहेना, त्याच्याकडे गेलेत. मीच जा म्हणून आग्रह करून पाठविलं त्यांना" ती म्हणाली.

"म्हणजे ? झालं काय ?" मी म्हणालों.

' अहो काय नी काय ! त्यांच्या मागली एक काळजी जाते तर दुसरी लागते ! खडकीच्या बंगल्याची राखण करायला पठाण ठेवला; तो पठाणच चोरी करून पळाला ! तें तुम्हांला माहीतच आहे. ती भानगड संपली नाही तों आता इन्कमटॅक्सची केस उभी राहिली आहे. त्यांना अलीकडे झोपसुद्धां कशी ती लागत नाही. अन्नपाण्यावर तर वांछाच नाही. तेव्हा मीं म्हटलं, निदान त्या नवीन डॉक्टराच्या औषधानं तरी जरा बरं वाटेल."

"अस्सं होय ?" मी म्हणालों.

तिथून निघालों तो आगगाडीत बसून मी घरीं परत येत होतों. मजूर चळवळींत काम करणारा माझा एक जुना मित्र डब्यांत भेटला खूप आनंदांत होता तो. आपलं काम कसं शिस्तींत चाललं आहे आणि चळवळीला कसा जोर वाढला आहे, याचें रसभरीत वर्णन तो करीत असतां त्याच्या डोळ्यांत विलक्षण चमक दिसत होती. त्याचे डोळे खोल गेले होते. त्याची दाढीहि बोटभर वाढली होती.

"तुझे डोळे किती खोल गेलेत ?" मी म्हणालों, "काय, काय झालंय रे तुला ?"

' हट्" तो उद्गारला, " मला काय झालंय ? मी चांगला मजेंतआहे."

डोळे खोल गेले आहेत की वर आले आहेत तें मला नाही माहीत. गेल्या पंधरा दिवसांत आरशांत तोंड पहायला मला वेळच झाला नाही. आता दाढीविषयीं म्हणशील तर सध्या दाढी करायला आपल्या खिशांत पैसे नाहीत बुवा !"

इतक्यात परळ स्टेशन आलें आणि माझ्याशी हस्तांदोलन करून मोठ्या चैनींत शीळ घालीत तो निघून गेला.

एकामागून एक घडलेल्या दोन प्रसंगांचें मला आश्चर्य वाटत होतें. स्वतःच्या अपरंपार सुखांत आणखी भर घालण्याकरितां इन्कमटॅक्स चुकवून पंधरा लाखांचे सोळा लाख करण्याकरितां जीव पाखडणारा, आणि ठिकठिकाणच्या अनेक बंगल्यांत हजारों रुपयांचें फर्निचर धूळ खात पडलेलें असतांना खडकीच्या बंगल्यांतील चार खुर्च्या टेबलें पठाणानें पळविलीं म्हणून हाय खाणारा आमचा हा श्रीमंत दोस्त दुःखी आणि चिन्ताग्रस्त ! आणि एम्. ए. झाल्यावर लठ्ठ पगारांच्या नोकऱ्या लाथाडणारा, आणि कधी काळीं दलित जनता स्वतंत्र होऊन सुखी होईल म्हणून स्वतःच्या सुखाची यत्किंचितहि पर्वा न करतां इतरांच्या सुखासाठी कधी उपाशी तर कधी अर्धपोटीं वणवण करणारा हा कॉमरेड मजेंत आणि सुखी !

हे आणि असेच दुसरे विचार करीत मी रात्रीं घरीं परत आलों आणि तों तिसरा प्रसंग घडला. मला मेणबत्तीच्या थंड प्रकाशांत वाचीत बसणें फार आवडतें. म्हणून मी खुर्चीवर उभा राहून फळीवरल्या मेणवत्त्या शोधूं लागलों. एक मेणबत्ती सबंध जळून गेली होती. मेणबत्ती अशी क्वचित् जळते. तिचें अस्तित्व दाखविण्यापुरता फक्त पैशाएवढा मेणाचा अवशेष शिल्लक होता. दुसरी मेणबत्ती कित्येक दिवस फळीवर धूळ खात पडल्यामुळें मुंग्याझुरळांनी ती सबंध कुरतुडून अजिबात निरुपयोगी केली होती. तशा स्थितींत पडलेल्या त्या दोन मेणबत्त्या पाहून कां कोणास ठाऊक, मला थोडेसें हसूं आलें; आणि दुसऱ्याच क्षणीं एक चमत्कारिक विचार माझ्या डोक्यांत आला. ज्या दोन माणसांचा मी विचार करीत होतों ती दोन माणसें या दोन मेणबत्त्यांसारखी आहेत ! आपला जीव निर्धोक ठेवण्यांत स्वतःच्या सुखाची राखण करीत पडलेल्या एकाचें आयुष्य कुरतडलें जात आहे, आणि

इतरांना मंद सुखकर प्रकाश देत दुसऱ्याची जीवनज्योत जळत चालली आहे.

समजा, त्या दोन मेणबत्त्यांना जीव असता तर आपला कुणाला कसलाच उपयोग झाला नाही, आपलें आयुष्य कुजून गेलें, हा दुःखमय विचार एकीच्या मनांत आला असेल; आणि आपल्या जीवनाचें सार्थक झालें–शेवटच्या घटकेपर्यंत आपण सर्वांना प्रकाश दिला या सुखदायी तंद्रींत त्या दुसरीच्या आयुष्यांतला शेवटचा क्षण संपला असेल ! मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण कोणता, या प्रश्नाचें उत्तर त्या मुलाला पाहिजे होतें, नाही का ? मिळालें मला उत्तर. मनुष्याच्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा क्षण म्हणजे हा अशा प्रकारचा शेवटचा क्षण ! टेबलावर पडलेली त्याची चोपडी मी घेतली, आणि त्यांवर लगेच खरडलें, "• • • • हा खरा सुखाचा क्षण ! स्वत:साठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास !"

• • •

७

# व्यवस्थितपणाचें वेड

वस्तु जागच्या जागीं ठेवण्याचें आणि व्यवस्थितपणाचें कांही लोकांना वेडच लागलेलें असतें, असें मला वाटतें! त्यांच्या आयुष्यांतील बहुतेक वेळ वस्तूंचा उपयोग किंवा उपभोग घेण्याऐवजी त्यांची व्यवस्था लावण्यांतच जातो. मला तर वाटतें, की एखाद्या दिवशीं सूर्य जर किंचित् एका बाजूला कललेला या लोकांना दिसला तर आकाशांत उडी मारून त्याला जागच्या जागीं ठेवण्याचा प्रयत्न करायलासुद्धा हे लोक कमी करणार नाहीत!

मला स्वत:ला या लोकांचा इतका राग येण्याचें कारण एवढेंच, की अशा तऱ्हेचा एक कमालीचा व्यवस्थित मनुष्य हल्ली मला माझ्या हाताखाली काम करावयास मिळाला आहे. आणि त्याच्या या भलत्याच व्यवस्थितपणामुळे कामें जरी बिनबोभाट होत असलीं, तरी माझ्या जिवाची जी यामुळे त्रेधा उडते ती सांगून संपावयाची नाही. एकच गोष्ट सांगतों, आणि ती ऐकल्या-बरोबर माझी किती शोचनीय अवस्था झाली आहे, याची तुम्हांला कल्पना येईल. अवघे एकदोन रुपये माझ्या खिशांत उरले होते. ते तसेच टेबलावर टाकून जरा कुठे बाहेर गेलों आणि कांही वेळाने परत येऊन पहातों तों रुपये कडीकुलुपांत बंद. त्याची चावी त्या व्यवस्थित माणसाच्या खिशांत आणि ऑफिसची वेळ होऊन गेलेली म्हणून तो व्यवस्थित माणूस वेळच्या वेळीं घरीं निघून गेलेला! आणि रागावणार तरी कुणावर? पैसे कुणीतरी चोरील म्हणून माझ्यावर उपकार करण्याकरतांच त्याने बंद करून ठेवलेले. चहा प्यावयालासुद्धा खिशांत पैसे नसल्यामुळे चहाच्या आशेने मी एका मित्राच्या घरीं गेलों तों तो घरांत नव्हता, आणि त्याच्या बायकोकडे सरळ चहा मागण्याचें धैर्य नव्हतें. तेव्हा हळूहळू पाणी पिण्याच्या गोष्टी काढा-वयास सुरुवात केली. पण ती बाई सरळ आणि भाबडी असल्यामुळे तिने

थंड पाण्याचा तांब्या आणून माझ्या पुढ्यांत ठेवला. मी तरी चहाची तहान पाण्यावर भागवूं शकत नाही. तेव्हा घसा धरल्यामुळे डॉक्टरांनी थंड पाणी पिऊं नको असें मला सांगितलें आहे, वगैरे वगैरे गोष्टी मीं तिला ऐकविल्या. तेव्हा कुठे त्या बाईच्या डोक्यांत माझा खरा मुद्दा शिरला. आणि तिने मला एकदाचा चहा करून दिला.

हा मनुष्य येण्यापूर्वी मी कसा अगदी सुखी होतों. सर्व तऱ्हेचे कागद, पुस्तकें, दौती, मधून मधून शेंगदाण्याच्या पुड्या या सर्व वस्तु कशा मजेदार अव्यवस्थितपणे टेबलावर पसरलेल्या असत. आणि सर्व वस्तु डोळ्यासमोर असल्यामुळे कधीहि असला त्रास होत नसे. वाटेल तेव्हा वाटेल तें करावें. आणि आता कुठचे शेंगदाणे माझ्या टेबलावर! जरा कुठे माझी नजर दुसरीकडे गेली, की याने टेबल साफ केलेंच! बरें या मनुष्याला काढून टाकावें, तर हा अत्यंत कष्टाळू आणि प्रामाणिक आहे. माझी मलाच लाज वाटून त्याला काढून टाकण्याऐवजीं मीच थोडा थोडा व्यवस्थित होतों आहें!

आनंद इतकाच की, ऑफिसांतून सुटल्यावर निदान घरीं तरी या माणसाचा मला त्रास नाही. आणि ऑफिसांतल्या व्यवस्थितपणाचा सर्व वचपा मी घरीं भरून काढतों. माझ्या घरांत तुम्ही प्रवेश कराल तर अत्यंत नयनाल्हादक दृश्य तुमच्या दृष्टीला पडेल. काढून टाकलेले मोजे, इकडे तिकडे उडालेले ब्रश, जोडे, खुर्च्यांवरून आराम करीत पडलेले मळके कोट, त्याचप्रमाणे बिछान्यावर इतस्ततः पसरलेले धोब्याकडून आलेले सूट इत्यादि वस्तु जगांत कुठेहि न मिळणारें स्वातंत्र्य माझ्या खोलींत उपभोगीत असतात. त्याचप्रमाणे मोठमोठ्या ग्रंथकारांची पुस्तकें, टूथब्रश आणि बिस्किटांचे डबे माझ्या खोलींत अगदी गुण्यागोविंदाने एके ठिकाणीं नांदत असतात. माझ्या या आनंदी संसाराचें वर्णन माझ्या एका विवाहित मित्रापुढे जेव्हा मीं करूं लागलों, तेव्हा त्याला माझा फारच हेवा वाटू लागला, आणि संतापून तो म्हणाला "लेका, लग्न केलं नाहीस तोपर्यंत तुझ्या या गमजा. बायको कर म्हणजे मग पाहतों कसा अव्यवस्थित राहतोस तो!" त्याचे वरील शब्द ऐकून भीष्मासारख्या पुरुषश्रेष्ठाने आमरण लग्न न करण्याचा निश्चय कां केला, यासंबंधीं माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला.

या व्यवस्थित लोकांच्या ध्यानांत कांही कांही साध्या गोष्टीसुद्धा येत नाहीत. उदाहरणार्थ, पैसे जागच्या जागीं तिजोरींत ठेवणें. यांना एवढं कळत नाहीं, की चोर आलाच तर सर्व जागा सोडून तो नेमका तिजोरी फोडणार. मुंबईतल्या एका प्रसिद्ध मोत्याच्या व्यापाऱ्याची गोष्ट मला माहीत आहे. अत्यंत मौल्यवान मोत्यांच्या माळा, मौल्यवान वस्तु ठेवण्याच्या तिजोरींत न ठेवतां तो म्हणे टेबलावरच्या टीपकागदाखाली किंवा एखाद्या कॅलेन्डराच्या मागे ठेवीत असे. हेतु हा की, चोर या जागा कधीच शोधीत नाही

माझा अव्यवस्थितपणा एका टोकाला तर माझ्या दुसऱ्या एका मित्राचा व्यवस्थितपणा अगदी दुसऱ्या टोकाला आहे ! सर्व वस्तु जशा काय फोटो काढण्याकरितां मांडून ठेविल्या आहेत ! पुस्तकांच्या शेल्फवर पुस्तकें मांडून ठेविलेलीं, प्रत्येक पुस्तकाला ठराविक रंगाच्या पुठ्ठ्याचें कव्हर. घासून पुसून चकचकीत केलेला पाण्याचा तांब्या एका कोपऱ्यांत. त्यावर त्याहूनहि चकाकणारा प्याला. मला तर त्यांतून पाणी प्यावयाची भीतीच वाटते. न जाणो आमच्या बोटाचा डाग लागला तर ! त्याचप्रमाणे कपड्यांची व्यवस्था घडी मोडली की करा होती तशी. मात्र त्याच्या या व्यवस्थितपणाचा परिणाम असा झाला आहे की, तो मनाने अत्यंत निर्बुद्ध आणि बाहेरून अगदी बावळट झाला आहे. पुस्तकांची रांग मोडावयाची नाही आणि पानें मळवावयाचीं नाहीत म्हणून तो फारसे वाचीत नाही; त्यामुळे तो मनाने निर्बुद्ध राहिला आहे. आणि स्वच्छ कपड्यांच्या मोडलेल्या घड्या पुन्हा होत्या तशा व्यवस्थित करण्यांत बहुतेक वेळ गेल्यामुळे त्याच्या अंगावर बहुधा मळकेच कपडे असतात. त्यामुळे तो बावळट दिसतो. व्यवस्थितपणाचें वेड झालें म्हणून काय, कुठल्याहि गोष्टीचें वेड हें वाईटच !

● ● ●

८

# निळे डोंगर तांबडी माती

[ प्रा. अनंत काणेकर व सुप्रसिद्ध चित्रकार श्री. दलाल यांनी दक्षिण भारताची सफर काढली. त्या सफरीचें वर्णन 'निळे डोंगर तांबडी माती' या पुस्तकांत प्रा. काणेकर यांनी केलें आहे. ते म्हणतात "दक्षिण भारत म्हटलें की, डोळ्यापुढे उभे राहतात निळे डोंगर आणि तांबडी माती! उत्तरेकडे जसा हिमालय तसा दक्षिणेकडे निलगिरी-निळा डोंगर. .. आणि दक्षिणेंतल्या आकाशाचा निळा रंग तर विशेषच गर्द निळा आहे.... पाहावं तिथं निळे डोंगर आणि पायाखाली तांबडी माती." या पुस्तकांतील कोइमतूर या स्त्रियांच्या साड्यांबद्दल सुप्रसिद्ध असलेल्या शहराचें वर्णन येथे घेतलेलें आहे. ]

* * *

कोईमतुरला जाण्याकरिता सकाळीं १०-१० च्या गाडीने कुन्नुर सोडलें. निलगिरी उतरून मेट्टापल्लयमपर्यंत 'फ्यूनिक्युलर' ने जायचें. तिथून पुढे कोईमतुरसाठी नेहमीची गाडी मिळते. पांचहजार फुटांवर 'कटेरी रोड' साडेतीन हजार फुटांवर 'कल्लार' अशीं छोटीं छोटीं स्टेशने घाटांत आहेत. कल्लार तें मेट्टापल्लयम सपाट प्रदेशांतून गाडी जाते. नाटकांत 'ट्रॅन्स्फर' सीन व्हावा तसा देखावा आता बदलला होता. ती उंच उंच कापराचीं झाडें, तीं फर देवदार, आता स्वप्नसृष्टींतल्यासारखी वाटत होतीं. मैलच्या मैल पोफळींचीं बनें, दोन्ही बाजूंना दिसत होतीं. नारळपोफळींच्या संगतींतली गरम हवाहि चांगलीच अंगाला घाम फोडीत होती. तीन तासापूर्वी आपण थंडगार इंग्लिश हवेंत होतों, हे खरेंच वाटेना. मेटापल्लयमला गाडी आली तेव्हा दुपारचा एक वाजला होता, आणि दक्षिण भारतीय उन्हाळ्याची भट्टी चांगलीच पेटली होती! घामाच्या धारा फुटून जीव गुदमरूं लागला.

**तांबडी माती लागली**

कोईमतुरला जाणारी गाडी १।। ला निघाली. निळ डोंगर मागे राहिले होते, पण तांवड्या मातीचा सपाट प्रदेश सभोवार पसरला होता. मधूनमधून बाजरी–जोंधळयाच्या शेतांसारखीं शेतें आणि केळी नारळीं पोफळींचीं वनें दिसत होतीं. मधल्या स्टेशनांचीं तामीळ नांवें आगगाडी-सारखीच लांबलचक होती.

'पेरीयनायकनपायम्' 'उरुमांडामपालयम्' ! डोक्याला पाढरें फडकें बांधलेले आणि कमरेला गोल धोतर गुंडाळलेले काळे पुरुष, आणि गळयांत लाल मणि आणि पोवळयांच्या माळा घातलेल्या काळया स्त्रिया, केसांचा बुचडा उलटा आंत मुडपलेल्या, स्तन उघडे टाकून फिरणाऱ्या काळ्या स्त्रिया स्टेशनांत किंवा शेतांत दिसू लागल्या. काळया गरम कापडाची कोट पाटलोण आणि जरीकाठी तयार हिरवा फेटा डोक्यावर ठेवलेले इकडचे रेल्वे अधिकारी आमच्याकडल्यापेक्षा अधिक तरतरीत दिसतात. पावणेतीनला कोईमतूर स्टेशन आलें. स्टेशनजवळच्याच 'श्रीमुरुगन कॅफे' नावाच्या हॉटेलांत सामान ठेवून पावणेचारच्या सुमारास बंगलोरला भेटलेल्या श्री. भौरसकरांचे बंधु इथल्या फॉरेस्ट कॉलेजमध्ये असतात, त्यांना भेटायला बाहेर पडलों.

**दक्षिण भारताचें मँचेस्टर**

कोईमतूर साड्यांबद्दल प्रसिद्ध असलेल्या या शहराला दक्षिण भारताचें मँचेस्टर म्हणतात 'सोमसुन्दरम् 'टेक्स्टाइल मिल्स, कामधेनुयानं' वगैरें नावें मधूनमधून दिसत होती. बडाबाजार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या बाजारपेठेंत पहावे तिथे कुणातरी चेट्टीची पेढी–वीरस्वामी, रंगास्वामी, पोन्नूस्वामी, दुराईस्वामी, चेट्टीची पेढी दिसत होती ! हें नमुनेदार मद्रासी शहर दिसतें. तामिळ शब्द कानांवर आदळत होते, व कमरेला गुंडाळलेलें तेहि गुडघ्यावर उलटें वळवून कमरेला खोचलेलें धोतर, अंगांत शर्ट, त्यावर उपरणें अशा थाटांत उघड्या डोक्याने अनवाणी चाललेलें पुरुष रस्त्यांत जिथे तिथे दिसत होते ! यांतला हमाल कोण, कारकून कोण आणि पेढीचा मालक चेट्टी कोण हे आमच्यासारख्या नवख्या माणसांना समजणें कठिण ! कॅफे, लंचहोम आणि टी क्लबच्या इतक्या पाट्या रस्त्यावर ठिकठिकाणी दिसत होत्या की, इथे खाणारे लोक तरी किती

आहेत--सगळे गाव बाहेर दुकानांतच चहापाणी, जेवणखाण करतें की काय, अशी कुणाला शंका येईल ! बंगलोर प्रमाणेच इथेहि अनेक पानविडीच्या दुकानांत केळयांचें घड, सोडालेमनच्या बाटल्या आणि चकल्यांच्या माळा विकायला ठेवलेल्या दिसल्या. सिगारेटची किंमत विचारली तेव्हा दुकानदार 'रंड' म्हणाला, तेव्हा दचकलोंच, पण 'रंड' म्हणजे दोन असें कळलें तेव्हा बरें वाटलें ! एका दोघांना इंग्रजींत रस्ता विचारला. त्यानीं उत्तरांची सुरुवात इंग्रजींत केली पण शेवट भराभर तामिळमध्ये केला ! कांही बोर्डिंग अॅण्ड लॉजिंगच्या दरवाजावर ' डिशीस हिअर नॉट प्रिपेअर्ड इन प्युअर घी ' या पाट्या पाहून आश्चर्य वाटले. स्वत: खाणावळींच्या मालकांनी आम्ही शुद्ध तूप वापरीत नाही असें ठळक अक्षरांत पाटी लावून जाहीर करायचें म्हणजे काय ? मला वाटतें शुद्ध तूप न वापरणारांनी–नकली, वनस्पती तूप वापरणारांनीं तसें स्पष्ट जाहीर करायला हवें, असा मद्रास सरकारचा कायदा असावा

**रस्ते प्रशस्त पण वर्दळ नाही !**

फॉरेस्ट कॉलेज ' आर्. एम्. पूरम् ' या कोईमतूरच्या नवीनच वसवलेल्या ऐसपैस उपनगराजवळ आहे. बसने तिथें गेलों. दुपारीं ४॥ ची वेळ असून इथल्या प्रशस्त रस्त्यावर मुंबईत कर्फ्यु ऑर्डरच्या काळांत दिसतो तसा शुकशुकाट दिसत होता ! कॉलेजांत कळलें की, भौरसकर स्टेशनावरच कांही कामाकरिता गेले आहेत, तेव्हा स्टेशनकडे परत आलों. कॉलेजचें कांही सामान आलें होतें तें उतरवून घेण्याकरतां भौरसकर व त्यांच्या बरोबरचे कांही विद्यार्थी स्टेशनांत आले होते, तिथे त्यांची गाठ पडली. भौरसकरांच्या बरोबर बाजारांत फिरून कांही कोइमतुरी साड्या घेतल्या; आणि जेवायला मुरूगन कॅफेंत परत आलों.

**हमाल कोण ? मालक कोण ?**

इथे रस्त्यांत दिसणारा पुरुष हमाल आहे की, मालक आहे हे नव्या माणसाला समजणें कठिण याचा अनुभव रात्रींच आला. हॉटेलांत दुपारीं सामान ठेवलें तेव्हा खाटा बाहेर उघड्यावर टाकायला दलालांनी हॉटेलच्या नोकरांना सांगितले होतें. रात्री हॉटेलांत परत आलों तेव्हा सामान जिथच्या तिथे पडले होतें. नोकरांनी कांहीच केले नव्हतें. दलाल संतापले

होते. गुडघ्यावर धोतर खोंचून तिथून जाणाऱ्या एका तुततुकीत काळ्या माणसाला जवळ बोलावून त्याच्या अंगावर ओरडायला त्यांनी सुरुवात केली. इंग्रजीत कांही तरी 'हो हो' असें म्हणून तो माणूस तिथून निसटला आणि त्याने हॉटेलच्या मॅनेजरला आमच्याकडे पाठवून दिले. मॅनेजरने हवी ती व्यवस्था आम्हाला करून दिली. हॉटेलच्या हॉलमध्ये आम्ही जेवायला बसलों तों आमच्याशेजारी दलाल ज्याच्या अंगावर हॉटेलचा नोकर समजून ओरडले होते तो माणूस! आमच्यासारखाच हॉटेलांत उतरलेला एक उतारू होता! इकडची माणसे फार सौजन्यशील म्हणून आम्हाला उलटी तंबी न देता तो बिचारा तिथून निसटून हॉटेलच्या मॅनेजरकडे गेला, आणि आमची तक्रार काय आहे तें पाहण्याकरता त्याने त्याला पाठवून दिले! जेवतांना त्याची आमची दोस्ती जमून आम्ही गोष्टी करूं लागलों कापड-धंद्यांतला चांगल्या मोठ्या पगाराचा तो एक मोठा अधिकारी होता. तो तामीळ नव्हता, तेलगुभाषी होता. कांही कामाकरता तो कोईमतूरला आला होता. आमच्या गप्पा अर्थात इंग्रजींत चालल्या होत्या. वृत्तपत्रीयसृष्टींत सुप्रसिद्ध असलेले 'सिंध आब्सर्व्हर' वरचे श्री. पुन्नय्या, 'नॅशनल हेरल्ड' चे श्री. के. रामराव हे लोक आमच्याच गावचे असे तो म्हणाला. महाराष्ट्रीय सिनेतारकांचा तो मोठा चहाता दिसला. शांता आपटे, लीला चिटणीस, दु बाई खोट यांच्यासंबंधी पुनःपुन्हा तो विचारीत होता. शेवटी नथुराम गोडसेसंबंधीहि त्याने चवकशी केली!

### हिंदी तिरिमा?

कोइमतूरमधलें पेरू देवस्थान फार प्रख्यात आहे. ते दाखवायला नेण्याकरिता भोरसकर सकाळीं साडेआठ वाजताच आमच्या हॉटेलांत आले. शहरापासून पेरू बरेच दूर आहे, पण देवालयाच्या दारापर्यंत बस जाते. शहराच्या बाहेर बस गेल्यावर धान्याचीं हिरवीं शेतें, केळीचीं वनें आणि नारळीपोफळींच्या बागा दिसू लागल्या. ग्रामीण भागांतून आम्हीं जात होतों. पेरूच्या देवालयाभोवती दक्षिणेंतल्या पद्धतीप्रमाणे तटबंदीसारखी भिंत आहे. हें देवालय खूपच प्राचीन दिसतें. देवालयांतल्या दरवाजावर देवदेवतांच्या अजस्र रंगीत आकृत्या दिसल्या. चौकोनी दगडी खांबाच्या रांगा असलेला एक भला मोठा मंडप ओलांडून गेल्यानंतर नंदीचें स्वतंत्र देऊळ दिसलें. नंतर

आणखी एक भला मोठा दगडी खांबांचा मंडप आणि मग देवाचा गाभारा. नारळ केळीं देवापुढे ठेवून तामीळ बाया नमस्कार करीत होत्या. खरें की, खोटें कोणाला ठाऊक, पण इथल्या सर्व उच्चवर्णीय बायका नाककानांत हिरे वापरतात. त्यांच्या काळ्या कातडीवर हिरे चमकतातहि छान ! प्रसाद ठेवणाऱ्या बायांना पुजारी आरती पुढें करून कुंकू देत होता. आम्हीहि त्या वृद्ध पुजाऱ्याला चार आणे देऊन नारळ केळीं देवाला दिली. 'इल्ले', 'इंडू' करून तो आमच्याशी तामीळमध्ये बोलूं लागला, तेव्हा तामीळ 'इल्ले' [तामीळ येत नाही]- 'हिंदी तिरिमा ?' [हिंदी येतं का ?] असें उलट विचारलें ! एका दिवसांत आम्ही इतके तामीळ शिकलो होतों ! इथल्या पुजाऱ्याची आशीर्वाद देण्याची वेगळीच पद्धत आहे. आम्ही दक्षिणा दिली तेव्हा आमच्या हातावर तीर्थ देऊन पादुका कोरलेला एक ताब्याचा टोप त्याने आमच्या डोक्याला लावला ! नंतर चंदनच्या गंधाची एक एक गोळी दिली !

**कार्तिकेयाला दोन बायका होत्या ! !**

मुख्य देवळाच्या दोन्ही बाजूना लांब सोपे आहेत; आणि त्यांत शिव, पार्वती, गणेश, ब्रह्मा, षडानन वगैरे देवदेवतांचें लहान लहान कोनाडे किंवा छोटीं छोटीं देवळें रांगेने आहेत. या मूर्तींना रंगीबेरंगी परकर झबली नेसवली आहेत. आणि प्रत्येकाच्या डोक्यावर त्याच्या नांवाची तामीळ अक्षरांतली छोटी पाटी लावलेली पाहून कसेसेच वाटलें ! नवग्रहांच्या दगडी मूर्तींचें एक देऊळ आहे. एक पाय वर उचलून नृत्य करीत असलेल्या नटराजाचीं रेशमी वस्त्रे परिधान केलेली रुप्याची मूर्तीहि सुंदर आहे. आपल्याकडे शंकराचा मोठा मुलगा षडानन कार्तिकेय हा नुसता अविवाहितच नव्हे तर बायकांचे तोंडहि न पहाणारा आहे. कार्तिकेयाच्या देवळांत आपल्या बायका जात नाहीत. पण इथले लोक म्हणतात की, तो मलबारमध्ये आला आणि त्याने दोन बायका केल्या ! म्हणूनच की काय इथे आल्यावर त्याने नांव बदललेलें दिसतें ! त्याला इथे षण्मुख किंवा कुमार म्हणतात, पण इथले त्याचें सर्वपरिचित नांव म्हणजे सुब्रह्मण्यम. सुब्रह्मण्यमच्या देवळांत समोर त्याचे वाहन मोर असते. प्रत्येक देवळांत भक्तजन उंबरठ्यावर कापूर पेटवून ठेवतात आणि नमस्कार करतात. भरजरी रेशमी वस्त्रांनी मढविलेली एक लहानशी खोली हें शिव-

पार्वतीचें शयनमंदिर म्हणून पुजाऱ्यांनी दाखविली! देवालयाच्या आवारांत एके ठिकाणीं एका उंच झोपडींत गोपुरासारखा दिसणारा, भरगच्च कोरीव काम केलेला, देवाचा प्रचंड लाकडी रथ दिसला.

**जनोपकार बँक**

परत येतांना बसमध्ये आमच्या शेजारीं बसलेला एक तामीळ म्हातारा आम्हांला मराठींत बोलतांना पाहून मराठींत म्हणाला, "तुमच्या काशी-इतकं आमचे हें पेरूचें देऊळ या बाजूला पवित्र समजतात." पुण्या-मुबईकडे राहिलेला हा म्हातारा असावा. इथल्या लोकांचें सौजन्य त्याच्या दोन वाक्यांत तीन वेळां तरी 'सर' आल्यामुळे क्षणोक्षणीं प्रतीत होत असे. फार काय 'साऊथ' इण्डिया रेल्वेचीं आद्याक्षरें ही 'अेस. आय. आर.' म्हणजे 'सर' म्हणतच डब्याडब्यावरून तुमच्याकडे टवकारून पहात असनात! रस्त्यांवरल्या आणि बसवरल्या कांही पाटचा मला चमत्कारिक वाटल्या. सी.एस्. ही इंग्लिश अक्षरें, आणि पुढे 'स्टोअर्स' तामीळ अक्षरें. तसेंच बसवर 'आर अेस. पुरम' ही पाटी—'आर, अेस.' इंग्रजी आणि 'पूरम' तामीळ लिपीत! अर्थात भौरसकरांनी सांगितल्यामुळे तें तामीळ लिपींतले 'पूरम' किंवा 'स्टोअर्स' आम्हाला समजले. कांही नांवेंहि मजेदार वाटलीं. 'जनोपकार बँक,' 'त्रिपुरसुंदरी विलास कॉफी हाऊस' 'कुमार--विलास लंचहोम'! मात्र या कोईमतूर शहरांत 'शिवाजी फार्मसी' आणि 'लोक-मान्य रोड' पाहून आनंद वाटला.

दुपारीं फॉरेस्ट कॉलेजमध्येच भौरसकरांचे पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांच्या 'मेस' मध्ये आम्हांला जेवायचें होतें. फॉरेस्ट कॉलेजमध्ये सर्व प्रकारचे विद्यार्थी असल्यामुळे शाकाहारी आणि मांसाहारी दोन्हीची व्यवस्था आहे. भौरसकरांनी लहानसे भाषण करून मेसमधल्या विद्यार्थ्यांशीं आमचा परिचय करून दिला विद्यार्थ्यांनीं मोठ्या आपुलकीने आम्हाला बसवून घेतले 'दोन घरचा पाहुणा उपाशी' ही म्हण महाराष्ट्रांत खरी असेल, पण आतिथ्यशील दक्षिण भारतांत उलट प्रकार दिसतो; कारण मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही पद्धतींचे जेवण आम्हाला मिळालें!

**निळ्या फुलांनीं शोभणारा निलगिरी**

जेवणानंतर भौरसकरांच्या खोलींत जोशी, कानगो वगैरे विद्यार्थी

मित्राबरोबर बोलत असता इथल्या जंगलांची बरीच माहिती मिळाली. त्यांनी सांगितलें की, निलगिरी केवळ दुरून निळा दिसतो, इतकेंच नव्हें, तर विशिष्ट ऋतूंत 'स्ट्रॉव्यूलांथीस' नांवाच्या जर्द निळ्या फुलांनी तो भरून जातो. त्यामुळे जवळूनहि निळा दिसतो. हॉस्टेलच्या आसपासची कांही चंदनाचीं झाडें त्यांनी दाखविली. त्यांना कसलाहि गंध नव्हता. एखाद्या सामान्य शुष्क झाडासारखी तीं दिसत होतीं. सुगंधी मलयमारुत, चंदन विटपा, जहरी सर्पाचा लपेटा वगैरे सर्व कविकल्पना पुराणांतली वांगी आहेत असें जंगलांतल्या दीर्घ अनुभवावरून आपणाला आढळून आल्याचें विद्यार्थ्यांनी सांगितलें. वरची साल काढल्यानंतर चंदनाचा आंतला गाभा सुगंधी असतो.

**कलावंतांची कैफियत**

चंदन हें एक 'पॅरासाइट' किंवा परभृत झाड आहे हें त्या विद्यार्थ्याकडून आम्हाला कळलें. 'होस्ट ट्री' किंवा यजमान वृक्षाकडून तें आपलें अन्न शोषून घेतें. ते म्हणाले की, केव्हा केव्हा चंदनाचीं मुळें आपला अन्नदाता यजमान शोधीत जमिनींत एक एक मैल दूर गेलेली असतात! हें सर्व ऐकून तर मला एक मजेदार कल्पना सुचली. सुंदर गाणारी कोकिला हीहि परभृत आहे—कावळ्याकडून कावळ्याच्याच घरट्यांत आपलीं अंडीं तीं उबवून घेते. सुंदर गंध देणारा चंदन दुसऱ्या वृक्षाकडून आपला जीवनं रस शोषून घेतो. एक पक्षी जगतांतील कलावंत तर दुसरा वनस्पति सृष्टींतला कलावंत! म्हणूनच माणसाच्या जगांतलेहि कलावंत आळशी, कामचुकार बेजबाबदार असतात, यांत कांही आश्चर्य नाहीं! समाजाने तरी त्यांना कां नांवे ठेवावीं? सुंदर कलाकृति निर्माण करून समाजाला ते अलौकिक आनंद देतात. त्यांना पोसणें समाजाचें कर्तव्य आहे.

सौंदर्यनिर्मिति हें समाजकार्य नाही काय? त्याची इतकीहि परतफेड समाजाने करूं नये? कलावंताने सौंदर्यहि निर्माण करावें; आणि इतराप्रमाणे पोट भरण्याकरता कारकुनी, वकिली, वैद्यकी किंवा हमाली करावी, अशी अपेक्षा समाज करतो याचा अर्थ काय?

● ● ●

९

# धुक्यांतून लाल ताऱ्यांकडे

[१९३७ सालीं प्रा. अनंत काणेकर युरोपला गेले. त्या प्रवासाचें वर्णन त्यांनी आपल्या 'धुक्यांतून लाल ताऱ्यांकडे' या पुस्तकांत केलें आहे. या प्रवासवर्णनाला आज २२-२३ वर्षे होऊन गेली व मध्यन्तरीच्या काळांत एक जगड्व्याळ महायुद्ध होऊन युरोपचा नकाशा पालटला व कित्येक शंहरांची पुनर्वसाहत झाली असली तरी प्रा. काणेकरांना त्या काळीं आलेले अनुभव निश्चित वाचनीय आहेत. पॅरिसहून लंडनला जाईपर्यंतचे प्रवासवृत्त येथे घेतलें आहे. लंडनविषयीं प्रथमदर्शनी त्यांचें मत काय झालें ते येथे वाचा.]

* * *

सकाळीं ७-५० ला गार दु लिऑं या पॅरिसमधल्या स्टेशनावर आम्ही येऊन पोंचलों. या स्टेशनवरून लंडनची गाडी पकडण्याकरिता गार दुनॉर्द या पॅरिसमधल्या दुसऱ्या स्टेशनवर मला टॅक्सीने गेले पाहिजे. नॉर्द स्टेशनवरून गाडी १०-४० ला सुटावयाची आहे. इंग्लिश खाडी ओलांडून लंडनला जायचे तीन मार्ग आहेत. कॅले-डोव्हर, बुलॉं-फोक्सटन् आणि दिएप्पे-न्यू हॅवन. पैकी ही गाडी बुलॉं येथे जायची आहे. खाडी ओलांडून मी फोक्सटन् येथे पोचणार. तेथे लंडनला जाणारी गाडी उभीच असते.

८-१५ च्या सुमारास मी नॉर्द स्टेशनवर येऊन पोंचलों. गाडीला अजून दोन तास अवकाश आहे, या समजुतीने क्लोकरूममध्ये सामान ठेवावयाचें आणि स्टेशनमधल्या सलूनमध्ये दाढी वगैरे करून भरपूर ब्रेकफास्ट घ्यावयाचा असा पोक्त विचार मी केला होता. फरेंच पोर्टरला ' मला लंडनला जायचे आहे' हें 'लॉंद्र लॉंद्र' हा मला माहीत असलेला एकुलता एक फरेंच शब्द पुन: पुन्हा उच्चारून मी मोठ्या प्रयासाने समजावून सांगितलें. तेव्हा तो सरळ

माझें सामान घेऊन प्लॅटफॉर्मकडे जाऊं लागला. लंडनची गाडी उभी आहे. तेव्हा गाडींतच सामान नेऊन ठेवतों, असें खुणेने त्याने मला सांगितलें. मीहि त्याच्या मागून गेलों. पहातों तों गाडी खरोखरीच उभी होती. १०-४० ला सुटणारी गाडी ८-१५ ला स्टेशनांत उभी का ? तें मला कळेना ! आणखी पुन्हा चांगली माणसांनी गजबजलेली होती ! हे फरेंच लोक गडकऱ्यांच्या धुंडिराजासारखे तीन तास आधी स्टेशनवर येऊन बसतात की काय ! या पोर्टरला माझें बोलणें न समजल्यामुळे हा भलत्याच गाडींत माझें सामान ठेवतो आहे की लंडनच्या गाडीची वेळ बदलली ? मी कमालीचा भांबावून गेलों.

शेवटीं गाडीमधल्या एका म्हातारीला, फरेंच गार्डाला, आणखी एका दोघांना जिवाची आटापीट करून खुणा केल्या आणि खात्री करून घेतली की ती गाडी बुलॉंलाच जायची आणि तिची सुटायची वेळ ८-३७ आहे ! दोन तीन दिवस आधी समर टाइमटेबल सुरू झाल्यामुळे १०-४० च्या गाडीची वेळ ८-३७ झाली होती ! घड्याळांत पाहतों तों ८-३० झाले होते. अजून सात मिनिटें आहेत या विचाराने स्टेशनमधल्या वृत्तपत्राच्या स्टॉलवर जाऊन ' डेली मेल ' हें इंग्लिश पत्र विकत घेतलें आणि माझ्या डब्याच्या दाराजवळ चाळीत उभा राहिलों. कांही वेळाने पाहतों तों गाडी एकदम हालूं लागली. चट्दिशी उडी मारून मला गाडीत चढावें लागलें.

आमच्या इकडल्या गाड्याप्रमाणे या युरोपियन गाड्या सुटताना गाडीची शिटी नाही, गाडीचा भोंगा नाही की, उतारूंची धावपळ नाही ! ८-३७ वर कांटा गेल्यावरोबर गाडी आपली संथपणे चालूं लागली. माझ्याखेरीज बाकी सर्व उतारू वेळेच्या आधी एक दोन मिनिटें आंत जाऊन बसलेले होते. अलिबागच्या एखाद्या पाहुण्याची मुंबईंत पहिल्याच दिवशीं जशी धांदल होते तशीच पॅरिसमध्ये माझी पहिल्या दिवशीं फजिती व्हावी असा योग होता असें दिसतें ! माझी दाढी बोटभर वाढलेली, पोटांत चहा कॉफीचा एक थेंब नाही आणि फरेंच भाषेचा गंध नसल्यामुळे चेहेरा बावरून गेलेला अशा थाटांत आमची स्वारी पॅरिस-बुलॉं एक्प्रेसमध्ये जाऊन बसली.

थर्ड क्लासच्या डब्यांत सुंदर गादीच्या जागा असून एका एका बाकावर दोन-दोनच माणसे बसावयाची सोय आहे. माझ्या शेजारीं पंधरा सोळा

वर्षाची एक गुटगुटीत फरेंच मुलगी बसली आहे आणि एक क्षणहि फुकट न घालविता ती सारखी लोंकरीचें विणकाम करते आहे. माझ्या समोरच एक अत्यंत सुस्वभावी चेहऱ्याची म्हातारी फरेंच बाई बसली असून तिच्या मांडीवर एक भला मोठा वेताचा पेटारा आहे. त्या पेटाऱ्यांत आहे तरी काय त्याची मला जिज्ञासा आहे. गाडी चालू झाल्यावर थोडयाच वेळाने माझी जिज्ञासा पुरी झाली. त्या बाईने हळूच पेटाऱ्याचे झाकण उघडलें आणि त्यांतून गुबगुबीत काळ्या कुळकुळीत मांजराचीं तीन काळीं पिल्लें बाहेर पडलीं !

माझ्या आजूबाजूला बसलेल्या आणि निरनिराळ्या स्टेशनांत नवीन येणाऱ्या या फरेंच स्त्री-पुरुषांना पाहून एकंदर फरेंच लोकाविषयीं माझें मत फारच चांगलें झालें आहे. या साऱ्या गोऱ्या लोकांत मी एकटाच निराळ्या रंगाच्या कातडीचा मनुष्य आहे; पण एकहि स्त्री किंवा पुरुष मी कुणी तरी निराळा आहें म्हणून माझ्याकडे टवकारून किंवा पुनःपुन्हा पहात नाही. त्यांच्याचपैकी मी एक कुणी तरी आहे अशा तऱ्हेने हंसतां खिदळतांना किंवा बोलतांना ते माझ्याकडे पाहात आहेत. मला हा फरक एकदम वाटावयाचें कारण असें, कीं इटलींतील लोकांचा मला फार राग येत असे. किती वेळा ते तुमच्याकडे रोंखून पहातील ! किती वेळा ते पुनःपुन्हा वळून पाहतील. साहजिक जिज्ञासा हाच तसें पाहण्यात त्यांचा हेतु असतो हें खरें आहे ; पण असें पुनःपुन्हा पाहणे हें असभ्यपणाचें लक्षण आहे असें मला वाटतें. अशा पाहण्यानें परकीय किंवा नवख्या माणसाला चमत्कारिक वाटेल, असें आपण करतों. हा चमत्कारिकपणा या फरेंच लोकांत मला मुळींच वाटत नाही.

दुसरी एक गोष्ट मला अत्यंत महत्त्वाची वाटते. किती तरी तरुण, मध्यम वयस्कर फरेंच बाया निरनिराळ्या स्टेशनांवर माझ्या डब्यांत चढताहेत आणि उतरताहेत; पण फरेंच लोकांविषयी, चैन करण्याकरितां युरोपला जाऊन आलेले आमचे प्रवासी मोठमोठी रसभरित वर्णनें देऊन आमची जशी कल्पना करून देतात, तशीं रंगेल आणि छचोर एकहि फरेंच बाई येथें दिसत नाहीं. एकीच्याहि ओठांना अगर गालांना रंग लावलेला नाही. फार काय--आणि हें कुणाला खरें सुद्धां वाटणार नाही. यापैकी बहुतेक बायांचे केस ‘ बॉब ’

केलेले नसून आमच्या घरगुती बायकांसारखे चांगले लांबलचक आहेत आणि हिंदी बायकांसारखेच मधोमध भांग पाडून मागे आंबाड्यासारखे बांधलेले आहेत अगदी हिंदू बायकांप्रमाणे नव्हे, पण जरा सैल आणि साधारणपणे त्याच पद्धतीने बांधलेले. त्यावर हॅट असते ही गोष्ट वेगळी. आणि आमच्याकडे फरेंच लोकांची आणि त्यांतल्यात्यांत फरेंच बायकांची काय बदनामी करतात! पॅरिसमधल्या एखाद्या कुप्रसिद्ध रस्त्यावरून फिरायचे आणि तिथे फिरत असलेल्या फरेंच बाजारबसव्यांना पाहून फरान्समधल्या स्त्रीवर्गाविषयीं मतें ठोकून द्यावयाचीं! एखादा युरोपियन प्रवासी मुंबईत फोरास रोडवर फेऱ्या मारून मुंबईतल्या हिंदू स्त्रियांबद्दल जर आपलें मत देऊं लागला तर तें जितकें अन्यायाचें होईल, तितकेंच हें अन्याय्य नाही काय?

गेल्या महायुद्धाच्या वेळीं फरेंच रणभूमीवरील ज्या गावांची नांवें मी वाचीत होतों तीं आमि अँ, नोयल्ला वगैरे स्टेशनें एकामागून एक लागत आहेत.

एकदोन तास विणकाम केल्यानंतर माझ्या शेजारीं बसलेल्या फरेंच मुलीने आपलें विणकाम काळजीपूर्वक पेटींत ठेवून दिलें आणि माझ्याकडे वळून फरेंचमध्ये तिने कांही तरी विचारलें. दोन-तीन चिमण्या माझ्या कानाकडे एकदम चिवचिवल्यासारखा मला भास झाला! मी तिला खुणेने 'जरा थांब' म्हणून सांगितलें आणि माझ्या ओव्हरकोटाच्या खिशांत हात घातला. ती आश्चर्याने माझ्याकडे पहातच राहिली. ओव्हरकोटाच्या खिशांतून 'टूरिस्ट गाइड' हें पुस्तक मी बाहेर काढलें. त्यांत प्रत्येक इंग्रजी वाक्यासमोर त्याच अर्थाचे फरेंच, जर्मन आणि इटालियन वाक्य दिलेलें आहे. 'I can't speak French, I speak English.' या वाक्यासमोरील फरेंच वाक्यावर बोट ठेवून पुस्तक मी तिच्या समोर धरलें! तिला हसूं आलें, पण तें पुस्तक पाहून तिला मोठें कौतुक वाटलें. त्या पुस्तकांत प्रत्येक वाक्य इंग्लिश फरेंच, जर्मन आणि इटालियन भाषेंत लिहिलेलें पाहून तिला इतका आनंद झाला की, तें पुस्तक उलटें सुलटें चाळीत ती स्वतःशीच 'आंग्ले–फरां–आलेमाने इतालिआनो' हे शब्द पुनःपुन्हा उच्चारीत होती आणि कांहीतरी मजेदार खेळणें मी तिला दिलें आहे अशा तऱ्हेने मधून मधून ती

माझ्याकडे पहात होती. तें पुस्तक बंद करून माझ्याकडे देतांना पुन्हा एकदा मंजुळ फरेंच शब्दांची फैर झाडून मला तिने कांहीतरी विचारलें. मला फरेंच येत नाही, हें सांगण्याकरिता मी तें पुस्तक बाहेर काढलें होतें हें ती विसरली ! मी गंभीरपणे त्या पुस्तकांतल्या त्याच वाक्यावर पुन्हा बोट ठेवलें आणि तिला दाखवलें. तेव्हा मात्र ती लाजल्यासारखी झाली.

आता आमची गाडी झपाट्याने बुलाँजवळ जात आहे. आजूबाजूचा देखावा अगदीच रुक्ष वाटतो. रेताड जमीन आणि झाडझुडूप कांहीएक नसलेले उघडेबोडके डोंगराचे कडे जिकडे तिकडे दिसताहेत. बरोबर १२-३० ला बुलाँ स्टेशनांत उतरलों. बुलाँ–फोक्स्टन बोट दोन वाजता सुटावयाची आहे. प्लॅटफॉर्मच्या पलीकडच्या बाजूलाच बोटीचा धक्का आहे.

बरोबर दोन वाजता आमच्या बोटीने फरान्सचा किनारा सोडला. आमच्या कोकणच्या बोटीएवढी साधारण ही बोट आहे. बुलाँ सोडताना हवा स्वच्छ असून प्रखर ऊन पडलें होतें पण इंग्लिश खाडींत थोडेसें दूर गेलों नाही तोंच 'इंग्लिश वेदर' सुरू झाली. आकाश ढगाळ होऊन सूर्य झाकला गेला आहे. थंडगार सोसाट्याचे वारे सुटल्यामुळे समुद्र खवळून बोट वाटेल तशी हालते आहे. युरोपियन 'थंडी' 'थंडी' जी म्हणतात तिचा इंगा इटली किंवा फरान्समध्ये मला कळला नव्हता, तो आता चांगलाच कळतो आहे. जणू काय हाडें फोडून थंडी जाते आहे. बुटांतल्या बुटांत पाय आखडून जाताहेत. नाकातोंडांतून सुटणाऱ्या श्वासांच्या गोठलेल्या वाफा प्रत्यक्ष डोळ्यांना दिसताहेत. आहे खरीं इतर युरोपपेक्षां इंग्लंडची हवा और !

दुपारीं ३-३० ची वेळ झाली आहे. फोक्स्टन-इंग्लंडचा किनारा समोर स्पष्ट दिसतो आहे. इंग्लंड ! हेंच तें इंग्लंड ! किती परस्परविरोधी भावनांनी माझें अंतःकरण थरारून जात आहे. इतिहासांत, भूगोलांत लहानपणापासून ज्या इंग्लंड देशाची महती आणि वर्णनें वाचलीं, तो इंग्लंड देश पहाण्याचे अपरंपार कुतूहल आणि ज्या या एवढ्याशा, ढगाळ धुरकटलेल्या देशाच्या दास्यांत आमचा अफाट हिंदुस्थान देश शतक-दीड शतक खितपत पडला आहे, त्या इंग्लंडला पहिल्यांदा पहातांना वाटणारा उद्वेग अशा अनेक संमिश्र भावनांचा एकच कल्लोळ माझ्या हृदयांत उडाला आहे. समोर फोक्स्टनच्या


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

किनाऱ्यावरचे उघडेबोडके रुक्ष डोंगर आणि फोक्स्टन गावांतील छपरांवर तीन-तीन चार-चार छोटीछोटीं धुरांडीं असलेलीं, धुरकटलेलीं, तांबड्या विटांचीं मासलेवाईक इंग्लिश घरें दिसताहेत. सर्वच वातावरण कुंद, काळवंडलेलें, धुरकट. आमच्यावर डौलानें राज्य करणाऱ्या इंग्रजांचा हाच का इंग्लंड देश! या आणि अशाच प्रकारच्या विचारांच्या धुंदींत मी इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवला.

बोटीच्या धक्क्यालाच लागून फोक्स्टन स्टेशनचा प्लॅटफार्म आहे. गुलगुलीत, मंजुळ इटालियन आणि फ्रेंच शब्द कानातल्याकानांत विरून जाऊन आता ठसक्यांत बोलल्या जाणाऱ्या इंग्रजी भाषेंतले परिचित पण कठोर मगरूर शब्द कानांवर पडताहेत. अर्थात् आतापर्यंत अपरिचित शब्दाच्या माऱ्याखाली गुदमरून गेलेल्या माझ्या जिवाला हे परिचित शब्द ऐकून कितीतरी मोकळें वाटतें आहे.

कस्टम आणि पासपोर्ट वगैरेची माझी तपासणी विशेष कसोशीने करण्यांत आली. कस्टमचे अधिकारी किंवा पासपोर्ट तपासणारे पोलीस अधिकारी अत्यंत सौजन्याने माझ्याशीं बोलत होते. पण इतर सर्व उतारूंतून यांत मला खड्यासारखे बाजूला काढण्यांत आलें आणि माझ्याविषयीं विशेष काळजी दाखविण्यांत आली. असें का तें मला सांगतां येत नाही. इंग्लंड-मधल्या एका मित्राला देण्याकरितां त्याच्या घरच्या मंडळींनी माझ्यापाशी हलव्याचें एक पार्सल दिलें होते तें फोडून दाखविण्याचा कस्टम अधिकाऱ्याने हट्ट धरला. मी त्याला तें उघडून दाखवलें आणि 'आतां मला उघडायला लावलंच आहेस, तेव्हा यांतला हलवा तू खा' म्हणून त्यांतला थोडा हलवा मीं पुढे केला. तो हसला आणि 'थँक्यू' म्हणून नको म्हणाला !

पासपोर्ट तपासतांना स्कॉटलंड-यार्डच्या दोघा अधिकाऱ्यांनी इंग्लंडला कशाला आलों, कुठे कुठे जाणार, कुठे राहणार इत्यादि नाना प्रश्न विचारले आणि माझी उत्तरें टिपून घेतलीं. आधीच मी प्रवासानें दमलों होतों आणि खूप कंटाळलों होतों. शेवटीं इंग्लंडमध्ये मी नक्की किती दिवस राहणार असा प्रश्न त्याने मला विचारला असतां मी चिडून 'It depends on how I like England' ! म्हणून उत्तर दिलें. तेव्हा तो हसला आणि माझें आभार मानून मला त्याने सोडून दिलें.

इंग्लिश हमाल मात्र मोठे हुशार आणि अत्यंत अदबीने वागणारे दिसले. कंपार्टमेंटमध्ये माझें सामान ठेवल्यावर त्या इंग्लिश हमालाला 'किती पैसे देऊं ?' म्हणून जेव्हा मीं विचारलें, तेव्हा मोठ्या अदबीने तो म्हणाला, "I leave it to you Sir" ! माझ्याकडे सुटे पैसे नव्हते. दहा शिलिंगाची एक नोट मोडून आणशील का ?" म्हणून त्याला मी विचारलें. तो 'हो' म्हणाला; आणि गर्दीत चुकामूक होऊं नये म्हणून आपल्या दंडावरचें नंबराचें बकल माझ्या हातीं देऊन नोट घेऊन तो सुटे पैसे आणावयाला गेला. नोट मोडून आणण्यांत मात्र त्याने आपलें 'इंग्रजी' डोकें लढवलें. चार हाफ क्राउन म्हणजे अडीच अडीच शिलिंगांचीं चार नाणीं घेऊन तो आला. मी कितीहि कमी द्यायचें ठरवलें तरी कमीतकमी अडीच शिलिंग म्हणजे दीडदोन रुपये मीं द्यावें याची त्याने चोख व्यवस्था केली होती ! बोलतांना मोठ्या झोकांत 'I leave it to you Sir' तो म्हणाला; पण नोट मोडतांना त्या इंग्लिश बच्चाने अडीच शिलिंग मिळतील याची बरोबर काळजी घेतली. गोड बोलून आपला कार्यभाग व्यवस्थित साधून घ्यावयाचा या व्यापारी इंग्रज जातीच्या स्वभावाचा हा उत्कृष्ट नमुना इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवताच मला भेटला म्हणावयाचा !

चार वाजता गाडीने फोक्स्टन सोडलें. इंग्लिश गाडीचा थर्ड क्लास आमच्या फर्स्ट क्लासइतका सुखसोईंनी युक्त आहे. मखमलीने मढवलेली गादीचीं बाकें, प्रत्येक बाकासमोर चहा वगैरे पिण्याकरिता सुंदर टेब्लस् ' सोय तिसऱ्या वर्गांत आहेत. सूर्य बाहेर येऊन कोवळें ऊन पडलें आहे आणि बाजूच्या देखावा अत्यंत आल्हाददायक आहे. शुभ्र सफेत मोहोराने भरगच्च भरून गेलेल्या 'चेरी' च्या झाडांच्या रांगाच्या रांगा दोन्ही बाजूंना दिसताहेत. रेखीव हिरवींगार चिमुकलीं इंग्लिश शेतें. त्यांत मधून मधून दिसणारीं लाल विटाचीं टुमदार घरें, हा सुंदर रेखीव देखावा फरान्स किंवा स्वित्झलँडमध्येसुद्धा दिसत नाही. कीटस्, शेले, वर्डस्वर्थला मोहून टाकणारें हेंच इंग्लंडचें ऐश्वर्य. आता मात्र इंग्लंड मला मनापासून आवडू लागलें आहे. दोनच तास हा देखावा टिकला.

आता आम्ही लंडनच्या जवळजवळ आलों आहोंत. धुरकट घरांची गर्दी आता दोन्ही बाजूंना दिसू लागली आहे. बरोबर ६-१५ वाजतां लंडनच्या

भव्य व्हिक्टोरिया स्टेशनांत गाडी उभी राहिली आणि आमच्या राज्य-कर्त्यांच्या त्रिखंडप्रख्यात राजधानींत—लंडनमध्ये मी उतरलों.

लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनांतील प्लॅटफॉर्मवर पाऊल ठेवतांना एक प्रकारच्या अननुभूत काळजीने माझें अंतःकरण धडधडत होतें. माझें पत्र वेळेवर पोचून कुणी तरी हिंदी दोस्त मला घ्यायला स्टेशनवर आला असेल का ? भाषेची पंचाईत नव्हती. पण छत्तीस तासांच्या प्रवासाने मी दमून गेलों होतों आणि या एवढ्या मोठ्या लंडन शहरांत संध्याकाळच्या वेळेला जवळचे पत्ते हातांत घेऊन जागा हुडकीत जायचें माझ्या जिवावर आलें होतें. सर्व इंग्रज उतारू उतरून गेले होते. माझ्या बॅग्ज खाली उतरून मी इकडेतिकडे पहात होतों. इतक्यांत निळ्या सर्जचा सूट घातलेला एक ठेंगणासा पण भरभक्कम बांध्याचा हिंदी तरुण माझ्या दृष्टीला पडला. माझ्या छातीवरची धोंड उचलल्यासारखी होऊन मला इतका आनंद झाला की त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाही. हेच श्री. ताम्हनकर असावेत असा मी तर्क केला. त्या तरुणाची दृष्टि माझ्याकडे गेल्यावरोबर त्याने मला विचारलें

"आपण काणेकर का ?"

"हो" मी म्हणालों, "आपण ताम्हनकर ना?"

"छे, छे, मी चाफेकर!" तो तरुण म्हणाला.

ताम्हनकरांनी या चाफेकरांना मला उतरून घ्यायला पाठविले होते. श्री. चाफेकर हे एक धाडसी तरुण असून त्यांची हकीकत मनोरंजक आहे.

त्यांच्या टॅक्सींतून मी स्टेशनच्या बाहेर पडलों. बाहेर सुरेख सोनेरी ऊन पडलें होतें. गेले चार-सहा दिवस लंडनची हवा फार सुंदर असल्याचें कळले, मुंबईला सँढर्स्ट रोड नाक्यावर जेवढी मोटारींची गर्दी असते, त्याच्या दसपट मोटारींच्या गर्दीतून आमची मोटर चालली आहे आत्यंतिक कुतूहलाने मी दोहों बाजूंना पहातों आहे. चार-सहा दिवसांनीं 'कॉरोनेशन' असल्यामुळे इमारतीवरती युनियन जॅक्स् फडकताहेत. प्रथमदर्शनीच लंडन मला कसें दिसलें? आमच्या मुंबईच्या फोर्टमध्ये जशा मोठमोठ्या दगडी इमारती आणि रस्ते आहेत. तसाच देखावा इथे दिसतो आहे. मात्र फार मोठ्या प्रमाणावर माणसांची आणि वाहनांची गर्दी मुंबईपेक्षाहि कितीतरी पटींनी मोठी! जणू काय रोजच जत्रा भरत आहे. लंडनच्या दगडी इमारती प्रचंड

आणि भव्य आहेत पण इंग्लंडच्या विशिष्ट हवेमुळे बाहेरून त्या इतक्या काळवंडून गेलेल्या आहेत, कीं आदले दिवशीं या शहराला आग लागली होती की काय, असा भास होतो. एखाद्या इमारतीला जर चुकून आपण घासून गेलों, तर कोटाला काजळी लागेल की काय अशी भीति वाटते. सदैव पावसाळी हवा आणि कारखान्यांच्या धुराड्यांतले, प्रत्येक घराच्या निरनिराळ्या धुरांड्यांतले नाना तऱ्हेचे धूर वातावरणांत जमत असल्यामुळें इमारतींवर अशी काजळी चढत असावी, असें मला वाटलें.

हाईड पार्क, पिकॅडिल्ली इत्यादि वाचनामुळे परिचित असलेल्या लंडनच्या भागांतून आमची मोटार चालली आहे. पिकॅडिल्ली हा लंडनचा गाभा समजला जातो आणि लंडन हें जगाचें व्यापारी केंद्र असल्यामुळे इंग्रजलोक पिकॅडिल्लीला सर्व जगाचें काळीज (Heart of the world) समजतात! लंडनचा हा अत्यंत मध्यवर्ति आणि भपकेबाज भाग आहे. नाना तऱ्हांच्या चित्रविचित्र रंगांची हजारों विद्युत्‌चिन्हें (Neon-Signs) चारी बाजूंना चमकताहेत.

दोन-तीन आठवडेच मला लंडनमध्ये रहावयाचें असल्यामुळे उगाच कुठे तरी नवख्या ठिकाणीं राहून दर वेळेला रस्ते शोधीत बसण्यापेक्षा बरेचसे महाराष्ट्रीय विद्यार्थी रहात असलेल्या हँपस्टेड हीथवरील चाफेकरांच्या होस्टेलमध्येच रहावयाचें मीं ठरवलें. घरी पोंचेपर्यंत सात वाजले होते महाराष्ट्रीय भाषा आणि महाराष्ट्रीय चेहेरे आजूबाजूला दिसल्यामुळे अगदी स्वतःच्या घरासारखे एकदम मला वाटू लागलें. त्यांत आणखी भात, आमटी आणि कॉलीफ्लॉवरची भाजी खायला मिळाली! यापेक्षा आणखी काय पाहिजे?

जेवल्यानंतर एका मित्राबरोबर मी फिरायला बाहेर पडलों. आठ साडेआठ वाजले होते. पण बाहेर ऊन चांगलेंच होतें. आमची जागा थोडीशी मलबार हिलसारखी उंचावर आहे. पार्लमेंटहिलरोडने खाली पायथ्याशी आलों तों नाक्यावरच दोन सभा चालल्या होत्या. सभा म्हणजे एक पायाची खुर्ची तिच्यावर एक वक्ता उभा आणि आजबाजूला जमलेले तीस-चाळीस तमासगीर! लंडनमध्ये असल्या शेकडो सभा दररोज ठिकठिकाणी होतात. कुठेहि खुर्ची ठेवावी आणि बोलायला सुरुवात करावी. गाडीघोड्यांना आणि

रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यांना अडथळा न झाला म्हणजे झालें. पोलीस इतकीच काय ती काळजी घेतात या पलीकडे कांही करीत नाहीत. तुम्ही वाटेल तें घसा कोरडा पडेपर्यंत बोला. हें इंग्लंडचें भाषण स्वातंत्र्य. (Freedom of Speech !) वर उल्लेखिलेल्या दोन सभांपैकी एक फॅसिस्टांची होती दुसरी लंडनमधल्या 'बसवाल्यांची' होती. लंडनमध्ये सध्यां बसचा संप चालू आहे. एका सभेपासून थोड्याशा पावलावर दुसरी सभा चालू आहे. याच गल्लोगल्ली होणाऱ्या सभांना 'Street corner meetings' म्हणतात आणि या वक्त्यांना खोकेठोके 'Tub thumpers' म्हणतात !

● ● ●

१०

# घरकुल

इबसेनच्या " A Doll's House" या विख्यात नाटकाची ही मराठी प्रतिकृति आहे.

या नाटकांत चार-पांचच पात्रें आहे. रमाकांत, लता हें जोडपें; मुक्ता ही लताची मैत्रीण, रामनाथ हा रमाकांताच्या ऑफिसमध्यें काम करणारा व डॉक्टर हे रमाकांत व लता यांचे स्नेही. येथें घेतलेला भाग हा नाटकाचा शेवटचा भाग आहे. तत्पूर्वींचें कथानक खालीलप्रमाणे आहे.

लता व रमाकांत ह्या विवाहित जोडप्यास तीन मुलें असून त्यांचा संसार एकंदरीने सुखाचा चालेला दिसतो. रमाकांत याची ऑफिसचे 'मॅनेजर' म्हणून नेमणूक होणार असते. लताची संसारांतील भूमिका ही एक केवळ 'शोभेची बाहुली' या प्रकाराची होती. रमाकांताच्या आजारीपणांत लताने रामनाथकडून कर्ज काढलेलें असतें व त्यासाठीं खोटे कागदपत्रहि ती तयार करते व स्वतःच्या श्रमाने ती पैसे फेडीत असते. मध्यंतरीच्या कालांत रमाकांत मॅनेजर होतो व रामनाथाला नोकरीवरून काढून टाकतो. कारण रामनाथने पूर्वी एका खोटचा दस्तऐवजावर सही केली होती. जो गुन्हा रामनाथने केलेला असतो तशाच स्वरूपाचा गुन्हा नेमका लताने केलेला असतो. हें जेव्हा रमाकान्ताच्या ध्यानांत येतें तेव्हा तो बेचैन होतो व लतास म्हणतो कीं, "तुझ्यासारख्या कमजात चारित्र्याच्या बाईच्या हाताखालीं माझ्या मुलांचं शिक्षण होतां उपयोगी नाही . . . . आता जगापुढे एकत्र संसाराचा देखावा करावयाचा—केवळ अब्रूसाठीं."

मुक्तामुळे रामनाथ जेव्हा लतेने केलेले खोटे कागदपत्र परत करतो तेव्हां आनंदित होऊन रमाकांत ते जाळून टाकतो व लतेला म्हणतो कीं, "अगदीं पहिल्यासारखी आपण दोघं राहूं. खरंच मी तुला क्षमा—अगदीं

मनापासून क्षमा केली आहे. . . . अगदी अस्सा माझ्या या चिमण्या नाजुक पाखराला मी सांभाळणार . . . ." यापुढील संवाद खाली दिलेला आहे.

श्री के. नारायण काळे यांनी प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणे "इब्सेनची नाटकें समस्यांवर आहेत. पण तो समस्या सोडवून दाखवीत नाही. तो तयार उत्तरें देत नाही. ज्यानें त्याने ती समस्या स्वतःच सोडवावी, स्वतःचीं उत्तरें स्वतःच काढावी."

शिक्षणामुळें समाजांतील स्त्रियांना दिवसेंदिवस एक आगळें व्यक्तिमत्त्व येत आहे; स्त्रियांच्या मनाचा विकास होत आहे. त्यामुळे अशा तऱ्हेच्या व अन्य कांही समस्या समाजापुढे निर्माण होत आहेत व होत राहतील समाजांतील विचारवंतांनी कालाचा ओघ लक्षांत घेऊन त्यांवर उपाययोजना कोणती याचें विवरण आपापल्या परीनें केलेलें आहे. वाचकांनी या समस्येचा विचार अवश्य करावा व आपल्या विचारांना चालना द्यावी, याच हेतूने हा उतारा येथे घेतला आहे.

★ ★ ★

(लता नेहमीच्या कपड्यांत, हातांत एक बॅग घेऊन व पायांत चपला घालून बाहेर येते. रमाकांत आश्चर्यानें चमकून तिच्याकडे पहातो.) अं, हें काय ?

लता : कां ? (घड्याळाकडे बघून) फार नाही वाजले.

रमाकांत : म्हणजे ?

लता : बसा. सांगतें. मला पुष्कळ बोलायचं आहे तुमच्याशी.

(टेबलाजवळील खुर्चीवर बसते.)

रमाकांत : असं काय एखाद्या अनोळखी माणसासारखा निर्विकार चेहरा करून बोलते आहेस माझ्याशीं ?

लता : बसा तुम्ही इथं.–मला बरंच बोलायचंय आहे तुमच्याशीं.

रमाकांत : (तिच्या समोरील खुर्चीवर बसतो) लता, अशी घाबरवूं नको मला. काय, झालं काय ? कांहीच समजत नाही मला तुझें हें ?

लता : अगदी खरं आहे ! तुम्हाला मी काय आहे हे समजत नाहीं. आणि मला तुम्ही काय आहां हें समजलं नव्हतं,–निदान तरी आज रात्रीपर्यंत. (रमाकांतांचें तोंड हालल्यासारखें होतें) हं मध्येच मला थांबवूं नका

कृपा करून ऐका मला काय सांगायचं आहे ते. मला आपणामधील सर्वच गोष्टींचा आज निकाल लावायचा आहे, समजलं ?

रमाकांत : म्हणजे ?

लता : (कांही वेळ स्वस्थ त्याच्याकडे पहात राहून) जरा चमत्कारिक नाही वाटत तुम्हाला, आज आपण अशा तऱ्हेने बोलत बसलों आहोंत तें ?

रमाकांत : म्हणजे ?

लता : आपल्या लग्नाला जवळजवळ आठ वर्षे होऊन गेलीं, नाहीत ?

रमाकांत : मग ?

लता : तेवढ्या अवधींत, अशा तऱ्हेनें नवराबायको म्हणून संसारांतल्या एका तरी गोष्टीसंबंधानें आपण गंभीरपणें बोलत बसलों होतों का ?

रमाकांत : [गंभीरपणें] म्हणजे ?

लता : या आठ वर्षांत–आठ कां जास्त--संसारांतल्या अनेक बाबतींपैकी एकीसंबंधी तरी आपणा दोघांत कधी गंभीर चर्चा झाली आहे काय ?

रमाकांत : रोजच्या व्यवहारांतल्या नानातऱ्हेच्या भानगडी, चिंता आणि काळज्या मी तुला सांगत बसायला पाहिजे होतें, असं तुला वाटतं होय ? बरं, त्या तुला सांगून तुझा मला त्यांत उपयोग तरी काय होणार होता ?

लता : मी तुमच्या बाहेरच्या धंदा-व्यवहाराच्या गोष्टी बोलत नाही. माझं एवढंच म्हणणं, की, आपण दोघांनी शांतपणे एका ठिकाणीं बसून एकातरी गोष्टीचा खोलपणीं विचार केला आहे काय ?

रमाकांत : पण लता, त्याचा कांही तरी तुला उपयोग झाला असता का ?

लता : हेंच तें ! मी काय आहें, हें तुम्हाला कधीच समजलं नाही. माझं दोन व्यक्तींनी भयंकर नुकसान केलं आहें. पहिल्यांदा बाबांनी आणि नंतर तुम्ही !

रमाकांत : काय ? आम्हीं दोघांनी ?–स्वताच्या जीवापलीकडेहि ज्या दोघांनी तुझ्यावर प्रेम केलं, त्या आम्ही दोघांनी ?

लता : (डोकं हालवीत) नाही, नाही---प्रेम असं माझ्यावर तुम्ही मुळीच केलं नाही,---माझ्यावर तुमचं प्रेम आहे या गोड कल्पनेंतच तुम्हाला आनंद होत होता.

रमाकांत : लता, लता, काय बोलतेस तू हें ?

लता : अगदीं खरं, खरं बोलतें आहें. जेव्हा माहेरीं होतें तेव्हा बाबा प्रत्येक गोष्टीसंबंधी मला आपलं स्वतःचं मत सांगत असत; आणि मलाहि त्या गोष्टीसंबंधानें माझंहि मत तेंच आहे, असं म्हणावं लागत असे. कां ?– तर, माझं मन निराळं आहे असं सांगायचा मी धीर केला असता, तर बाबांना वाईट वाटलं असतं ! ते मला 'आपली लाडकी बाहुली' म्हणत असत. आणि गाडूच्या बाहुल्या बरोबर जशी मी खेळत असें, तसे माझ्या बरोबर ते खेळत असत ! आणि नंतर--नंतर मी तुमच्याकडे रहायला आल्यापासून––

रमाकांत : अंः आपल्या वैवाहिक आयुष्यासंबंधी काय हे शब्द वापरतेस ? माझ्याकडं राहणं––अं !

लता : (शांतपणें) होय, माझं एवढंच म्हणणं की, बाबांची बाहुली त्यांच्या हातांतून तुमच्या हातांत आली ! तुम्हाला आवडेल तशी तुम्ही आपल्या संसाराची मांडणी करीत होतां.––आणि अर्थात् तुमची आवड तीच माझी आवड होती.––आता खरोखर तशी माझी आवड होती, की मी तसं ढोंग करीत होतें, कुणाला ठाऊक ! कदाचित् तसेहि असेल ! कारण माझी तशी आवड नाही, असं मी म्हटलं असतं तर तुम्हाला तें आवडलं नसतं !–– आपल्या मागल्या आयुष्याचा जेव्हा मी विचार करते तेव्हा मला असं वाटतें, की केवळ अन्नाबारी राबणाऱ्या एखाद्या गरीब स्त्री-सारखं माझं आयुष्य होतं ! खायचं, प्यायचं आणि हासून खिदळून–नाचून बागडन तुमचं मन रिझवायचं, हीच माझी इतिकर्तव्यता होती ! पण तेंच तुम्हाला हवं होतं ! तुम्ही आणि बाबांनी माझा घोर अपराध केला आहे. माझ्या जीवनाची अशी दशा होण्याचं कारण तुम्ही दोघं !

रमाकांत : तुझ्या बोलण्यांत कांही अर्थ आहे काय ? किती कृतघ्न आहेस तू लता ? माझ्या घरीं सुखी नव्हतीस का ?

लता : नाही, नव्हतें, कधीच नव्हतें ! नुसत्या पोरकट आनंदांत होतें तुम्हीं माझी काळजी घेत होता आणि मोठ्या सदयतेनें मला वागवीत होतां हें खरं आहे. पण आपला संसार म्हणजे भातुकलीचा खेळ होता ! जशी माहेरीं मी बाबांची 'लाडकी बाहुली' होतें, तशी तुमची मी इथे 'खेळांतली.

बायको' होते! माहेरी मला शाडूच्या बाहुल्या होत्या खेळायला; आणि इथे–तुमच्या इथे माझी मुलं–माझ्या बाहुल्या! त्या चिमुकल्याशी मी खेळतांना, त्यांना जसा आनंद होत असें तसाच तुम्ही माझ्याशी 'संसाराचा खेळ' खेळतांना होत असें. आपला संसार हा असा होता. समजलं?

रमाकान्त : तूं म्हणतेस त्यांत थोडंस सत्य आहे– पण तूं मात्र त्याचा फार बाऊ करते आहेस.–तें मागचं जाऊ दे. पण यापुढे तरी आपला संसार निराळा व्हावयाला कांही हरकत नाही. म्हणतात ना, 'खेळायच्या वेळीं खेळावं, आणि धड्याच्या वेळी धडे घ्यावे.'

लता : कुणाला धडे देणार आपण?–मला की आपल्या बाळांना?

रमाकान्त : लता, असं काय?–दोघांनाहि. माझी ना तूं?

लता: अं हं! लायक पत्नी व्हायचं शिक्षण मला द्यायला आपण खास पात्र नाही.

रमाकान्त : लता, ! तूं,–तूं हें बोलतें आहेस?

लता : मी? का बरं? आपल्या मुलांना शिकवण्या सवरण्याचं काम माझ्यासारख्या 'कमजात' चारित्र्याच्या बाईच्या हाताखाली होणं शक्य नव्हतं ना?

रमाकान्त : लता?

लता: नाही बोललांत तुम्ही थोड्याच वेळांपूर्वी असं?

रमाकान्त : रागांत मी बोलून गेलों असेन लता, पण त्यालाच धरून कां बसतेस तूं एवढी?

लता : नाही, नाही. अगदी खरं बोललांत तुम्ही तें. खरोखरच माझ्या मुलांना शिक्षण द्यायची माझी लायकी नाही. तें कर्तव्य करण्यापूर्वी मला दुसरं कर्तव्य पार पाडलं पाहिजे. आयुष्यांतलें धडे माझे मी स्वत: घेतले पाहिजेत पहिल्यांदा–आणि तें काम माझ्यासाठी तुम्हीं करूं शकणार नाही. तें मी स्वत:च केलं पाहिजे, आणि म्हणूनच मी तुम्हाला सोडून ही अशी निघून जातें आहे.

रमाकांत : (एकदम ताडकन उठून) काय म्हणतेस?

लता : मला स्वत:ची लायकी जर जाणावयाची असेल आणि आयुष्यांतले धडे शिकायचे असतील, तर तें काम मला एकटीला स्वत:च्या हिमतीवरच

केलं पाहिजे; आणि म्हणूनच यापुढं एक क्षणभरहि मी तुमच्या इथं राहू शकत नाहीं.

रमाकान्त : लता, लता !

लता : ही आता अशी चाललेंच मी इथून. रात्रीची वेळ असली तर मुक्ताचं घर जवळच आहे. ती खात्रीने मला आसरा देईल.

रमाकान्त : खास तुला वेड लागलंय. मी मुळीचं जाऊ देणार नाही तुला ! बस, असलं भलतं सलतं कांही एक करायचं नाही.

लता : यापुढे मला 'असें करूं नको नि तसं करूं नको' सांगणं व्यर्थ आहे ! माझं स्वतःचं असं जे कांही आहे तेवढंच घेऊन मी जाणार. तुमचं कांहीहि घेणार नाही—आत्ताच नव्हे तर यापुढेहि !

रमाकान्त : काय हा वेडेपणा आहे तरी कोणत्या तऱ्हेचा ?

लता : आजची रात्र मुक्ताकडे राहीन; आणि मग काय करायचं ते उद्या ठरवीन.

रमाकान्त : मूर्ख पोरी—

लता : होय मूर्ख ! म्हणूनच मला आता हा प्रयत्न करून थोडासा शहाणपणा शिकला पाहिजे.

रमाकांत : आपलं घर, आपला नवरा, आपलीं साजरीं गोजरीं मुलं सोडून तूं चालती होणार ? लोक काय म्हणतील याचा तरी विचार केला आहेस का ?

लता : काय म्हणून विचार करूं मी त्याचा ? मला एवढं स्पष्ट कळतं आहे, की असं केल्याशिवाय मला गत्यंतर नाही.

रमाकांत : काय भयंकर बोलते आहेस तूं हें ? आणि असं करून स्त्रीला अत्यंत आवश्यक असलेल्या अशा आपल्या कर्तव्यापासून तूं च्युत होणार ?

लता : कोणती तीं माझीं अत्यंत पवित्र कर्तव्यें ?

रमाकांत : तुला तीं सांगितली पाहिजेत होय ? आपल्या पतीसंबंधी आणि मुलांसंबंधी तुला कांहीच कर्तव्यं नाहीत काय ?

लता : त्यांच्याइतकीच दुसरीं पवित्र कर्तव्यें मला आहेत.

रमाकांत : शक्य नाही. काय असणार अशीं कर्तव्यें ?

लता : माझ्यासंबंधीचं माझं कर्तव्य.

रमाकांत : या सर्वाआधी तू पत्नी आणि माता आहेस हें लक्षांत ठेव.

लता : त्या नाटकी गप्पा मी आतापर्यंत खूप ऐकल्या आहेत. इतःपर त्यावर माझा विश्वास नाही. माझा आता एकाच गोष्टीवर विश्वास आहे आणि ती ही की, मीहि तुमच्यासारखाच एक धडधाकट बुद्धि शाबूत असलेला मनुष्यप्राणी,–निदान तसं होण्याचा मला प्रयत्न तरी केला पाहिजे. हें खास. एवढं खरं, आणि त्याबद्दल माझी खात्री आहे, की तुमच्याप्रमाणे विचार करणारींच माणसे खूप आहेत, आणि ती तुम्ही म्हणतां तेंच-बरोबर म्हणतील. जाडयाजाडया पुस्तकांतूनहि तेंच लिहिलं आहे ; पण लोक काय म्हणतात आणि पुस्तकांतून काय सांगितलं आहे, त्यांना माझं इतःउत्तर समाधान होणं शक्य नाही. सर्व गोष्टीच्या संबंधीने माझा मीच विचार केला पाहिजे, आणि त्या समजून घेतल्या पाहिजेत.

रमाकांत : स्वतःच्या घरीं राहून या गोष्टी तुला करतां येणार नाहीत का ? असल्या गोष्टींत अचूक मार्ग दाखविणारा मार्गदर्शक तुला इथं मिळेल त्याच्या विचार केला आहेस कां ? कांही नीतिधर्म तुला आहे की नाही ?

लता : खरंच धर्म म्हणजे काय तें मला अजून नीटसें कळलेलें नाही.

रमाकांत : काय म्हणतेस काय तू ?

लता : काय ? खरं तेंच बोलतें आहे. शास्त्रीपुराणिकांच्या बडबडीशिवाय धर्माविषयीं मला दुसरं कांहीच माहिती नाही. धर्म म्हणजे अमुक आणि धर्म म्हणजे तमुक, असं ते म्हणतांना मीं ऐकलं आहे. मी स्वतःच्या हिमतीवर राहूं लागलें म्हणजे याहि गोष्टीचा विचार करीन. नंतर पाहिन मी, की शास्त्री-पुराणिकांच्या त्या बडबडींत कांही तथ्य आहे किंवा काय ? निदान माझ्या अनुभवाशीं तरी त्यांतलं कांही जुळतं किंवा नाही ?

रमाकांत : तुझ्या वयाच्या पोरीने असं बोलणं म्हणजे अगदी मर्यादेपली-कडचें आहे ! पण धर्म जर तुझा मार्ग तुला दाखवीत नाही, तर निदान तुझ्या सदसद्‌विवेक बुद्धीला तरी मला जागी करूं दे. कांही नीति-अनीतीची तरी कल्पना तुला आहे कीं नाही ? की तेंहि नाही ?

लता : हें पहा, हा प्रश्न तितकासा सोपा नाही. खरंच, मला कल्पना नाही. खरोखरच ही गोष्ट मला बुचकळयांत पाडते. एवढं मात्र मला ठाऊक आहे की, या बाबतींत तुमच्या आणि माझ्या कल्पनेत फार अंतर आहे. कायदा

कायदा म्हणतात, तीहि गोष्ट कांही भलतीच आहे, असं मला वाटूं लागलं आहे. कायदा बरोबर आहे, अशी माझी खात्रीच पटत नाहीं. मरणाच्या दारांत पडलेल्या आपल्या वृद्ध वडिलांना त्रास होऊं नये म्हणून, किंवा आपल्या पतीचे प्राण वाचवावे म्हणून एखाद्या बाईला एका कागदावर दुसऱ्याची साधी सहीहि करायचा हक्क नाही म्हणे !

रमाकांत : लहान पोरासारखी कांही तरी बडबडते आहे ! ज्या जगांत आपल्याला रहायचं आहे, त्यांतील परिस्थितीची तुला कांहीच कल्पना नाही.

लता : होय. खरंच नाहीं. पण आता मात्र मी प्रयत्न करून बघणार आहें. जगाचं म्हणणं बरोबर आहे की माझं म्हणणं बरोबर आहे, हें पटवून घेण्याचा मी प्रयत्न करणार आहें.

रमाकांत : लता, तुला बरं वाटत नाही. भ्रम झाल्यासारखी तूं बोलते आहेस. मला वाटतं जवळ जवळ तुझं डोकं फिरलं आहे.

लता : छे ! उलट आज माझे डोळे उघडल्यासारखे मला वाटताहेत. इतक्या स्पष्टपणे नी न कचरतां माझ्या मेंदूने कधीच विचार केला नव्हता.

रमाकांत : आणि स्वतःच्या नवऱ्याला आणि मुलांना इतके डोळे उघडे ठेवून तूं सोडून जात आहेस ?

लता : होय. अगदी सत्य.

रमाकांत : इतउत्तर माझ्यावर तुझं प्रेम नाही ?

लता : होय, खात्रीने तसंच.

रमाकांत : (ओरडून) लता ! तूं असं—

लता : खरंच मला किती दुःख होत आहे हें बोलतांना. तुम्ही मला फार चांगल्या तऱ्हेने वागवीत होतां; पण माझा नाइलाज आहे. खरंच माझं इतउप्पर तुमच्यावर प्रेम नाही.

रमाकांत : (मन शांत करून) पूर्ण विचारान्तीं तुझी खात्रीं झाली आहे ?

लता : होय. अगदी पूर्ण. आणि म्हणूनच इतउत्तर इथं राहणं मला शक्य नाहीं.

रमाकांत : असं काय मीं केलं, की ज्यामुळें तुझं प्रेम असं एकदम पार उडून गेलं ? सांगू शकशील तूं ?

लता : होय. शकेन. आज रात्रीं कांहीतरी अलौकिक, दिव्य गोष्ट आपल्या दोघांच्या आयुष्यांत घडणार असं मला वाटत होतं. पण ती घडली नाही. तेव्हा माझी खात्री पटली, तुम्ही मला जसे वाटत होतां, तसे नाही.

रमाकांत : म्हणजे काय ? मला समजत नाही.

लता : आठ वर्षं आपल्या लग्नाला झालीं. नाही ? प्रशांत वेळीं आपण दोघं एके ठिकाणीं असतांना, हृदयाला हृदय भिडवून किती वेळां तुम्ही म्हणालां होता की माझ्यापेक्षा तुम्हाला कांहीच प्रिय नाही-- माझ्यासाठी तुम्ही वाटेल तें कराल ! आणि किती जिवाभावाने मी तुमच्या खांद्यावर मान टाकली होती ! माझी खात्री होती की आम्हा स्त्रियांना वाटणाऱ्या असल्या अलौकिक आणि दिव्य गोष्टी—ज्या वेळी पुरुषाच्या आमच्यावरील प्रेमाची कसोटी लागते—त्या रोज घडत नाहीत. तो प्रसंग आयुष्यांत एकदां केव्हातरी येतो. आठ वर्षं वाट पाहिल्यावर गेल्या दोन दिवसांत हा भयंकर प्रसंग माझ्यावर आला आणि अगदी भक्तिभावाने मला वाटलं की शेवटी ही अलौकिक दिव्य गोष्ट घडणार. रामनाथचं पत्र जेव्हा त्या पेटींत पडलेलं मीं पाहिलं, तेव्हा एक क्षणभरसुद्धा मला वाटलं नाही की त्याच्या अपमानकारक अटी कबूल करून तुम्ही त्याचं तोंड बंद कराल. माझीं अगदी मनोमन खात्री होती की, तुम्ही त्याला म्हणाल—जा. आणि सगळ्या जगाला ओरडून सांग—आणि असं सांगितल्यावर—

रमाकांत : हें असं सांगितल्यावर काय ?—माझ्या बायकोची सर्व जगांत बेअब्रू नि छीः थू झाल्यावर मग काय ?

लता : आणि तितकाच माझा पुरेपूर विश्वास होता, की असं सांगितल्यावर तुम्ही बेडरपणें सर्व जगापुढे जाल आणि छातीवर हात ठेवून म्हणाल, की यांत माझ्या पत्नीचा कांहीएक दोष नाही. याची सर्व जबाबदारी माझ्यावर आहे.

रमाकांत : लता !

लता : काय ? तुम्हांला वाटतं, माझ्यासाठी एवढा भयंकर स्वार्थत्याग तुम्ही केला असता, तर मला तें चाललं नसतं होय ना ? होय, होय. खरंच तें मला चाललं नसतं. माझ्या वेडीच्या जीवासाठी माझ्या लाडक्या पतींनी स्वतःचें एवढं भयंकर नुकसान केलं असतं तर खरंच,—खरंच मला तें

सहन झालं नसतं आणि असली अलौकिक आणि दिव्य गोष्ट घडणार या खात्रीनेच पदर कमरेला बांधून परसांतल्या काळ्याकभिन्न विहिरींत जीव द्यायला मी तयार झालें होतें.

रमाकांत: लता, लता! तुझ्यासाठी मी रात्रंदिवस राबलों असतों, उन्हा-तान्हांतून फिरलों असतों, उपाशी मेलों असतों, पण प्रिय माणसासाठी झालं म्हणून स्वतःच्या नांवाला कोण काळिमा लावून घेईल?

लता: कां? आजपर्यंत शेकडो हजारो बायकांनी हें केलें आहे.

रमाकांत: कशी अगदी लहान पोरासारखी तूं कांहीतरी विचार करते आहेस, नि कांही तरी बोलते आहेस.

लता: असेल. पण तुम्ही मात्र ज्या तऱ्हेने विचार करतां आहांत आणि ज्या तऱ्हेने बोलतां आहांत, तसा विचार नि आचार असलेल्या माणसाशीं माझी जन्माची गाठ पडावी असं मला नाही वाटत. जेव्हा तुमच्यावरचं संकट टळलं असं तुम्हाला वाटलं-तेंसुद्धा कसलं संकट? आपल्या पत्नीवर भयंकर प्रसंग आला हें नव्हे तर स्वतःच्या नांवलौकिकाला काळं लागण्याचा प्रसंग आला हे–तेव्हा–तेव्हा तुम्ही एकदम पहिल्यासारखे झालात.–तुमच्या धर्माधर्माच्या, नीति–अनीतीच्या कल्पना, तुमची तत्त्वनिष्ठा–सगळं सगळं पार उडून गेलं; आणि आता आपण मागचं सर्व विसरून पुन्हा पाहिल्यासारखं वागूं या–पुन्हां बाहुलीचा संसार चालू करूं या–असं तुम्ही मला सांगूं लागला! जसं कांही कांहीच झालं नाही, अशी तुमची खात्री झाली! पुन्हा मी तुमची मैना, बुलबुल, नी नाजुक पाखरूं झालें! इतकंच नव्हे तर ही बाहुली केव्हा फुटेल नी तुटेल यांचा नेम नाही. म्हणून यापुढे तुम्ही माझी दुप्पट काळजी घ्याल असं तुम्ही म्हणूं लागला. (उठून उभी राहते) त्याच क्षणीं–त्याच क्षणीं–माझ्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला की आठ वर्षं मी परपुरुषाच्या सहवासांत रहात होतें–इतकेंच नव्हे तर त्याच्यापासून मला तीन मुलंहि झालीं! नाही–नाही. मला आता तो विचारहि सहन होत नाही! स्वतःच्या देहाच्या चिंधड्या चिंधड्या करून टाकाव्याशा वाटतात!

रमाकांत: (खिन्नपणे) आलं लक्षांत माझ्या. खरं आहे लता. तुझ्या आणि माझ्या अंतःकरणामध्ये एक खोल, रुंदच्या रुंद काळी भोर दरी पसरली

आहे खरी. पण लता, ती ओलांडून आपलीं अंतःकरणं पुन्हा एकमेकांना मिळणं शक्य नाही का ?

लता: आतां ही मी आहें तशीच असतांना तुमची पत्नी म्हणन रहाणं शक्य नाही.

रमाकांत : पण माझ्यांत बदल होणं शक्य नाही का ?

लता : होईल. कदाचित–तुमची जिवंत बाहुली तुमच्या हातांतून निघून गेली तर !

रमाकांत : पण तुझ्यापासून निराळं रहाणं–तूं माझ्याजवळ नसणं-नको नको; लता मला ती कल्पनाहि सहन करवत नाही.

लता: म्हणूनच तर मी इथन निघून जाणें फार, फार जरुरीचे आहे. (बॅग उचलते.)

रमाकांत : लता, लता ! आता जाऊं नको, उद्यापर्यंत तरी थांब.

लता : छे, छे, परपुरुषांच्या घरांत रात्र काढणं शक्यच नाही.

रमाकांत : कां ? आपण भाऊबहीण म्हणूनसुद्धा राहूं शकणार नाही का ?

लता : (बॅगचा राहिलेला पट्टा बांधीत) उगाच बोलण्यांत काय अर्थ आहे ? तुम्हाला पूर्ण माहीत आहे की तसं फार दिवस राहणं शक्य नाही. बरं येतें तर मी. माझ्या छबकड्यांना नाही पहात आता. (जरा बाजूला तोंड करून डोळे दंडाने पुसते.) बायाआजी माझ्यापेक्षा कितीतरी पटींनी त्यांना लहानाची मोठीं करायला लायक आहे आणि नाही तरी मी जीव दिला असता तर ? तरी काय -(जाऊं लागते) ही मी आहें अशी, त्यांची आई व्हायला खात्रीने नालायक आहें.

रमाकांत : पण लता पुढे केव्हा तरीं–

लता: तें कसं सांगूं मी ? पुढे काय होईल याची खरोखरच मला कल्पना नाही.

रमाकांत : पण कांही झालं तरी तूं माझी पत्नी आहेस.

लता : हें पहा, मीं असं ऐकलं की, बायको स्वतः होऊन नवऱ्याला सोडून गेली, तर कायद्याप्रमाणे नवऱ्यावर कांही जबाबदारी रहात नाही. तें कांही असो. पण माझ्या बाबतींत तरी मी स्वतः होऊन तुम्हाला सर्व जबाबदारींतून,

साफ मोकळे करतें. तुमच्या नि माझ्या संबंधाचे एकूण एक धागेदोरे साफ तुटले म्हणून समजा. आपणा दोघांनाहि पूर्ण स्वातंत्र्य असलं पाहिजे यापुढे. आपल्या विवाहाला बरोबर एक वर्ष झालं त्या दिवशी लहानपणापासून मोठ्या प्रेमाने बाळगलेली माझ्या आईची अंगठी मीं तुम्हाला दिली होती. आठवतं का ? आणि तुम्हीहि आपल्या बोटांतील अंगठी माझ्या बोटांत घातली होती त्या दिवशी. ही घ्या ती अंगठी (बोटांतली अंगठी काढून देते) आणि माझीहि अंगठी मला परत द्या.

रमाकांत : अगदी शेवटच हा ?

लता : होय, अगदी शेवट !

रमाकांत : ही घे तर अंगठी (बोटांतील अंगठी काढून देतो.)

लता : झा सर्व संपलं ! सर्व किल्ल्या तुमच्या टेबलावर ठेवल्या आहेत.

रमाकांत : संपलं ! संपलं ! सगळं संपलं ! ! –लता, माझी आठवण पुन्हां होणार नाही तुला केव्हा ?

लता : कां ? किती तरी वेळां तुमची, माझ्या लहानग्यांची आणि या घराची आठवण मला होईल.

रमाकांत : मी तुला पत्र पाठविलं तर चालेल का ?

लता : छे, छे ! नको. कधीच नको.

रमाकांत : पण निदान केव्हा तरी, कांहीं तरी मीं तला पाठविलं तर ?

लता : कांही नको, अगदी कांहीं नको.

रमाकांत : तुला कधी जरूरच लागली तर माझी मदत–

लता : छे, छे, छे ! परपुरुषाची मदत मला मुळीच नको.

रमाकांत : लता, मी आतां तुझा अगदी कायमचाच कुणी नव्हे कां ? पुढे केव्हाहि माझ्याविषयीं तुला पहिल्यासारखं प्रेम वाटणार नाही ?

लता : (सुस्कारा टाकून) अहाहा ! अत्यंत अलौकिक आणि दिव्य असं कांही झालं तर, तर–

रमाकांत : बोल, बोल लता, काय तें ?

लता : तुमच्यांत आणि माझ्यांत इतका अतर्क्य बदल झाला पाहिजे. की –पण छे ! शक्यच नाही तें ! अलौकिक आणि दिव्य गोष्टी घडतात असं वाटतच नाही मला मुळी आता !

रमाकांत : पण मला तशी खात्री वाटू लागली आहे. लता, सांग सांग, इतका अतर्क्य बदल झाला पाहिजे की, की–काय बोल, बोल, लता !

लता : की आपलं वैवाहिक जीवन म्हणजे दोन मानवी जीवनसरिता, अगदी एकजीव होऊन त्यांचा एकच भव्य प्रवाह झाला पाहिजे. (दरवाजा उघडून बाहेर जाते. दरवाजा लोटते आणि जिन्यावरून सरळ खाली निघून जाते).

रमाकांत : (तिच्याकडे पहात उभा रहातो. ती गेल्यावर मटकन् खुर्चीवर बसतो आणि दोन्ही हातांनी कपाळ धरतो. मोठ्याने) लता, लता ! (उठतो, आजूबाजूला इकडे तिकडे पहातो) गेली, गेली, लता गेली ! शून्य, सगळंच शून्य ! (डोक्यावरचा हात काढतो, एकदम कांहीतरी आशेचा किरण मनांत चमकल्यासारखा करतो.) काय बरं म्हणाली ती ?– अत्यंत अलौकिक, दिव्य असं कांही तरी–(स्टेजवर काळोख पडतो. पडदा पडतो.)

क्र. ११५२८

११

# निशिकान्ताची नवरी

[ प्रख्यात इंग्रजी लेखक गोल्डस्मिथच्या "She Stoops to Conquer" नाटकाचें 'निशिकान्ताची नवरी' या नावाने, प्रा. अनंत काणेकरांनी भाषांतर केलें आहे.

निशिकांत हा थोडासा बुजरा व लाजाळू आहे. आपला मित्र म्हणून तो नीळकंठ यास बरोबर घेऊन नानासाहेबांकडे मुलगी पाहावयास येतो. सिंधूर या संस्थानी शहरांत येताच नानासाहेबांचा मुलगा बाळू ह्याची भैरवाश्रमांत गांठ पडते. तेव्हां बाळू त्यांना "नानासाहेब परगांवीं गेले असून आठ दिवसांनी येणार आहेत" असें सांगून नानासाहेबांचे घर "मयूराश्रम ही एक या गांवांतील चांगली खानावळ आहे, तेथे तुमची चांगली सोय होईल" असें सांगतो. त्याप्रमाणें निशिकान्त व नीळकंठ मयूराश्रमांत येतात. नानासाहेबांना ते येणार असल्याची कल्पना असतेच व भावी जावई या नात्यानें ते निशिकान्तकडे पाहातात; परंतु बाळूने निशिकान्त व नीळकंठ यांना जें सांगितलें त्याची त्यांना कल्पना नसते. यामुळे काय गैरसमज होतो तो खालील उताऱ्यांत वाचा. ]

* * *

[ निशिकांत आणि नीलकंठ आपल्या सामानासह प्रवेश करतात.]

सुभान–यावं महाराज. बसा. साहेबांना आंत जाऊन वर्दी देतों (जातो)

नीळकंठ–आहे बुवा! मयुराश्रमाचा रुबाब. ठीक दिसतंय हें हॉटेल. वाडा जुना दिसत असला तरी भव्य नि ऐसपैस आहे.

निशिकांत–अरे, तें असं असणार. एखाद्या चांगल्या श्रीमंत घराण्याचा हा वाडा असणार. दोन तीन पिढ्यांनीं कामधंदा कांही न करतां वाडवडिलांची इस्टेट घरबसल्या खाऊन-पिऊन चैन करून फुंकून टाकलेली असणार.

शेवटीं मालकावर पोटासाठी खाणावळीचा नाही तर हॉटेलचा धंदा करायची अशी ही पाळी आली आहे. दुसरं काय ?

नीळकंठ—बाकी निशी, घरच्यापेक्षा तुला हॉटेलांत किंवा खाणवळींतच अधिक घरच्यासारखं वाटतें यांत शंका नाही !

निशिकांत—साहजिकच आहे. लहानपणीं आई वारली तेव्हा शाळेपासून मुळी बाबांनी मला बोर्डिंगांत ठेवलं. पुढें कॉलेजांत गेलों तेव्हा होस्टेलमध्यें रहात होतों. खरोखर घरच्यापेक्षा मी बाहेरच जास्त राह्यलोय.

नीळकंठ—आणि म्हणूनच आईबहिणींशीसुद्धा वागण्याचीं सवय नसल्यामुळे बायकांपुढे असा बुजल्यासारखा वागतोस ! थरथरतोस काय, कांपतोस काय, बावळटासारखा दाढी खाजवीत उभा रहातोस काय ! बेटचा, उद्या त्या नानासाहेबांच्या कुंदाला भेटलास की तूं करणार तरी काय ?

निशिकांत—कांही करणार नाही मी. 'होय' ला 'होय' नी 'नाही' ला 'नाही' म्हणून उत्तर देणार. वर मान करून ती काळी आहे की गोरी आहे, हें सुद्धा मी पहाणार नाही.

नीळकंठ—मग आलास तरी कशाला तूं इतक्या लांब ?

निशिकांत—तुझ्यासाठी ! आणि बाबांनी जा म्हटलं म्हणून.

नीळकंठ—माझ्यासाठी ?

निशिकांत—हो, तुझी ती मैना नानासाहेबांच्याकडे आहे ना? तिला भेटायला तूं इतके दिवस तडफडतोयस. उघड उघड इथं भेटतां येणार माझ्याबरोबर. म्हटलं उजळ माथ्यानं तिला तूं भेटूं शकशील नाही तर मला नको होती ही यातायात. त्या कुंदेच्या चलाखपणाचीं इतकीं वर्णनें मीं ऐकलीं आहेत, की तिच्यासाठीं मी इथें येण्याऐवजी ती मुंबईला आली असती, तर मीच मुंबईहून दूर कुठं तरी पळालों असतों ! नको रे बाबा आपल्याला इतकी हुषार बायको !

नीळकंठ—अस्सं ! माझ्यासाठी आलायस तूं तर एकूण ! बाकी कुणाला एखादी पोरगी पळवायची असेल, तर त्याने तुझी मदत घेणं म्हणजे कंबक्तीच ! तूं मदत छानच करशील. आयत्या वेळीं तुझे हातपाय इतके गळतील, की त्या पोरीबरोबर तुलाहि त्या गृहस्थाला पाठीवर मारून पळवावा लागेल.

निशिकांत—आपलं आहे बुवा खरं ! पोरींना खूष करण्याची कला तुम्हांला

साधते तशी आपल्याला नाही साधत. (नानासाहेब प्रवेश करतात) हं. हे मालक आले वाटतं.

नाना–माफ करा हं. जरा वेळ लागला मला. आता आपल्यापैकी निशिकांत रत्नपारखी कुठले? हो आम्हीं आपले सरळ विचारतों. आमचा आहे जुना खाक्या !

निशिकांत (नीळकंठला)–बॅगवरचीं नांवं पाहून गृहस्थानं आमची नांवंहि पाठ केलीन आं ! (नानासाहेबांना) छे, छे तसं कांही नाही. मी रत्नपारखी. हे नीळकंठराव. (नीळकंठला) प्रवासांत कपड्यांची अगदी वाट लागली आहे बुवा. कपडे आधी बदलले पाहिजेत.

नाना–निशिकांत, हें आपलंच घर आहे समजा. इकडे तिकडे पहायची कांही जरूर नाही. वाटेल तिकडे काढून ठेवा

निशिकान्त–(नीळकंठला) निशिकांत अं ! म्हातारा गळ्यांत पडायला लागला. (नानासाहेबांना) तें तुम्ही सांगायला नको आम्ही अगदी आमचंच घर समजून वागणार आहोंत. झकास घर आहें तुमचं. आवडलं आपणाला. (नीळकंठला) निळू, कांही धोतरं–बितरं घेतलीं आहेस ना बॅगेंत? कपडे बदलून जेवणापूर्वी गावांत फेरी मारून येऊं.

नीळकंठ–धोतरांत कशाला फिरायचं ? फिरायचंच असेल तर तोंड वगैरे धुऊन चहा वगैरे घेऊं या, नी असेच जाऊं या.

नाना-अहो धोतर नेसलांत म्हणून काय झालं ! आमच्या सिंधूरांत सर्व चालतं.

नीळकंठ–तसें नव्हे हो ! धोतर नेसायची अलीकडे बऱ्याच दिवसांत मला सवय नाही. तसं नेसतों; पण काचा वगैरे व्यवस्थित मारणं–तें कांही आपल्याला जमत नाही बुवा आणि बाहेर फिरायचं म्हणजे जरा काचा वगैरे व्यवस्थित मारून फिरलं पाहिजे.

नाना–तुम्हा अलीकडच्या लोकांना धोतराची इतकी भीति वाटते? अहो, पूर्वीचे लोक धोतर नेसून लढाईवर जायचे. आमच्या आईच्या मामानी कधी मांडचोळणा घातला नाही. धोतराचा काचा मारून ते जे एकदा घोड्यावर मांड ठोकायचे ते चार चार दिवस खाली उतरायचे नाहीत सत्तावन सालच्या बंडांत नानासाहेब पेशव्यांबरोबर ते असताना, आठ आठ दिवस त्यांनी नसते घोड्यावर काढलेत. एकदा नानासाहेबांना तहान लागली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
३०९२५


निशिकांत–अहो महाराज, नानासाहेबांपेक्षाहि आम्हांला आता तहान अधिक लागली आहे. दोन गरम चहाचे कप घेऊन या आधी.

नाना–(स्वतःशी) हाच का याचा लाजाळूपणा! (निशिकांतला) चहा कशाला?–चांगला कोको करून ठेवलाय तुमच्यासाठी.

निशिकांत–(एकीकडे) आं! काय जुलूम आहे म्हाताऱ्याचा! (नानासाहेबांना) छे छे! कोको फार महाग पडतो. आम्हांला चहाच पाहिजे.

नाना–वः निशिकांत! अहो, महाग काय नि स्वस्त काय? तुमच्यापेक्षां आम्हाला पैशाची का पर्वा वाटते?

निशिकांत–असं का? मग ठीक आहे. आमचं काय जातंय! आणा तर कोको.

नाना–माझाहि कोको घ्यायचा मी ठेवलाय. म्हटलं तुमच्याबरोबरच घ्यावा एकदम.

नीळकंठ (निशिकांतला)–म्हातारा चिकटू लागला! (नानासाहेबांना) मग आता बोलवा की कोको!

नाना–हो हो तर! अरे सुभाना, ए सुभाना! कोको आण बाहेर.

निशिकांत–अहो, एवढ्याशा कामाला हवेत कशाला गडी नोकर? तुम्ही जा की. जरा इकडून तिकडे चालतात तर थोडं दोंद उतरेल!

नाना–(चमकून स्वतःशी) हा मुंबईवाल्याचा विनय की विनोद? जाऊ द्या. तरुण आहे. (उघड) वः! मोठे विनोदी बुवा तुम्ही मुंबईचे लोक!

[सुभाना कोको आणून ठेवतो आणि जातो]

निशिकांत–(नीळकंठला) अगदी आपल्यापैकीच एक व्हायला पहातोय म्हातारा! जरा चढवू या स्वारीला. (कोको घेत) वः अगदी टेस्टदार आहे बुवा तुमचा कोको! काहो, गेल्या वर्षी इथं साहित्यसंमेलन झालं, तेव्हा पाहुण्यांची चिक्कार गर्दी झाली असेल तुमच्याकडे?

नाना–अशा प्रसंगीं आमच्याकडे गर्दी व्हायचीच. आम्हांला आनंदच आहे त्यांत.

निशिकांत–तुम्हाला व्हायचाच आनंद.

नाना–आमच्याकडे नाही तर कुठं उतरायचं बड्या पाव्हण्यांनी? अहो

तुमचे ते स्वागताध्यक्ष सरदार मोरावळे म्हणजे निकटचे आप्त ना—माझ्या आईचे सखे बंधु-माझे मामाच ते.

नीळकंठ—(निशिकांतला) थापा सुरू झाल्या म्हाताऱ्याच्या! (नानासाहेबांना) काहो खरं म्हटलं तर साहित्यसंमेलनाचे तुम्हीच स्वागताध्यक्ष व्हायचे.

निशिकांत—तुमच्यासारख्याच लोकांचं साहित्यसंमेलनांत खरं महत्त्व.

नाना—हो, तसे करीत होते मला आग्रह. पण अलीकडे नाही सहन होत मला ही दगदग.

नीळकंठ—असं असं.

निशिकांत—पण साहित्याचा तुमचा अभ्यास दांडगा असेल.

नाना—दांडगा म्हणजे तसा कांही विशेष नाही. तुमच्या त्या अलीकडच्या लघुकथा नि भावगीतें आपणाला आवडतहि नाहीत नि समजतहि नाहीत. अलीकडे आहे काय वाचण्यासारखं? आम्ही आपले चिपळूणकरांचें निबंध वाचीत असूं. अलीकडे तेहि सगळं सोडून दिलंय. गीतारहस्य वाचतों केव्हा केव्हा झोपण्यापूर्वी.

नीळकंठ—(निशिकांतला) टिळकांना शेवटीं एक खाणावळवाला वाचक मिळावा ना! हर हर! (नानासाहेबांना) म्हणजे एकंदरीत तुम्ही कर्मयोगी दिसता.

निशिकांत—हो. रोज निरनिराळ्या प्रकारच्या पाहुण्यांच्या खस्ता काढायच्या म्हणजे काय लहानसहान कर्मयोग आहे?

नाना—कर्माचा कर्मयोग! बाकी तुम्ही म्हणता तसा पाहुण्यांचा आम्हांला नाही त्रास वाटत. आम्हांला नेहमी पाव्हणे हवेत.

निशिकांत—तुम्हाला रोज भरपूर पाव्हणे यावेत असं वाटायचंच.

नाना—हो. आमच्या घराण्याचा लौकिकच तसा आहे. सरदार मोरावळ्याच्या बरोबरीने सिंधूर शहरांत आमचेच घर. फार जुना इतिहास आहे आमचा. सत्तावन सालच्या बंडांत नानासाहेबांच्या फौजेला जेव्हा रसद मिळेनाशी झाली तेव्हा आमच्या आजीच्या मामांनी सबंध फौजेला अन्न पुरवायचं आपल्या अंगावर घेतलें—

निशिकांत—असं का? पण नानासाहेबांच्या फौजापेक्षाहि आम्हांला आता

आमच्या अन्नाची काळजी लागली आहे. आज रात्रीं जेवण काय मिळणार आहे आम्हांला ?

नाना–(स्वगत) काय गृहस्थ आहे हा ! याला ठरवलं कुणी लाजाळू ? (उघड) आम्हीं संस्थानी लोक असलों तरी आमचं जेवण तुम्हा मुंबईकरासारखं.

निशिकांत–अहो, पण पदार्थ काय काय मिळणार तें सांगाल की नाहीं ?

नाना–(स्वगत) हा मनमोकळेपणा की वेशरमपणा ? (उघड) अहो, आमची 'ही' स्वतः बसली आहे सैंपाकीण बाईबरोबर सैंपाकरांत. पदार्थांची आज काळजीच नको.

नीळकंठ–तुम्हाला काळजी नको, पण आम्हांला आहे ना !

निशिकांत–तुमची 'ही' पत्नी तुमची सैंपाकीणबाई खूप ठरवतील काय करायचे तें; पण आम्हांला वाटेल तें चालयच नाही. प्रवासांत असलों, कीं मला नेहमीचं जेवण चालत नाहीं. मी जाऊ कां जरा सैंपाकघरांत आम्हांला काय हवं तें सांगायला ?

नाना–(राग गिळून) छे, छे. तुम्ही कशाला जाता ? या घरांत तुम्हाला काय हवं तें करून मिळेल. तुम्ही नुसता हुकूम करा. (स्वगत) जावई होणार आहे, थोडं सहन केलें पाहिजे.

नीळकंठ–तें बरोबरच आहे. जितके आम्ही अधिक खाऊ तितके तुम्हाला बरे.

नाना–यांत काय संशय आहे की काय ? तुमच्यासाठीच तर सर्व तयारी आहे; मात्र खाण्यापिण्याच्या बाबतींत आम्ही संस्थानी लोक तुम्हां मुंबई-कराना हार जाणार नाहीं. आमचे मामा सिंधूरचे दिवाण होते. तेव्हा महा-राजांच्या पंक्तीला बसले असता, एकदा त्यांनी एकशेएक जिलब्या–

नीळकंठ–तुमचे मामा या संस्थानचे दिवाण होते अं ?

नाना–म्हणजे दिवाणबहादूर सांजगांवकर तुम्हांला माहीतच नाही का ?

निशिकान्त–ते तुमचे सख्खे मामा होय ? (नीळकंठला) आता बहुतेक संस्थानचे महाराज आपले वडील म्हणून हा म्हातारा सांगणार !

नीळकंठ–ते राहूं द्या. पण आम्हाला जेवणाला काय मिळणार तें तुम्ही सांगितलंच नाही ?

नाना–अहो, म्हटलं ना, 'ती' स्वतः बसली आहे सैंपाकघरांत. बासुंदी-पुरी वांगी-भात, मसाल्याच्या करंज्या–खूप काय काय करताहेत !

निशिकान्त–आहो, आम्हीं काय आमच्या लग्नाचं जेवण जेवायला आलों आहोंत असं तुम्हांला वाटतं की काय ?

नाना–(स्वगत) यांच्या जिभेला कांहीं हाड आहे की नाही ? (उघड) एकूण एकच. लग्नाचं काय नी लग्नापूर्वींचं काय. तुम्ही जेवा तर खरे. मग सगळा पुढला विचार.

निशिकांत–तुमचा तो वांगीभात नी त्या मसाल्याच्या करंज्या आम्हाला कांही एक नको. रात्रीं असलं जेवण जेऊन काय अजीर्णानं मरायचंय उद्या ? तुम्हांला काय ?

नीळकंठ–आणि मला आहे 'गेस्ट्रिक ट्रबल.' त्या मसाल्याच्या करंज्या मला कुणी फुकट दिल्या तरी नकोत.

नाना–(स्वगत) यांच्या या चढेलपणाचा मला कांही अर्थच कळत नाही. (उघड) अहो, असे रागावतां का ? मी यजमान नी तुम्ही पाहुणे आहात. तुम्ही सांगाल ते पदार्थ पुन्हा करायला लावतों.

निशिकान्त–हें पहा, तुमच्या त्या मोठमोठ्या पक्वान्नाच्या याद्या आम्हाला नकोत. आम्हां दोघांनाहि अगदी साधें जेवण पाहिजे. आंबट वरण, भात, एखादी भाजी, चांगलं स्वच्छ तूप नी चपात्या. बस.

नाना–हात्तीच्या ! तुम्ही थट्टा करीत असाल तर करा. पण इतकं तुम्हाला खास मिळेल.

निशिकांत–होय ना ? मग आता गोष्टी पुरे झाल्या. आमच्या खोल्या साफसूफ करून आमचे बिछाने झटकून ठेवायला सांगा. चला.

नाना–कांही पळायला नको. सुभाननं केव्हांच तुमच्या खोल्या तयार करून ठेवल्यात. तुम्हांला बोटसुद्धा हालवायला नको इथं. सर्व गडी नोकर तुमच्या तैनातीला आहेत.

निशिकांत–Thank you ! तें ठीक आहे. पण असल्या ठिकाणच्या गडीनोकरांवर माझा तितकासा विश्वास नाहीं. मी स्वतःच या गोष्टीकडे लक्ष पुरवतों.

नाना–पण मी तुम्हाला कांही काम करूं देणार नाहीं. तें सर्व माझ्याकडं लागलं.

निशिकान्त–तुम्ही सर्व लावून घ्याल तुमच्याकडे पण मी बरा लावूं देईन?

नाना–ठीक आहे? चला माझ्याबरोबर आंत. दाखवतो तुमची खोली नी सामान. किती लख्ख लावून ठेवलंय सुभाननं. तें! (स्वतःशी) अगदी लाजाळू!

[दोघेहि जातात.]

● ● ●

१२

# कुमारिका

[प्रा. अनंत काणेकर यांच्या "दिव्यावरती अंधेर" या कथा-संग्रहांतील ही एक कथा आहे. ह्या कथासंग्रहांच्या नांवावरूनच वाचकाला यांतील कथांच्या स्वरूपाची कल्पना येईल. जुन्या म्हणीप्रमाणें 'दिव्याखाली अंधार' हा स्वाभाविक व अपेक्षित असा अर्थ आहे; परंतु येथे दिव्यावरती अंधार आहे. याचा मतितार्थ असा की, सर्वसामान्य रीतीने एखाद्या घटनेचे परिणाम विवक्षित मार्गानेच होणार असें आपण जें गृहीत धरतों त्याच्या उलट, अनपेक्षित असे परिणाम झाल्याचे या कथांतून आढळून येईल. आणि हेंच यांतील कथांचें वैशिष्टय होय.]

★ ★ ★

बंगल्याच्या व्हराड्यांत एका खुर्चीवर उदासीन चेहरा करून अप्पासाहेब इंदापूरकर बसले होते. त्यांच्या तोंडाकडे टक लावून पहात जवळच जमिनीवर त्यांचा आवडता कुत्रा टॉमी बसला होता. समोरच्या टेबलावर चारपांच वर्तमानपत्रें पडलीं होतीं. पण त्यांचं कुठंच लक्ष नव्हतें. छताकडे पहात ते आपल्याच विचारांत गुग झाले होते. पायऱ्या चढून वर येत असलेल्या भाऊसाहेब सातपुत्याकडे त्यांचं लक्षहि गेलें नाही. त्यांचा तो विचारग्रस्त उदासीन चेहरा पाहून भाऊसाहेबांना त्यांची दया आली.

"कसला एवढा विचार करतां, अप्पासाहेब ?" त्यांच्या अगदीं जवळ गेल्यावर भाऊसाहेब म्हणाले.

"काय ?" एकदम दचकून त्यांच्याकडे पहात अप्पासाहेब म्हणाले, "ओ हो ! तुम्ही का ? या या, बसा भाऊसाहेब. काय खबर आहे ?"

"खबर कांही नाही" भाऊसाहेब म्हणाले, "रामेश्वर, मद्रास, म्हैसूर

एवढा महिना दीड महिना प्रवास करून आलात तुम्ही अप्पासाहेब,—पण अजून बरं वाटलेलं दिसत नाही तुम्हाला."

"कपाळाचं बरं वाटायचं आता". हंसत, पण जरा वैतागाच्याच सुरांत अप्पासाहेब म्हणाले, "आता हें असंच चालायचं !"

अप्पासाहेबाच्या उदासीनपणाला कारण होतंच तसं. गेले सबंध वर्ष ते असेच उदासीन होते. जिवाला मोकळं वाटावं म्हणून रामेश्वर, म्हैसूर वगैरे ठिकाणांचा दूरचा प्रवास करून ते नुकतेच परत आले होते. तरीहि त्यांचा उदासपणा कांही कमी झाला नव्हता. कसा कमी होणार ? बऱ्यावाइटांत, दु:खांत–आनंदांत गेली अठ्ठावीस वर्षे जिच्या सहवासांत काढली ती त्यांची जन्म सोबतीण,—त्यांची पत्नी गेल्याच वर्षी कॅन्सरच्या विकाराने वारली होती. तेव्हापासून त्यांच्या जिवाला हा जो उदासपणा जडला तो कायमचा जडला. त्यांना मूल नव्हते याचे त्यांना कधीच वाईट वाटलें नव्हतें. आपल्या नशिबींच मूल नाही, असं म्हणून ते आणि त्यांच्या पत्नी इतरांच्या मुलांचं कौतुक करीत, आणि आनंदांत रहात. पण आता अगदी घर त्यांना खायला येत होतं. त्यांना मित्र असा कुणी नव्हताच म्हटलं तरी चालेल. आपलं काम आणि घर यापलीकडे अप्पासाहेबांनी कधी पाहिलंच नाही. बायकोपलीकडे त्यांचे एकुलतेएक स्नेही आणि सल्लागार म्हणजे भाऊसाहेब सातपुते. भाऊसाहेब सातपुते यांचा आणि अप्पासाहेबांच मात्र गेल्या बारा वर्षांचा स्नेह होता. गेलीं बारा वर्षे ते शेजारीशेजारी रहात होते. भाऊसाहेबांचं घर त्या आळीतलं अत्यंत जुनं घरं. त्यांच्या शेजारीच अप्पासाहेबांनी घर बांधल्यापासून त्यांचा स्नेह जमला. भाऊसाहेब रिटायर्ड हेडमास्तर होते. त्याना सरकारी पेन्शन मिळत असे. त्यांच्या घरांत सारी तीन माणसं,—ते पत्नी आणि कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत असलेला त्यांचा एकुलताएक मुलगा, बाबू.

अप्पासाहेब श्रीमंत झाल्यापासून त्यांच्याकडे अनेक नातेवाईक रहायला येत; पण त्यांना जवळचे असे नातेवाईक कुणी नव्हते. त्यांच्या दूरच्या एका चुलतभावाला दोन मुलगे होते. त्यांना अप्पासाहेब आपली सर्व इस्टेट देणार अशी गावांत बातमी होती. पण अप्पासाहेबांचा कांही तसा विचार नव्हता. त्या दोन पुतण्यांना आपल्याजवळ ठेवावें आणि आपला धंदा त्यांच्या

हवाली करावा असा अप्पासाहेबांनी एकदा विचार केला होता. पण ते दोघेहि अगदीच उडाणटप्पू निघाले. शाळेंत जाण्याऐवजी ते इकडे तिकडे भटकत, यथेच्छ खात आणि विड्या ओढत फिरत. तेव्हा कंटाळून अप्पासाहेबांनी त्यांना त्यांच्या बापाकडे सोलापुरास पाठवून दिलें. त्यांना आणि त्यांच्या बापाला दहा पंधरा हजार रुपये द्यावे; आणि उरलेली साठसत्तर हजार रुपयांची इस्टेट एखाद्या चांगल्याशा लोकोपयोगी संस्थेला धर्मार्थ देऊन टाकावी, असा स्तुत्य विचार त्यांनीं केला होता. दोन चार इंग्रजी इयत्ताइतकंच शिक्षण असूनहि गेल्या तीस वर्षांत अप्पासाहेबानी चांगली लाख पाऊणलाख रुपयांची इस्टेट केली होती. वयाच्या विसाव्या वर्षी एका बिल्डिंग काँट्रॅक्टरजवळ मुकादम म्हणून ते कामाला राहिले. उन्हातान्हांतून ते सारखे खपत असत. पुढे ते त्याचे मुख्य कारकून झाले. कांही दिवसांनी त्यांनी चुन्याचा स्वतंत्र व्यापार सुरू केला, आणि आज त्यांच्या त्रेपन्नाव्या वर्षी तीस चाळीस हजार रुपये रोकड, एक स्वतःचा बंगला आणि एक चाळ एवढ्या इस्टेटीचे ते मालक झाले होते. अलीकडे त्यांना धंद्याकडे विशेष वघाव लागत नसे. आणि गेल्या वर्षापासून तर धंद्यावरचं त्यांचं लक्षच उडालं.

"अप्पासाहेब, तुम्हांला एक गोष्ट सांगूं?" भाऊसाहेब अगदी मित्रभावाने म्हणाले, "तुम्ही पुन्हा लग्न करा. त्याशिवाय तुमचं हे एकटे एकटे वाटणं, आणि तुमचा उदासीनपणा जायचा नाही!"

"काय, म्हणतां काय भाऊसाहेब तुम्हीं?" अप्पासाहेब उद्गारले, "आता या वयांत लग्न करून एखाद्या कोवळ्या पोरीचा गळा कापूं की काय?—छे!"

"अहो तसं नाही म्हणत मी!" भाऊसाहेब म्हणाले, "तरुण कुमारिकेशींच लग्न करा असं कांही म्हणत नाही मी. एखादी तीस पस्तीस वर्षांची विधवा मिळाली तर काय वाईट आहे? तुम्ही इतके कांही म्हातारे दिसत नाही."

भाऊसाहेबांचं म्हणणं कांही खोटं नव्हतं. त्रेपन्न वर्षें झालीं तरी अप्पासाहेबांचे बरेच केस काळे होते. वेळच्यावेळीं खाणं, पिणं आणि व्यायाम यामुळे त्यांचं अंगहि सुटलं नव्हतं. तुकतुकीत गोरा रंग, सुटसुटीत उंच बांधा,—यामुळे ते अजून रुबाबदार दिसत. भाऊसाहेबांनी सारखा

पिच्छा पुरवला, तेव्हा 'होय' नाही, म्हणता म्हणता कांही दिवसांनी एखादी प्रौढ विधवा मिळल्यास लग्न करण्याचे अप्पासाहेबांनी कबूल केलं.

" पण असली बायको शोधयला जायचं कुठं ?" अप्पासाहेब म्हणाले, 'त्याची काळजी तुम्हाला नको, भाऊसाहेबांनी सांगितलं " " त्या विधवा विवाह मंडळाचा चिटणीस आमच्या बाबूचा मित्र आहे आमच्या बाबूकडून त्याला सर्व कांही सांगतों; आणि मी पुढील सर्व व्यवस्था करतों."

बाबूची आणि अप्पासाहेबांची चांगलीच गट्टी होती. बाबू त्यांना फार आवडे पण अप्पासाहेब आता पुन्हा या वयांत लग्न करूं पहात आहेत, याचं बाबूला जरा कसंसच वाटलं. तरी पण त्यांतल्यात्यांत एखाद्या प्रौढ विधवेशीं लग्न करायाचा त्यांचा विचार आहे, हें ऐकून त्याला बरं वाटलं.

विसू पळशीकर नांवाचा बाबूचा एक शाळेपासून मित्र होता. त्याच्याकडे बाबू नेहमी जात येत असे. घरची अत्यंत गरीबी असल्यामुळे विसूने इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंतच शाळा सोडली होती. कुठल्यातरी कारखान्यांत तो फिटरचें काम करीत असे. अवघा तीस रुपये त्याला पगार होता. विसूचे तीस रुपये आणि त्याचा म्हातारा बाप कोर्टाजवळ बसून कुठं अर्ज लिहून दे कुठं काय कर, असं करून काय पंधरावीस रुपये मिळवीत असे ते मिळन पंचेचाळीस पन्नास रुपयांत विसू त्याचे म्हातारे आईबाप, सव्वीससत्तावीस वर्षे झालीं तरी लग्नाशिवाय असलेली त्याची बहीण वत्सला आणि तीन चार भावंडं एवढ्या कुटुंबाला गुजराण करावी लागे कधी पोटभर अन्न नाही, कीं अंगावर धड वस्त्र नाही अशी त्या कुटुंबाची स्थिति होतीर दुर्गाक्का–म्हणजे विसूची आई–विसूला अप्पासाहेबांच्या कारखान्यात, नाहीतर दुसरीकडे कुठंतरी जरा जास्त पगाराची नोकरी बघून दे, म्हणून बाबूला नेहमी म्हणे. पण अजून तें कांही जमलं नव्हतं. विसूशी बोलता बोलता एकदा बाबू सहज म्हणाला, " हल्ली एक लग्न जमवण्याच्या धांदलींत आहे बुवा ?"

"कुणाचं ? स्वत:चच की काय ?"

"छे रे, मी कुठलं करतों. आमच्या अप्पासाहेबांना पुनर्विवाह करायचा आहे. त्यांच्यासाठी एखाद्या विधवेच्या शोधांत आहे. आपला तो विधवा विवाहमंडळाचा कात्रे आहे ना, त्याला सांगून ठेवलंय पण इतके दिवस झाले तरी चांगलीशी विधवाच सापडत नाही कुठं !"

विसूच्या आणि बाबूच्या या गोष्टी दुर्गाक्का आंतून ऐकत होत्या. त्या बाहेर येऊन म्हणाल्या, "खरंच अप्पासाहेब लग्न करतायत् की काय ?"

"हो कां करूं नये ?" बाबू म्हणाला.

"नाही नाही. मी तसं कुठे म्हणते," दुर्गाक्का म्हणाल्या. "घरदार आहे चांगला पैसा अडका आहे आणि पन्नास वर्षं उलटून गेली तरी तसे वाईट दिसत नाहीत आप्पासाहेब—चांगले टणटणीत आहेत."

हें बोलणं झाल्यावर दोन तीन दिवसांनी आपल्या आईशी बोलत असताना बाबूला आश्चर्याचा धक्काच बसला. आदलेच दिवशी दुर्गाक्का आईला भेटून गेल्या होत्या. कसंहि करून अप्पासाहेबांना आमची वत्सला पदरांत घ्यायला सांगा म्हणून आईकडे त्या धरणें धरून बसल्या होत्या. "अप्पासाहेब करतील वत्सलेशीं लग्न तर बरं होईल गरीबांचं. सदाच्या दारिद्र्यानं अगदी मेटाकुटोला आली आहेत बिचारी !" आई म्हणाली.

"काय बोलतेस काय आई तूं" बाबू उद्गारला. बाकीच्याचं हित तूं पहातेस, पण वत्सलेला काय वाटेल ? इतरासाठी तिचा वळी द्यायचा की काय ?"

"बळी कसला आलाय रे ? काय वाईट आहे अप्पासाहेबांचं स्थळ ?' आई म्हणाली, "चांगली सत्तावीस वर्षांची झाली. कोण करणार आहे तिच्याशीं लग्न आता ? बरं दिसायला तरी काय आहे ?—मला वाटतं एखादे वेळीं ती तयार होईल; पण अप्पासाहेब कबूल होतील की नाही कुणाला ठाऊक !"

"तें कांही नाही," बाबू सात्विक संतापाने म्हणाला, "मी हें लग्न होऊं देणार नाहीं. आहे काय ?—बिचाऱ्या वत्सलेच्या जन्माचं वाटोळं मी मुळीच होऊं देणार नाहीं—हो तुम्हाला काय ?—हें पाप थोडेबहुत तरी माझ्या डोक्यावर येतं—मी चुकून विसूजवळ बोललों, दुर्गाक्कांनी ते कुठूनसं ऐकलं—आणि त्यामुळे हें सर्व झाले."

या बाबतींत विसूजवळसुद्धा बोलायचं नाहीं-सरळ वत्सलेला जाऊन काय ते विचारायचं असं बाबूने ठरविलें. तो अगदी आवेशातच वत्सलेच्या घरीं गेला.

"वत्सला, दुर्गाक्कांनी—बाबांनी तुझ्यावर जबरदस्ती चालवली असेल.—आमच्याकडे,—भावंडांकडे बघ, म्हणून तुझ्यापुढे डोकं धरून बसत असतील

—पण असल्या जबरदस्तीला भिऊन, नाही तर दुसऱ्यासाठी स्वतःचा बळी देण्याच्या भलत्याच कल्पनेला बळी पडून तूं मुळीच हो म्हणूं नकोस. तुला घर सोडावं लागलं तरी बेहेत्तर——तूं कांही घाबरूं नकोस——मी आणि विसू तुझं वाटेल तसे संरक्षण करूं !——बाबू बोलत होता.

त्याला मध्येच थांबवून वत्सला म्हणाली, "काय, बोलतोस काय तूं बाबू? सांगितलें कुणी तुला, दुर्गाक्कांनी नि बाबांनी माझ्यावर जबरदस्ती चालविली आहे म्हणून? अप्पासाहेबांशीं लग्न करतेस का?' म्हणून त्यांनी मला विचारलं, तेव्हा मला इतका आनंद झालाय् म्हणून सांगू—मी ताबडतोब 'हो' म्हणालें—सुटेन एकदाची. कंटाळा आलाय मला हें असेंच राहायचा !"

"चल, कांहीतरी बोलतेस," तिच्याकडे डोळे विस्फारून पहात बाबू म्हणाला, "मी अशा उघड्या डोळ्यांनी तुझा सर्वनाश मुळीच होऊं देणार नाहीं."

"बाब्या तुला कुणी उठाठेवी सांगितल्यात या?" वत्सला ओरडली, "माझं चांगलं जमतंय, त्यांत तूं उगाच का मोडता घालतोस?—काय बाई नशीब तरी! जरा कुठं चांगलं व्हायची वेळ आली, तर हा घरांतलाच माणूस उलटला !"

"अग तुला काय वेड लागलंय?" बाबूने विचारलें, "जाणून बुजून विधवेचं जिणं का ओढून घेतेस अंगावर?"

"वेड मला नाही, तुला लागलंय," वत्सला चिडून म्हणाली, "विधवा केव्हा होईन तेव्हा होईन पण आता विधवेपेक्षा वाईट जिणं जगतेंय् त्याचं काय? अप्पासाहेबांशीं लग्न केलं तर कांही वर्षं तरी सवाष्ण म्हणून मिरवेन. नाही तरी कोण करणार आहे लग्न आता माझ्याशीं—मी काय आता खुळी पोर राह्यलें काय रे? माझं रूप मला काय दिसत नाही?—मला भीति वाटते अप्पासाहेबच माझ्याशीं लग्न करायला कबूल होतात कीं नाही !" बाबू जागच्याजागी थंडच पडला.

बाकी वत्सलेच्या बोलण्यांत कांहीच चूक नव्हती. रूपाने खरोखरच ती सामान्याहूनहि वाईट होती. ताडाच्या झाडासारखी उंच—त्यामुळे पाठीला किंचित् पोक आलेलं, गालफडं बसलेली, छाती आंत गेलेली,—रस्त्यावरल्या बत्तीच्या खांबावर कांहीतरी लटकत टांगावं तसं तिच्या अंगावर लुगडं दिसे.

खरोखर अप्पासाहेब तिला पसंत करतील की नाही, याची शंका होती. अप्पासाहेबांची पन्नाशी उलटली होती तरी ते तसे रुबाबदार दिसत; आणि त्यांची पहिली बायकोहि सुंदर होती. पण बायकोबरोबर तीस वर्षं काढल्यानंतर आता एकलकोंडं रहाणं त्यांना कससंच वाटत होतं. विधवा-विवाहमंडळातर्फे एकहि चांगलीशी विधवा सांगून आली नव्हती. भाऊसाहेबांनी आणि आईंनी तर वत्सलेसाठी त्यांची पाठच धरली होती. शेवटीं त्यांनी रुकार दिला. त्यांनी विचार केला, "घर अगदी खायला येतं, घरांत कुणीतरी माणूस पाहिजे. प्रौढ विधवा नाही तर नाही. आता दिसायला ती अगदीच अशी तशी आहे, पण या वयांत सुंदर बायको मिळणार कुठे–आणि सुंदर हवी तरी कशाला."

वत्सलेचं लग्न झालें. लग्नानंतर वर्षातच वत्सलेला मुलगा झाला. अप्पासाहेबांचा आनंद गगनांत मावेना. आपल्या मुलाच्या बारशानिमित्त एक टोलेजंग समारंभ करायचं त्यांनी ठरवलं. सारा बंगला लतापल्लवांनी सुशोभित करून असंख्य रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांची त्यावर रोषणाई केली होती. जरीची लुगडी नेसलेल्या आणि हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर घातलेल्या गावांतल्या श्रीमंतांच्या बायका येत जात होत्या. मोठ्या थोरल्या जरीच्या पदराची एक पैठणी दुर्गाक्का नेसल्या होत्या, आणि आपल्या चार केसांच्या गांठीवर त्यांनी एक मोठी थोरली फुलांची वेणी घातली होती. बाहेर बागेंत मांडलेल्या टेबलावरच्या पदार्थांवर पुरुषमंडळी ताव मारीत होती. अप्पासाहेब रंगांत येऊन भाऊसाहेबांशीं काही तरी बोलत होते. बाबू वत्सलेला भेटायला सहज आंत गेला. वत्सलेचं डोकें फुलांनी नुसतं मढवून काढलं होतं. पोपटी रंगाचं सोनसळ्याचं भारी किमतीचं पातळ ती नेसली होती. अंगाखांद्यावर हिरेमोती चमकत होते. पहिल्यापेक्षां ती किती-तरी चांगली दिसत होती. ती लठ्ठ झालीं होती, इतकंच नव्हे, तर तिच्या चेहेऱ्यावरहि एक नवीनच कांति आली होती. तिचा मुलगा तिच्या मांडीवर होता. चांगला गोरापान आणि गुटगुटीत दिसत होता तो. एकप्रकारच्या अपूर्व आनंदानं वत्सलेचे डोळे चमकत होते. सर्वत्र आनंदी आनंद दिसत होता. बाबूहि त्याच आनंदांत बाहेर आला, आणि एका वर्षापूर्वीची आपली मतं अजिबात विसरून टेबलावरल्या केक्सवर आणि आईस्क्रिमवर व्यवस्थित हात मारूं लागला !

● ● ●

१३

# घर

[ठाकुरद्वार येथील जुन्या चाळींपैकी कोणतीहि एकमजली चाळ. पोटमाळ्यावर सैंपाकघर, खाली दोन खोल्या–एक झोपायची, दुसरी उठावसायची. चाळीला मागेपुढे गॅलरी आहे. अशाच एका जागेंत पहिल्या माळ्यावर त्रिंबकराव गेलीं पंचवीस वर्षे आहेत. नाटकांतला बहुतेक सर्व व्यवहार बाहेरच्या उठाबसायच्या खोलींत होतो.

छाया, प्रकाश आणि प्रकाशझोत (Spot-light) यांनी सर्व दृश्यें आणि वातावरण दाखवावयाचें. हुबेहूब, वास्तव असें कोणतेंच दृश्य दिसणार नाही. बाहेरची उठाबसायची खोली आहे हें खोलींतल्या कांहीं सामानाच्या अस्पष्ट आकृति दिसतील त्यांनी सूचित करावयाचें. मात्र बोलणाऱ्या पात्रावर झगझगीत प्रकाशझोत ठेवावयाचा. पात्रें हालतील तसा तो हालवावयाचा. पहिल्या दृश्यांत संध्याकाळची,–रात्रीची वेळ असल्यामुळे त्यांत तांबूस छटा असावी, दुसऱ्या आणि तिसऱ्या दृश्यांत सकाळची वेळ आहे तेव्हा निळसर छटा असावी. दारें, खिडक्या, गॅलरी छायेंत सूचित असल्यामुळे पात्रें कुठून येतात किंवा जातात तें निश्चितपणें दिसणार नाही. प्रकाशझोतांत आल्यावर तीं स्पष्ट दिसतील.

पहिलें दृश्य संध्याकाळीं दिवेलागणीच्या वेळचें आहे. दुसरें, दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेआठ-नऊच्या सुमारचें; आणि तिसरें, तिसऱ्या दिवशीं सकाळीं त्याच वेळचें.]

: १ :

[पडदा वर जातो तेव्हा रंगभूमीवर काळोख असतो. एकदोन क्षणानंतर एका बाजूचा काळोख उजळतो. हातांत बॅग घेतलेले डॉक्टर आणि त्यांना

दरवाजापर्यंत पोहचवावयाला आलेला वासू आपसांत कांहीतरी कुजबुजत उभे आहेत. अंधुक उजेडांत ते स्पष्ट दिसत नाहीत. इतक्यांत आंतून ओरडत आजारी त्रिंबकराव बाहेर येतात.]

त्रिंबकराव : दिवे लावा ! अरे दिवे लावा ! दिवेलावणीची वेळ झाली तरी अशीं अंधारांत कुजबुजत कशाला उभीं राहतां ? मी कांही मेलों नाही ना अजून ? नुसता आजारीच आहें ना ?

[वासू बटन दाबतो. अंधुक उजेड आता स्पष्ट होतो. सर्वांचे चेहरे स्पष्ट दिसतात.]

वासू : बाबा, हे डॉक्टर आहेत इथं.

त्रिंबक : अरेच्या ! माफ करा हं, डॉक्टर. मला वाटलं तुम्ही केव्हाच गेलांत.

डॉक्टर : वासूला तुमच्या औषधपाण्याचं थोडं समाजावून देत होतों, इतक्यांत तुम्ही–

त्रिंबक : पुन्हा माझ्या छातींत धडधडायला लागलं, डॉक्टर–(जानकीबाई येतात) तूं कशाला आलीस ?

जानकी : म्हटलं तुम्ही ओरडतां कशाला ?

त्रिंबक : कांही नाही–जा तूं.

डॉक्टर : (जानकीबाईंना) मघाशी सांगितलेली ती एक गोळी आणून द्या यांना. छातींत धडधडायला लागलं की ताबडतोब एक गोळी द्यायची. (जानकीबाई जातात) (त्रिंबकरावांना) बाहेर कशाला आलांत तुम्ही ? उगाच उठायचं नाही, हालायचं नाही, कांही श्रम करायचे नाहीत म्हणून बजावून सांगितलें होतें मीं तुम्हाला. माझी पाठ फिरली नाही तोच तुम्ही–

[त्रिंबकराव तिथे असलेल्या लोखंडी खाटेवर वासूचा आधार घेऊन बसतात. जानकीबाई येतात. त्यांच्या तोंडांत गोळी घालतात आणि पाण्याचा एक घोट देतात.]

त्रिंबक : अगदी सीरियस् आहे का हो, डॉक्टर, माझं ?–ताप नाही, खोकला नाही. हें काय आहे तरी काय दुखणं ?–

डॉक्टर : छे, छे. सीरियस्-बिरियस कांही नाही; तुम्ही पूर्ण विश्रान्ति घेतली पाहिजे. उगाच धावाधाव, आरडाओरड नि जिवाचा संताप करून

चालायचं नाही. शरीरावरच काय पण मनावरसुद्धा मुळीच ताण पडतां कामा नये.

त्रिंबक : तसं कांही नाही करीत मी. डॉक्टर.

जानकी : नाही काय ? केव्हा केव्हा एवढ्यातेवढ्या कारणानं इतकी आरडा-ओरड करतां की भीति वाटते आम्हांला !

त्रिंबक : मला कसंसंच होतं हो, डॉक्टर--कांही समजत नाही काय होतें तें. म्हणून असं करतों कांही तरी. जन्मभर काम केलेलं--पडून राहवत नाही मला. असं पडून राहायचं तरी किती दिवस ?

डॉक्टर : असं अधीर होऊन कसं चालेल, त्रिंबकराव ? तुम्ही लवकरच बरे व्हाल; पण शक्य तितकं स्वस्थ पडून राहिलं पाहिजे. ती नोकरी नि तें काम--सर्व कांही विसरून जा !

त्रिंबक : कामाचा तसा आता विचार करायला नकोच. चांगली अठरा महिन्यांची माझी भर पगारी रजा राहिली आहे. बावीस वर्षांत एकदासुद्धा मीं रजा घेतली नव्हती, डॉक्टर !

डॉक्टर : झालं तर मग--आता स्वस्थ पडून राहायला काय हरकत आहे ?

त्रिंबक : छे छे ! हरकत कांहीच नाही. नोकरीची मुळीच काळजी नाही वाटत. दुसरा एक ध्यास गेलीं बावीस वर्षे मनाला लागून राहिला होता, तोहि आता दोन दिवसांत नाहीसा होईल !

डॉक्टर : कसला ध्यास ?

त्रिंबक : (हसत) माझं घर दोन दिवसांत पुरं होईल. आजच अप्पा सांगत होता. परवा सकाळीं मुहूर्त पाहून गृहप्रवेश कर हवा तर, तो म्हणाला !

[ 'घर' शब्द त्यांनी उच्चारल्याबरोबर एखाद्या नकोशा झालेल्या गोष्टीचा कुणीं उल्लेख केल्याबरोबर माणूस जसा चेहेरा करतो तसा वासू करतो. ]

जानकी : घर ! घर !! घर !!! पुरे झालं तें घर,—त्या घरानंच तर ही अवस्था आणलीय् !

त्रिंबक : (एकदम काळेनिळे होऊन ओरडतात.) गप्प बस तू ! आंत जा बघूं !

[ जानकीबाई आंत जातात. ]

वासू : बाबा–बाबा, डॉक्टर काय म्हणतील ?

डॉक्टर : काय, झालं काय, त्रिंबकराव ?

त्रिंबक : हिला कांहीच समजत नाही !

डॉक्टर : शांत व्हा बघू तुम्ही आधी. हें घराचं प्रकरण काय आहे ?

त्रिंबक : (एकदम शांत होऊन) अहो, जोगेश्वरीला मी एक घर बांधतोंय्. घर म्हणजे काय—गरिबाचं चार खोल्यांचं एक झोपडं म्हणाना !

डॉक्टर : अस्सं !

त्रिंबक : स्वतःचं असं कुठे तरी एक लहानसं घर असावं, ही माझी अगदी लहानपणापासूनची इच्छा, बरं का, डॉक्टर. केव्हा ना केव्हा तरी घर बांधीन हा मनाला एक ध्यासच. सारं आयुष्य मुंबईच्या चाळींत काढलेलं—अजूनहि काढतोंय् म्हणा—पण ही एक महत्त्वाकांक्षा,—स्वतःचं घर, चार फुलझाडं, एखादा भाजीचा मांडव—मोठी मजा असते नाही, डॉक्टर ?

डॉक्टर : खरं आहे !

त्रिंबक : बावीस वर्षांत कधी कांही शौक केला नाही,–नाटक पाहिलं नाही की तुमचा तो सिनेमा पाहिला नाही. पैसे साठवून कुठं तरी घर बांधायचं हा निश्चय. बारा वर्षांपूर्वीच आठशे रुपयांना जोगेश्वरीला एक प्लॉट् मिळाला तो घेऊन ठेवला.

डॉक्टर : म्हणजे बारा वर्ष पडूनच होता की काय तो ?

त्रिंबक : तर काय ?—अहो, घर बांधायला पांच हजार रुपये तरी हवे होते ना ?—माझ्याकडे नव्हते पुरते हजार रुपये—शेवटीं गेल्या वर्षी जमले एकदाचे सहा हजार रुपये. तावडतोब अप्पाला सांगितलं, हं—आता कर सुरवात !

डॉक्टर . अप्पा कोण ?

त्रिंबक तें विसरलोंच सांगायला ! अप्पा कुलकर्णी माझा मित्र आहे एक. माझ्यासारखाच अमच्या ऑफिसांत कारकून होता. दहाबारा वर्षांपूर्वीच नोकरी सोडून तो कंत्राटदाराचा धंदा करूं लागला. छान चाललंय् त्याचं आता. अगदी थोडक्यांत घर बांधून द्यायचं त्यानं मला केव्हाच कबूल केलं होतं.

[बोलतां बोलतां त्यांना किंचित् श्वास लागलेला दिसतो.]

वासू : बाबा, तुम्हाला श्वास लागतोय–तुम्ही आंत चला पाहूं--

त्रिंबक : (एकदम ओरडतात.) गप्प बैस बघूं तूं तिथं ! कांही नाही मला श्वास लागलेला. (शांतपणें) डॉक्टर, आता इतका अधीर झालोंय् त्या घरांत जायला मी--होईन ना दोन-चार दिवसात अगदी खडखडीत बरा मी ? (ते छातीवरून हात फिरवूं लागतात.)

डॉक्टर : खरंच, तुम्हाला पुन्हा श्वास लागतोय्. तुम्ही डोळे मिटून स्वस्थ पडा. नका बोलूं आता. जा पाहूं आंत.

त्रिंबक : डोळे मिटले की डोळ्यापुढें चित्रं दिसूं लागतात, डॉक्टर !

डॉक्टर : कसलीं चित्रं ? मघाशी तपासतांना खोदून खोदून विचारीत होतों मी तेव्हा कांहीच सांगितलंत नाही तुम्हीं मला. कसली चित्रं दिसतात ?

त्रिंबक : डोळे मिटले की सारखीं तींच तींच चित्रं दिसूं लागतात–माझ्या घराच्या ओटयावर मी बसलोंय्. सकाळचा स्वच्छ सूर्यप्रकाश चहूंबाजूंनी घरांत शिरतोय्. त्या सोनेरी प्रकाशांत मी न्हाऊन निघतोंय्.

डॉक्टर : बरोबर आहे. तीस-चाळीस वर्षं या असल्या काळोख्या चाळींत काढलींत तेव्हा--

त्रिंबक : तसंच दुसरंहि एक चित्र सारखं दिसतं––रात्रीचा मी गच्चीवर बसलोंय्. आकाश ताऱ्यांनी खच्चून भरलंय. ताऱ्यांनी मढवलेल्या आकाशाच्या त्या निळ्या मांडवांत जणूं काय मी एकटाच मध्ये बसलोंय् !

डॉक्टर : उभ्या हयातींत कधी वर मान करून तुम्हीं आकाशांतले तारे पाहिले नसणार ?

त्रिंबक : कधी पाहणार, डॉक्टर ? सकाळी उठलं, आंघोळपांघोळ केली, चार घास पोटांत टाकले की कचेरींत गेलों. संध्याकाळीं दमून आलों की कुठं भाजी आणायला बाहेर पडलों तर--नाही तर एकदा जेवून अंग टाकलं अंथरुणावर की सकाळीं उठायचं. पुन्हा घाणा सुरू ! वर मान करून आकाशांतले तारे पाहात बसायला वेळ होता कधी कुणाला ?

डॉक्टर : तेंच म्हणतो मी––

त्रिंबक : दिवसा डोळे मिटले की आलटूनपालटून हीं चित्रं दिसतात नि रात्रीं––

डॉक्टर : रात्रीं स्वप्नं पडतात फार झोपत ?

त्रिंबक : झोपेंत म्हणा, अर्धवट जागृतींत म्हणा, पुन्हा पुन्हा दिसतं तेंच—

डॉक्टर : काय ?

त्रिंबक : होरमसजी नांवाचा आमचा एक हेडक्लार्क होता—मेला पुढें तो—वाटेल त्याला वाटेल तसा टाकून बोलायचा, हवा तसा अपमान करायचा हाताखालच्या लोकांचा——

डॉक्टर : त्याचं काय—

त्रिंबक : सांगतों ना—समोर आपल्या टेबलाशीं तो बसलाय, मला कांही तरी तो बोलणार, इतक्यांत ताड्कन हातांतले कागद त्याच्या तोंडावर मारून मी खोलीच्या बाहेर पडतोंय् असें चित्र सारखं दिसतं अलीकडे मला स्वप्नांत.

डॉक्टर : अरेच्या !

वासू : अलीकडे ही गोष्ट नेहमीं सांगतात हे.

त्रिंबक : दुसरीं दोन स्वप्नं मात्र छानदार आहेत.

डॉक्टर : तीं कोणतीं ?

त्रिंबक : हिला घेऊन मी नाटकाला गेलोय—अगदी आमच्या तरुणपणाचें चित्र दिसतं. बुट्टयाची पैठणी ही नेसलीय्. गंधर्वाचं 'स्वयंवर' बघायला गेलोंत आम्ही ! (मोठ्यांदा हसतात.) आश्चर्य वाटतं म्हणजे मीं एकहि नाटक पाहिलेलं नाही !—मघा तुम्हाला सांगितलंच—'स्वयंवर' नाटक नि गंधर्वाचं नांव ऐकत होतों पूर्वी इतकंच !

डॉक्टर : हं अस्सं ? आणखी ?

त्रिंबक : दुसरं नेहमी दिसणारं स्वप्न म्हणजे, वासू बी. ए., एल्एल्. बी. झालाय्—त्याच्या नांवाची बी. ए., एल्एल्. बी. अशी चकचकीत पाटी आमच्या नव्या घराच्या दारावर लागलीय्—

डॉक्टर : पण वासू——

त्रिंबक : हो – होय. स्वप्नच तें – वासूला मॅट्रिक झाल्यावरोबरच मीं नोकरीला लावला — डॉक्टर – डॉक्टर – आं – हा ! – हा ! हा ! – हा ! (त्यांना फार जोराचा श्वास लागतो. ते धापा टाकूं लागतात. मोठ्यांदा ओरडतात. ) डॉक्टर – डॉक्टर ! – अहो – अहो – अहो मला कसंसंच होतंय – आलं – आलं छातींत वर मघासारखं – मेलों – मेलों – (छाती दोन्ही

हातांनी दाबून धरतात.) मरतों ! -- मी मरतों -- डॉक्टर -- डॉक्टर, इंजेक्शन द्या लवकर -- ( उठूं लागतात. )

डॉक्टर: त्रिबकराव,--त्रिबकराव, असे घाबरूं नका, मी आहें ना ! (जानकीबाई धावत येतात.)

वासू: डॉक्टर, कांही तरी करा--

त्रिबक: अहो -- अ -- अ -- अहो, मी वर उडून जातोंय् -- मला -- म -- म -- ला धरून ठेवा -- मी -- मी -- मी -- उडून जातोंय -- मला ध -- ध -- ध -- धरून ठेवा !

डॉक्टर: मघाशी दिलेल्या त्या बाटलींतला एक डोस आणा तावडतोब. पुन्हा पुन्हा इंजेक्शन देण्यांत अर्थ नाही--

[ वासू आंत जाऊन डोस घेऊन येतो. डॉक्टर त्यांना तो काळजीपूर्वक पाजतात. हळूहळू त्रिबकराव शांत होतात. त्यांचा काळानिळा झालेला चेहेरा निवळतो. डोळ्यांना पदर लावून स्फुदत असलेल्या जानकीबाई पदर खाली करतात. ]

डॉक्टर: आता बरं वाटतं ना ?

त्रिबक: (छातीवर हात फिरवीत ) वरं वाटतंय आता--

डॉक्टर: ठीक आहे. मी जातों आता.

[ प्रकाशझोत मंदावत काळोख होतो. मिनिटभर काळोख. ]

* * *

: २ :

[ काळोख उजळूं लागतो. वेळ सकाळची असल्यामुळे प्रकाशझोतांत निळसर छटा आहेत. अंगाला पांघरूण लपेटून बाहेरच्या खोलींतल्या वासूच्या खाटेवर त्रिबकराव बसले आहेत. घराची रेखाकृति असलेला भला मोठा निळ्या कागदाचा नकाशा हातांत घेऊन अप्पा कुळकर्णी त्यांच्याशीं बोलत आहेत. ]

अप्पा: असं लहान पोरासारखं काय करतोस, त्रिबक ?

त्रिबक: तुला कल्पना नाही, अप्पा, माझ्या मनाची. मी आता अगदी कमालीचा अधीर झालोंय्. बावीस वर्षें ज्याचा ध्यास घेतला होता तें आता

अगदी तोंडाशीं आल्यावर मला नाही धीर धरवत. वाट पाहून मी थकलोंय् पाहा--

अप्पा : आता होईल रे दोन-तीन दिवसांत तयार. फक्त एक दरवाजा बसवायचाय् नि वर गिलावा करायचाय्, की झालंच--

त्रिंबक : अजून आणखी दोनतीन दिवस ? परवा भेटलास तेव्हा दोन दिवसांत सर्व कांही पुरं होईल म्हणालास. तेव्हा, पहिल्यांदा मुहूर्तावरच घरांत पाऊल टाकायचं म्हणून मीं काल पंचांग पाहून उद्या सकाळची वेळ पाहून ठेवली. तें कांही नाही---उद्या सकाळपर्यंत झालंच पाहिजे सर्व कांही पुरं---

अप्पा : या घराचं तुझं हें वेड आहे तरी काय, त्रिंबक ?

त्रिंबक : तुला माहीत आहे किती वर्षांपासून माझं हें वेड आहे तें. जिवाचे हाल हाल करून मी पैसे जमवीत होतों. बायकोचं, पोराचं, स्वतःचं कसलंच कुणाचं सुख मीं पाहिलं नाही. तुमच्याबरोबर ऑफिसांत कधी मी चहाहि घेत नव्हतों. तेव्हा तुम्ही मला हसत होतां---

अप्पा : हो ना. म्हणूनच म्हणतों तुझं हें घराचं इतकं आहे तरी काय ?

त्रिंबक : (गंभीर चेहरा करून खाली पाहात) आहे !

अप्पा : सांग की मला--

त्रिंबक : (एकदम) माझा मित्र म्हणायला असा तूं एकटाच आहेस, अप्पा. आतापर्यंत मनांतल्या मनांतलं कुणालाच सांगितलेलं नव्हतं, पण तुला सांगतोंच आता. आमच्या कोकणांतल्या गावीं मी अगदी लहान असतांनाची गोष्ट आहे. दहाबारा वर्षांचा असेन मी तेव्हा. फारच गरीब होतों आम्ही. माझी विधवा आई पुष्कळ वेळा एका श्रीमन्त नातेवाइकांकडे कामं करायला जाई. एकदा मला बरोबर घेऊन गेली होती ती. त्या नातेवाईकांची एक छान सातआठ वर्षांची गोरीगोमटी मुलगी होती. तिच्याबरोबर मी खेळत होतों. कुणीसं थट्टेनं म्हणालं, 'जोडा छान दिसतो हो !' त्या मुलीची आई एकदम फणकाऱ्यानं म्हणाली, 'इश्श ! घर नाही, दार नाही, या भिकारड्याला कोण देणार मुलगी ?' मला कसंसच वाटलं तें ऐकून. कितीतरी दिवस अगदी बेचैन होतों मी. कांही दिवसांनी पार विसरून गेलों सर्व तें. नंतर आम्ही मुंबईला आलों. मी मॅट्रिक झालों. नोकरी लागली. आईनं

माझ्यासाठी आमच्या गावांतल्या दोनतीन मुलींची चवकशी केली. त्याहि वेळेला, 'घर नाही–दार नाही--कोण देतो त्याला मुलगी!' म्हणून मुलींच्या आईबापांनी आईला नकार दिल्याची बातमी गावांतल्या कांही ओळखीच्या लोकांकडून मला कळली. माझं डोकं अगदी भणभणून गेलं. लहानपणचा तो पार विसरून गेलेला प्रसंग डोळ्यांपुढं लख्ख उभा राहिला. तेव्हापासून मीं मनाचा निर्धार केला, की कांही झालं तरी या गावांत पुन्हा पाऊल टाकायचंच नाही. कुठंतरी स्वतःचं असं एक घर बांधायचंच बांधायचं–नंतर आई वारली. माझं लग्न झालं. पण डोक्यांतलं तें वेड मुळीच गेलं नाही. असं हें फार जुनं वेड आहे, अप्पा. – बोल, करतोस की नाही. उद्या माझं घर तयार? बोल, मला मुळीच धीर नाही आता---

अप्पा : बघतों उद्यापर्यंत प्रयत्न करून; पण परवातेरवापर्यंत अगदी नक्की होईलच––

त्रिबक: (उठून थरथर उभे राहातात; एकदम ओरडतात.) झालंच पाहिजे उद्या सकाळपर्यंत – झालंच पाहिजे! – माझा अंत बघतां! --माझ्या जिवावर उठला अहांत तुम्ही सारे लोक – का – का – कायरे? (खाटेवर मटकन् बसतात. जानकीबाई आंतून धावत येतात.)

अप्पा: (भेदरून ेलेत) अरे – अरे, त्रिंबक, असं काय–काय झालं काय? काय वाटेल तें झालं तरी उद्या सकाळपर्यंत करतोंच पुरं घर–झालं ना?

[त्याच वेळेला बाहेरून कुठून तरी वासू आंत येतो. त्रिंबकराव थरथर श्वास टाकीत आहेत. त्यांचा चेहरा काळानिळा झाला आहे. जानकीबाई असहायपणें इकडेतिकडे पहात त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत आहेत.]

वासू : हें काय? ---पुन्हा 'अॅटॅक्' आला की काय? आई, बघतेस काय ––तो डोस आणना-- (वासू त्रिंबकरावांना धरतो. जानकीबाई डोस घेऊन येतात. डोस पाजतात. त्रिंबकरावांचा चेहरा उजळतो) चला, बाबा, आंत. डॉक्टरांनी नको नको सांगितलं तरी पुन्हा पुन्हा कशाला उठून बाहेर येतां कुणाला ठाऊक–

त्रिंबक : आता बरं वाटतंय् रे मला.

अप्पा : तें कांही नाही. त्रिंबक, तूं आंत जाऊन पड बघूं! उद्या सकाळ-पर्यंत तुझं घर झालंच म्हणून समज.

[जानकीबाई आणि वासू एकदम अप्पाच्या चेहऱ्याकडे टकमका पाहतात. तें घरच पुन्हा या आरडाओरडीला कारण, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो. त्रिंबकरावांना घेऊन जानकीबाई आणि वासू आंत जातात. थोड्याच वेळांत चहाचा कप घेऊन जानकीबाई बाहेर येतात.]

अप्पा : कशाला हवा होता चहा या गडबडींत, वहिनी?

जानकी : चहा चुलीवरून उतरीत होतें इतक्यांत हे ओरडले म्हणून बाहेर धावत आलें. आधीच ठेवला होता तुमच्यासाठी चहा.

अप्पा : काय, झालंय् तरी काय त्रिंबकला?--मला कांही समजत नाही. मघाशी मी तर एकदम भांबावूनच गेलों. काळानिळा चेहरा झाला होता त्याचा. मेंदूवर कांही परिणाम झालाय् का? डॉक्टर म्हणतात तरी काय?

जानकी : काय म्हणणार कपाळ? जन्मभर हाल काढले, तें आता सर्व एकदम उसळून वर आलंय्---दुसरं काय म्हणणार? तसं कांही झालेलं नाही, डॉक्टर म्हणतात. पूर्ण विश्रान्ति पाहिजे,--हवं तें खावंप्यावं म्हणून डॉक्टरनी सांगितलंय्.

अप्पा : त्याचा चेहरा काय फिक्का झालाय--डोळ्याखाली सूज आलेली दिसते. नाही नाही म्हणतां आता महिना होत आला. मघाशी श्वास टाकायला लागला तेव्हा बघवेना त्याच्याकडे.

जानकी : काय काय होतंय् म्हणून सांगूं? श्वास लागला की कसे काळेनिळे होतात, 'आणि मी उडून जातोंय्, मी उडून जातोंय्, मला धरून ठेवा!' म्हणून ओरडतात. तो डोस दिला की जरा बरं वाटतं. बोलत राहिले तर सारखे बोलतच राहतात, नाही तर डोळे मिटून निपचित पड-तात, तें किती हालवलं तरी हूं की चूं करीत नाहीत. मी अगदी घाबरून जातें केव्हा केव्हा–

अप्पा : विचित्रच रोग आहे!

जानकी : भूक लागली म्हणून खायला मागतात. चांगलं कांही खायला घेऊन जावं तर तोंडांत एक घास घेतल्याबरोबर 'छातींतून कांही वर येतंय्, छातींतून कांही वर येतंय्,--नाही उतरत घशाखाली!' म्हणून थू थू करून थुंकून टाकतात. रात्रीची स्वस्थ अशी झोपच नाही. एखादे वेळीं मध्येच

उठून अर्धा तास बिछान्यांत बसूनच राहातात. कांही बोलायची सोय नाही. बोललं की झालीच आरडाओरड सुरू.

अप्पा : मघाशी तेंच झालं ना. मीं सहज म्हटलं होईल दोन-तीन दिवसांत घर तयार, काय घाई आहे–तों एकदम तो जो उसळला–

जानकी : घर! घर!! घर!!! नांव नको त्या घराचं. त्याच्याच पायीं ही अवस्था झालीय्. माझी खात्री आहे. आमचं एक मेलं राहूं द्या–नाही तर नाही हवा तो कपडालत्ता, दागदागिना कधी मिळाला; पण,–(डोळ्यांना पदर लावून स्फुंदत) स्वतःला तरी गेल्या पंचवीस वर्षांत कांही सुख लावून घ्यायचं होतं? कांऽऽही नाही,--सदान्‌कदा तें घर, घर नि घर!

अप्पा : ऑफिसांत आमचं बोलणं व्हायचं; पण याला घराचं हें इतकं वेड आहे हें मला माहीत नव्हतं. त्या होरमसजी हेड्क्लार्कनं याचा एकदा इतका भयंकर अपमान केला होता,--आम्हाला वाटलं हा राजीनामा देऊन चालता होणार. संतापाच्या भरांत तसं म्हणतहि होता; पण थोड्या वेळानं मला म्हणाला, ‘सगळे अपमान गिळून नोकरी टिकवली पाहिजे, अप्पा. अशी सहजासहजीं गमावून चालणार नाही. घरासाठी पैसे जमवतोंय् मी!’—तेव्हा कळलं मला--त्यावेळी थट्टाच केली होती मीं त्याची.

जानकी : अहो--एकदा नाटकाला जायला उठले,—-पंधरावीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे--स्वतः कपडे केले, मला कपडे करायला सांगितले, नि शेवटच्या घटकेला, ‘नकोच, उगाच पैसे उडवून चालायचं नाही आपल्याला!’ म्हणून कपडे काढून ठेवले. गंधर्वाचं कसलंसं नाटक होतं. तें नाटक असं आहे नि तसं आहे, सगळ्या चाळींतले लोक बोलत होते म्हणून उठले होते जायला. वासू मॅट्रिक झाला तेव्हाहि तसंच. कॉलेजांत जावं, एल्‌एल्. बी. व्हावं अशी त्याची फार इच्छा,–यांनाहि तसं फार वाटत होतं; पण नाही होय करतां शेवटीं त्याला नोकरीला लावायचं ठरवलं.

अप्पा : (घराचा तो निळा नकाशा गुंडाळून घेत उठतात) एकेकाचं असतं खरं कांही तरी वेड. उद्या सकाळी येईन मी, वहिनी. त्याला म्हणावं, नक्की उद्यापर्यंत पुरं करतों घर म्हणून अप्पानं सांगितलंय,

[प्रकाशझोत मंदावत काळोख होतो. मिनिटभर काळोख.]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.★ ★
अनुक्रम ३०९२५ दि: १०-५-६०

: ३ :

[काळोख उजळूं लागतो. वेळ दुसऱ्या दिवशीं सकाळची. स्नान आटोपून आरशांत पाहात वासू केसांचा भांग पाडतो आहे. अप्पा येतात. त्यांच्या काखेंत घराच्या कागदावरल्या नकाशाचें भेंडोळें आहे.]

अप्पा : कसं आहे आज, वासू ?

वासू : कसं नि काय, काय सांगायचं, अप्पाकाका !

अप्पा : कां रे ? डॉक्टर कांही विशेष म्हणाले की काय ?

वासू : विशेष असं कांहीच नाही. (एकदम) खरं सांगूं, अप्पाकाका ?— डॉक्टरनी मला स्पष्ट सांगून टाकलंय्. आईला मुळीच सांगायचं नाही—

अप्पा : छे ! छे ! वहिनींना मुळीच सांगूं नको. कुठं आहेत वहिनी ?

वासू : खाली कुणाकडे तरी कांही आणायला गेलीय्—

अप्पा : बरं,—पण काय झालंय्, काय डॉक्टर म्हणतात ?

वासू : सर्व कांही झालंय्. व्हायचं कांहीच शिल्लक उरलेलं नाहीं. रक्तदाब वाढलाय्, हृदयक्रिया बिघडलीय्, किडनी खराब झालीय्, गात्रन् गात्र पोखरून गेलंय्—

अप्पा : मग ?

वासू : केव्हा काय होईल त्याचा नेम नाही डॉक्टर म्हणतात. टिकले तर असेच वर्ष सव्वा वर्ष टिकतील, नाहीतर पट्कन् एखादे वेळीं सर्व कारभार आटोपेल. आपण आपलं कर्तव्य करीत राहायचं झालं !

अप्पा : (निळा नकाशा उघडीत) काल रात्रंदिवस मजुरांना खपवून त्याच्या इच्छेप्रमाणं आज सकाळपर्यंत घराचं काम पुरं करून टाकलंय्,

वासू : कसलं घर घेऊन बसलां आहांत, अप्पाकाका, तुम्ही !

अप्पा : असं म्हणून कसं चालेल, वासू ! त्याचा सारा जीव आहे त्या घरावर. काय व्हायचं तें होणारच आहे. बघूं दे त्याला एकदा डोळे भरून पुरं झालेलं. मला वाटतं एका टॅक्सींत घालून नेऊं या त्याला आपण तिकडे.

वासू : पण,—डॉक्टर—

अप्पा : राहूं द्यात आता डॉक्टर नि फाक्टर ! विधिलिखित कुणी कांही

चकवायचा नाही. जा तू आंत. सांग त्याला मी आलोय् म्हणून. दाखवूंयाच त्याचं घर आज त्याला. असं डगमगून काय होणार आहे ? जा---चल.

[ वासू आंत जातो. अप्पा तो घराचा निळा नकाशा पाहात उभे आहेत. वासूच्या खांद्यावर हात ठेवून त्रिंबकराव बाहेर येतात, वासूच्या खाटेवर बसतात. ]

त्रिंबक : (त्यांचे डोळे लहान मुलांच्या सारखे आनंदाने चमकत आहेत.) झालं ना पुरं, अप्पा, घर ? अगदी तयार ? मीं सांगितलेल्या मुहूर्तावर केलंस म्हणायचं ! छान, छान ! मग केव्हा जायचं ?

अप्पा : (त्रिंबकरावांच्या तोंडावरचा तजेला पाहून त्यांना आनंद होतो.) आताच जाऊं की---आहे काय त्यांत !—तुझी प्रकृति छान दिसतेय् आज. वासू जा, टॅक्सी आण एक. (वासू जातो.) चांगलं गरम कांहीतरी अंगावर घे तूं—मग जाऊं आपण—

त्रिंबक : अगदी छान झालंय् ना ?

अप्पा : ( तो निळा नकाशा दाखवीत ) हें पाहा,—अगदी तुझ्या म्हणण्याबरहुकूम ! आहे की नाही ?

त्रिंबक : पूर्वेकडली ही खिडकी खूप मोठ्ठी आहे ना ? अगदी स्वच्छ सूर्यप्रकाश सर्व बाजूंनी आंत आला पाहिजे.

अप्पा : तूं सांगितलीस तशी केलीय्—हवा तितका सूर्यप्रकाश !

त्रिंबक : – नि रात्रीचं गच्चीवर गेलं की सारं आकाश आपलंसं वाटलं पाहिजे—

अप्पा : प्रश्नच नाही. साफ मोकळं आहे आजूबाजूला.

त्रिंबक : ती टेकडी आमच्या खिडकींतून दिसते काय रे?

अप्पा : दिसलीच पाहिजे---मध्ये कांही डोळ्याआड यायला नाहीच मुळी.

त्रिंबक : वाहवा ! वाहवा ! ! माझी जन्माची तपश्चर्या पुरी झाली, अप्पा !

(खालून 'पों पों' असा टॅक्सीच्या हॉर्नचा आवाज ऐकू येतो. ते एकदम उठून उभे राहातात.) आली टॅक्सी ! आता घरीं जायचं—(मुलासारखे उड्या मारीत मागल्या बाजूच्या गॅलरीकडे काळोखांत धावतात. अप्पा त्या उघडलेल्या नकाशाकडे पाहात उभे आहेत. वासू दारांत येतो तोच मागल्या काळोखांत धाडकन् कुणीतरी पडल्याचा आवाज येतो. वासू ! वासू ! !

अप्पा ऽऽऽ ! ! ! 'अशी आर्त किंकाळी काळोखांतून बाहेर येते.

वासू : कुठून ओरडले बाबा ?

अप्पा : तो काय तिथं –

[ वासू आंत धावतो. त्याच्या मागून जायला अप्पा वळतात तो वासू परततो. ]

वासू : सारा कारभार आटोपला, अप्पाकाका ! ( मान खाली घालून हुंदके देतो. )

अप्पा : ( बावरून ) हें – हें – हें – त्याचं घर–

[ त्यांच्या हातांतला घराचा तो निळा नकाशा हातांतून गळून खाली पडतो. प्रकाशझोत घराच्या त्या नकाशावर क्षणभर ठरतो. मग एकदम काळोख. ]

• • •

१४

# भाषा व मानवी जीवन

### भाषा आणि सत्य-दर्शन

कवि, शास्त्रज्ञ, कला, संस्कृति, राज्यकारभार या सर्वांचा विचार करतांना जिथे तिथे 'भाषा–भाषा–भाषा–' करून भाषेचें किती म्हणून स्तोम तुम्ही माजवतां आहां, असें कुणी म्हणेल. त्याला सुरुवातीला आपल्या प्राचीन शास्त्रकारांचें 'यः कोऽपि स्तेनयेद्वाचं सर्वस्तेयकरो हि सः' हें वचन सांगून मानवी जीवनांत भाषेचें किती महत्त्व आहे, या संबंधींच्या अलीकडल्या शास्त्रीय विचारांकडे मी वळतों. बायबलमधलें 'In the beginning was the word, and the word was with God' हें वाक्य पुष्कळांना माहीत आहे. आमच्या प्राचीन शास्त्रज्ञांनीं भाषेबद्दल काढलेले उद्‌गार काय किंवा बायबलमधलें शब्दाचें वर्णन काय, त्यांना कांहीं शास्त्रीय आधार नाहीं, त्या नुसत्या कवि-कल्पना आहेत, अशी आधुनिक शास्त्रीय युगाच्या सुरुवाती सुरुवातीला त्यांची बोळवण करण्यांत येत असे; पण आइन्स्टीनने केलेल्या महान् संशोधनानंतर ज्याप्रमाणें अगदीं अद्ययावत् असें पदार्थविज्ञानशास्त्र शंकराचार्यांचे मायावादा-जवळ गेलें आहे, त्याप्रमाणेंच भाषेला क्षुल्लक लेखणारे तत्त्ववेत्ते आतां जुनाट ठरत आहेत आणि नवे तत्त्ववेत्ते आणि संशोधक भाषेबाबत आमचे शास्त्रकार किंवा बायबल यांच्या वचनांच्या जवळपास येऊन ठेपले आहेत. जुन्यांतला एक श्रेष्ठ तत्त्ववेत्ता प्लेटो आणि अलीकडला श्रेष्ठ तत्त्ववेत्ता बर्गसाँ, हे दोघेहि अंतिम सत्यदर्शनाच्या दृष्टीने मानवी भाषेला अगदी कमी लेखणाऱ्यांपैकी आहेत. पण एवढ्या उच्च पातळीवरूनहि भाषेला कमी लेखण्याचे प्रयत्न करतांना त्या महान् विचारवंतांची किती त्रेधातिरपीट उडाली आहे हें प्रो. अर्बन या आधुनिक तत्त्वचिंतकांनी आपल्या 'Language and reality' या

ग्रंथांत फार बहारदारपणें दाखवून दिलें आहे. भाषेचें सर्वसामान्य महत्त्व या दोघांनाहि पूर्णपणें मान्य आहे. पण अत्युच्च पातळीवरल्या ज्ञानाकडे आपण जाऊं लागलों की भाषा साफ निरुपयोगी ठरते असें प्लेटो म्हणतो; तर बर्गसाँच्या मतें, भाषा हा वास्तवता आणि आपण यांच्यामधला पडदा आहे, आणि आपण तो फाडूनमोडून टाकला पाहिजे. अर्बन गमतीनें म्हणतो, "हें तुमचे म्हणणें खरे कसें? कारण तें तुम्ही भाषेंतूनच सांगतां आहां आणि भाषा तर वास्तव किंवा सत्य सांगू शकत नाहीं!" प्लेटो म्हणतो, "No intelligent man will put in language those things which his reason has contemplated." असें जर आहे तर अर्बन म्हणतो, "Plato should then have kept silent regarding this true Knowledge, for even if it is attainable to him, it is incommunicable.'

**भाषा हीन साधन ?**

सौंदर्यशास्त्रांतहि असा एक संप्रदाय आहे जो भाषेला हीन समजतो. भाषा हें अत्यंत निकृष्ट साधन म्हणून या साधनांतून निर्माण होणारी कथाकविता कादंबऱ्यांची ललित वाङ्मयकला ही एकंदर इतर कलांच्या श्रेणीमध्यें अत्यंत तळच्या श्रेणीची तर स्वर हें अत्यंत उत्कृष्ट साधन म्हणून संगीतकला ही अगदीं वरच्या श्रेणीची कला. या मंडळींच्या मतें सौदर्यभावना नांवाची एक स्वतंत्र भावना प्रत्येक माणसांत असते. आणि निसर्गांतलें किंवा कलेंतलें सौंदर्य पाहून त्याला जो आनंद होतो तो या भावनेच्या संतृप्तीमुळें. रूपरंगसौंदर्य पाहून नेत्रेंद्रियाला ज्या संवेदना होतात त्यांची संघटना चित्रकार रंगरेषांच्या साधनानें करतो आणि आपण ती संघटना पाहिली की आपल्या नेत्रेंद्रियाला त्या संवेदना होऊन आपली सौंदर्यभावना तृप्त होते. हा चित्रकलेचा आनंद. असाच संगीतकलेचा कर्णेन्द्रियद्वारें झालेला आनंद. स्वर हें अत्यंत शुद्ध साधन, कारण संगीतकार तें संगीताकरतांच वापरूं शकतो. त्या मानानें रंगरेषा हें कमी शुद्ध साधन, कारण इतर अनेक लोक तें इतर कामाकरतां वापरूं शकतात. भाषा तर अगदीच अशुद्ध साधन, अमुक एका इंद्रियाच्या संवेदना तें निर्माण करूं शकत नाहीं. शब्दांनी उभें केलेलें चित्र डोळ्यांना दिसत नाहीं;—कल्पनेने उभें करून तें पाहायचं म्हणजे त्यानें निर्माण केलेली दक्संवेदना ही गौण—(Second-hand) संवेदना असते. अर्थात् चित्र फक्त

दृष्टीची संवेदना निर्माण करतें किंवा संगीत फक्त श्रवणेंद्रियांची करतें-त्यांच्याशीं तुलना करतां भाषा रूप, रस, गंध, स्पर्श, श्रवण अशा पांचहिं इंद्रियांची संवेदना वर्णन करते हें खरें आहे; पण त्या वर म्हटल्याप्रमाणें गौण, प्रत्यक्षानुभूतीच्या नव्हेत. त्याचप्रमाणें भाषा हें साधन कलेप्रमाणेंच नेहमीच्या व्यवहारांतहि इतक्या लहानमोठ्या, मूर्ख शहाण्या लोकांकडून इतकें वापरलें जातें की तें अगदींच भ्रष्ट झालेलें असतें. मर्ढेकरांच्या भाषेंत सांगायचें म्हणजे It is tainted by the traffic of the world. भाषेची ही चिकित्साहि आता जुनाट आणि वुरसलेली झाली आहे, असें नवें संशोधन सांगतें. इंद्रियगोचर संवेदना अनुभवणें; त्या स्मृति-संपुटांत सांठवून ठेवणें आणि त्यांचा परस्परसंबंध जोडणें एवढेंच मानवी मनाचें कार्य, अशी काल-परवापर्यंतच्या शास्त्रज्ञांची कल्पना होती; पण अनादिकालापासून वावरत असलेल्या मनाच्या एका नव्या शक्तीचें दर्शन अलीकडच्या शास्त्रज्ञांना झालें आहे. या अफाट अनोळखी जगांत जन्माला आल्यापासून तों मरेपर्यंत माणसाला या जगाची ओळख करून घ्यावयाची असते. इतकेंच नव्हे तर सुखानें जगावयाचें म्हणजे क्षणोक्षणीं वदलत जाणाऱ्या परिस्थितीशीं आणि प्रसंगांशीं जमवून घ्यावयाचें असतें--संवाद साधावयाचा असतो. त्याकरतां सुसंगत अशा कांही श्रद्धांनी त्याला त्याच्या मनाची वैठक तयार करावी लागते. तशी ती तयार झाली नाही तर या जगांत हतबुद्ध होत होत तो वेडा होत जाईल. अशा तऱ्हेच्या श्रद्धांची निर्मिति आणि संघटना माणूस नानाप्रकारच्या प्रतीकांचा उपयोग करून करीत असतो. मानवजातीच्या बाल्यापासून तों सध्यांच्या परिणतावस्थेपर्यंतचा इतिहास पाहिला तर धर्म, कला, सामाजिक व्यवहार, राजकारण सर्व प्रकारच्या जीवन-क्षेत्रांत माणूस सतत प्रतीकांचा उपयोग करीत असलेला दृष्टीस पडतो. धर्मांतलें कर्मकांड, राज्य-व्यवहारांतले ध्वज, बिल्ले, पट्टे हीं सर्व प्रतीकें आहेत. अफाट, अमर्याद वास्त-वता त्याचें मन जशीच्या तशी धरून ठेवूं शकणार नाही. तेव्हा मानवी मन केवळ खुणांचा–Signs चा नव्हे,--तर प्रतीकांचा–Symbols चा सतत उपयोग करीत असतें. खूण केवळ वस्तूचें निदर्शन करते. प्रतीकांत केवळ निदर्शनाची शक्ति नसते--प्रतीकांत ज्या वस्तुस्थितीचें तें प्रतीक असेल, तिच्यांशीं निगडित असलेले अनेक साहचर्य-संबंध, अनेक सुखदु:खांच्या स्मृति सामावलेल्या

असतात. राष्ट्रध्वज हें प्रतीक आहे–नुसती खूण नव्हे. राष्ट्रध्वजाचा कुणी अपमान केला तर माणसें प्राण घ्यावयाला आणि प्राण द्यावयाला तयार असतात. आई हा नुसता शब्द आहे. पण आईवरून कुणी शिवी दिली तर माणूस त्याचें डोकें फोडायला धावतो. तुझ्या आईवर प्रत्यक्ष अत्याचार त्याने कुठे केला आहे ? नुसत्या शब्दांत काय आहे, असें त्याला कुणीं म्हणू शकेल काय ? जन्मल्यापासूनचें वात्सल्य, प्रेम, आदर, भूक-तहान यांचे अनंत अनुभव त्या एका शब्दांत असतात. प्रतीकें निर्माण करावयाचीं आणि तीं सतत वापरीत राहावयाची या मनाच्या शक्तीचा सर्वांत मोठा आविष्कार म्हणजे भाषा.

**भाषेबाबतच्या खुळ्या कल्पना**

मानवी जीवनांतल्या भाषेच्या महत्त्वाबद्दल शास्त्रज्ञांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी जें विवेचन केलें आहे त्यावरून भाषा म्हणजेच मानवी जीवन इतकें धाडसी विधान भाषेबद्दल करतां येईल. जीवन जितकें विकसित तितकी त्यांत विविधता अधिक ; आणि या अधिक विविधतेंतून आणि अधिक सूक्ष्मतेंतून निर्माण झालेली एकताहि अधिक भव्य आणि अधिक जिवंत एका प्रचंड ठोकळ्यांतल्या एकतेपेक्षां विविध रंग, रूप आकारांच्या अनेक लहानमोठ्या ठोकळ्यांच्या कलात्मक आकृतींतून व्यक्त झालेली एकता केव्हांहि श्रेष्ठ हें सांगावयास पाहिजे असे नाही. सर्व मानवता एक असली, सर्व जग एक असलें, तरी माणसें जशीं अनेक प्रकारचीं आहेत, प्रदेश जसे अनेक प्रकारचे आहेत तसे सर्व भाषा मूलत: एकच कार्य करीत असल्या तरी प्रत्येक भाषेचें स्वत:चें असें कांही एक वैशिष्ट्य असतें आणि विशिष्ट प्रकारें ती जीवनदर्शन देत असते. मानवी जीवनाचा विकास साधावयाचा,–उन्नति करावयाची म्हणजे प्रत्येक भाषेचा विकास आणि उन्नति झाली पाहिजे. भाषेचा विकास म्हणजे भाषेची शब्द-संपत्ति वाढणें आणि त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे भाषेची अनुभवसंपत्ति वाढणें.

**जीवन विशाल तर भाषा विशाल**

भाषा हा मानवी जीवनाचा जिवंत आविष्कार आहे. तिचा विकास आणि विस्तार मुख्यत्वेंकरून ती भाषा बोलणारे लोक त्या भाषेंत किती विविध आणि किती विस्तृत क्षेत्रांत, किती सखोलतेने जगतात, यावर अवलंबून असतो. तज्ज्ञ किंवा पंडित एखाद्या दुसऱ्या महत्त्वाच्या किंवा अर्थपूर्ण शब्दांची भर

भाषेंत घालतील, परिभाषेचें एखादें लहानसें कलम जोडतील; पण भाषेचा वृक्ष जनतेच्या जीवनांतून उगवतो आणि जनता-जीवनाच्या विकासाबरोबरच विकसित होत असतो. नाना खंडांत इंग्रजांचें जीवन पसरलें, राज्यकर्ते, मिशनरी, खलाशी, सैनिक म्हणन राजनैतिक, आर्थिक, सैनिकी, आरमारी अशा जीवनाच्या हरएक क्षेत्रांत ते व्यवहार करूं लागले, तेव्हा त्यांनी जर ठरविलें असतें की, या सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांत आपण फ्रेंच भाषा वापरायची आणि फक्त स्वयंपाकघरांत किंवा दिवाणखान्यांत आपली मातृभाषा इंग्रजी वापरायची तर इंग्रजी भाषेचा शब्दसंपत्तीच्या आणि अनुभव-भांडाराच्या दृष्टीने आज जो प्रचंड विकास झालेला दिसतो तो दिसला असता काय? ज्या लोकांचें जीवन संकुचित असल्यामुळे त्यांच्या भाषेच्या व्यवहाराचें क्षेत्रहि संकुचित, त्यांच्या भाषेची काय स्थिति असते, याची उत्तम कल्पना आफ्रिकेतल्या जंगलांत राहणाऱ्या एका वन्य जमातीला भेट देऊन आलेल्या एका मिशनऱ्याने सांगितलेल्या गोष्टीवरून येते. या जमातीचें जीवन म्हणजे कंदमुळें किंवा शिकार केलेल्या पशुपक्ष्यांचें मांस खाणें, वल्कलें परिधान करणें, गाणें, नाचणें आणि फार तर शेजारच्या दुसऱ्या जमातीशीं युद्ध करणें किंवा गळ्यांत घालावयाच्या रंगीत दगडगोट्यांची देवघेव करणें. या जमातीचें जीवन पहात असतां तळ्याच्या काठीं विचारांत मग्न होऊन बसलेला त्यांच्यापैकी एक म्हातारा त्याला दिसला 'हा कोण?' म्हणून त्याने जमातींतल्या इतर लोकांना विचारलें. तेव्हा ते म्हणाले, हा आमच्यातला फार मोठा गणिती आहे. आफ्रिकेंतल्या जंगलांत अर्धनग्न बसलेला हा मोठा थोरला गणिती कोण असावा, या कुतुहलाने 'मोठा गणिती म्हणजे हा काय करतो?' असें मिशनऱ्याने त्या लोकांना विचारले. तेव्हा "आम्ही सर्व फक्त वीसपर्यंत मोजूं शकतों--हा आणखी सहा मोजूं शकतो." असें त्या लोकांनी गंभीरपणें सांगितलें! सव्वीस-पर्यंत मोजूं शकणारा माणूस त्या जमातीचा आइन्स्टाईन ठरला. त्यांच्या भाषेंत सव्वीसापुढे आंकडाच नव्हता. बरोबरच आहे. ज्या जनतेला प्रचंड व्यापारी उलाढाली करावयाच्या असतात, नाना प्रकारचीं नाणीं पाडावयाचीं असतात, त्यांची अफाट प्रमाणावर देवघेव करावयाची असते, तिच्याच भाषेंत लक्ष, दशलक्ष, कोटी, अब्ज, खर्व, निखर्व, परार्ध हे शब्द निर्माण होणार. रंगीत दगडगोट्यांची देवघेव ही ज्यांची सर्वांत मोठी देवघेव त्यांच्या भाषेंत सव्वीसाच्या पुढले आंकडे हवेत कशाला?

● ● ●

१५

# प्रश्नोत्तरें

सर्व प्राण्यांत दुःखी कोण ?

मासा !

कारण दुःखामुळें त्याच्या डोळ्यांत आलेले अश्रु पाण्यांत कुणाला दिसत नाहीत, आणि म्हणून त्याला अधिकच दुःख होते.

सर्व प्राण्यांत सुखी कोण ?

पोपट !

कारण आपण काय बोलतो ते त्याला स्वतःला समजत नाही आणि दुसऱ्यांनाहि त्याच्या बोलण्याचे कांही वाटत नाही.

सर्व प्राण्यांत परोपकारी कोण ?

रेशमाचा किडा !

कारण जगाला आपण काय मौल्यवान् चीज देतों आहो याची त्याला मुळींच कल्पना नसते.

• • •

१६

# ताजवा

डोळे मिटून दिवास्वप्नांत रंगून गेलों असता, एक विराट् हस्त मला दिसूं लागला. त्या हातांत एक विराट् ताजवा दिसत होता.

पृथ्वीगोलाचे दोन भाग करून दोन पारडीं केलीं होतीं. दुसऱ्या हाताने एकदां एकांत तर दुसऱ्यांदा दुसऱ्यांत असें त्या दोन्ही पारड्यांत कांहीं तरी टाकलें जात होते आणि पारडीं समतोल ठेवलीं जात होतीं.

" हे काय टाकतां आहां आपण ?"—मी विचारलें

" एका पारड्यांत मानवाचीं सत्कृत्यें आणि दुसऱ्यांत दुष्कृत्यें !" धीर गंभीर ध्वनि आला.

" पण कां म्हणून"—मी उद्गारलों.

" माझा तो खेळ आहे !" उत्तर आलें.

दचकून मीं डोळे उघडले आणि स्वतःशीच पुटपुटलों,

"अनादि कालापासून चाललेल्या या खेळाचा एखादे दिवशीं यांना कंटाळा आला तर !"

● ● ●

१७

# मी महाकवि ?

स्वतःला महाकवि ठरविणारा लेख मी स्वतःच लिहितों आहें, हें पाहून मला वेड तरी लागलें आहे किंवा कांही तरी अचाट विनोद मी करतों आहें, असेंच कुणाहि सुबुद्ध वाचकाला वाटेल; पण या दोहोंपैकी एकहि गोष्ट खरी नाही. खरोखरच मी महाकवि आहें. त्याला माझा स्वतःचा मुळीच इलाज नाही. जाणत्या साहित्य-चिकित्सकांनी ही गोष्ट सिद्ध केलेली आहे. त्यांच्यापुढे मी कांही करूं शकत नाही. रवीन्द्रनाथ टागोर किंवा खलिल जिब्रान यांच्या काव्यांत जे जे गुण आढळतात ते ते सर्व मी लिहिलेल्या काव्यांत आहेत, हें तज्ज्ञांनी सांगितल्यानंतर मी महाकवि आहें, ही गोष्ट इतर लोकांनीच काय पण मीहि मान्य करायलाच पाहिजे. जीवनमूल्याचें समन्वयी आकलन, साध्या प्रसंगांतून महान् तत्त्वदर्शन, सर्वस्पर्शी कल्पकता, जीवनदर्शनाची सूक्ष्मता, महान् सत्यांचें मर्मभेदक आणि सूचक प्रतिपादन, गगनाला वेधणारी कल्पनाशक्ति, चिंतनात्मक जीवनदृष्टि वगैरे वगैरे गोष्टी या टागोर किंवा जिब्रान यांच्या-सारख्या महाकवींचीं लक्षणें आहेत. हीं लक्षणें तज्ज्ञांच्या शब्दांत मीं सांगितली आहेत; आणि हीं सर्व लक्षणें माझ्या लिखाणांत आहेत, हें तज्ज्ञांनी याच शब्दांत सांगितलें असल्याचें या लेखाच्या शेवटीं दिलेल्या अनेक उताऱ्यांवरून दिसून येईल.

मराठी साहित्यांत घडलेली ही घटना इतके दिवस कुणालाच कशी कळली नाही, हें आता मला स्पष्ट करायला हवें. मी जाहीर करीपर्यंत ही गोष्ट कुणालाच कळणें शक्य नव्हतें. आता ही गोष्ट जाहीर करण्याची वेळ आली आहे, असें मला वाटते. वस्तुस्थिति अशी आहे. गेली तीन-चार वर्षें निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आणि दीड-दोन वर्षांपूर्वी 'रुपेरी वाळू' या नांवानें पुस्तकरूपाने बाहेर पडलेल्या खलील जिब्रानच्या मीं अनवादित केलेल्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्व कणिका स्वतंत्रपणें

मीं लिहिलेल्या आहेत,–जिब्रानच्या कोणत्याहि कणिकांचे ते अनुवाद नाहींत. स्वतःच्या स्वतंत्र कल्पनेने लिहिलेलें लिखाण जिब्रानच्या नांवाने मीं प्रसिद्ध कां केलें तें सांगतों. मोठमोठे रसिक टीकाकार जिब्रानच्या ज्या रूपकात्मक किंवा प्रतीकात्मक वाङमयाची वहावा करतात तें मीं वाचूं लागलों तेव्हाच तसें कांही तरी मलाहि लिहितां येईल असें मला वाटूं लागले. दोन-चार कणिका मीं लिहूनहि टाकल्या; पण टागोर किंवा जिब्रान यांच्यासारखे महाकवि जें वाङमय लिहितात तें लिहिणें इतकें सोपें कसें असेल, असे वाटे. आपण लिहितो त्यांत खरोखरी कांही तथ्य आहे कीं नाही, हे मला समजेना. तेव्हा जिब्रानच्या नांवाने या कणिका प्रसिद्ध कराव्या आणि सामान्य वाचक व तज्ज्ञ टीकाकार काय म्हणतात तें पाहावें असा विचार केला.

त्या प्रसिद्ध होऊं लागल्या तेव्हा जिब्रानच्या कुठल्या इंग्रजी भाषांतरावरून मीं त्या करतों म्हणून अनेक जण विचारूं लागले. या पेचांतून बाहेर पडण्याकरिता 'या इंग्रजींत' कुठेंच आलेल्या नाहींत; अरबी जाणणाऱ्या एका मुसलमान मित्राने मला इंग्रजी करून दिल्याने त्याचें मराठी भाषांतर मीं करतों आहें, असें मला सांगावें लागलें. 'रुपेरी वाळू'च्या प्रास्ताविकांतहि हाच खुलासा दिला आहे. अनेक सज्जनांपासून वस्तुस्थिति कांही काळ कां होईना पण लपवून ठेवल्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक क्षमा मागतों. उदार अन्तःकरणाने ते मला क्षमा करतील अशी मला आशा आहे. विशुद्ध वाङमयीन मूल्यें कळावीं, हाच माझा हेतु होता. वाङमयाचा त्यामुळे फायदाच होईल, असें मला वाटतें. टीकाकार किंवा तज्ज्ञ साहित्यिक झाला तरी तो माणूसच असतो. मोठें नांव असलेल्या लेखकाच्या लिखाणातले थोर गुण त्याच्या जितक्या लवकर ध्यानांत येतात तितक्या लवकर नांव न झालेल्या लेखकांतले त्याच्या ध्यानांत आले नाहीत तर त्याचा मुळींच दोष नाही. ते अगदी स्वाभाविक आहे. मात्र हें लक्षांत घेऊन छोटयांच्या लिखाणांतले गुण काळजीपूर्वक पाहण्याची प्रवृत्ति वाढावयाला हवी.

वाङमयाच्या इतिहासांत अशा प्रकारच्या खोडया चांगल्या साहित्यिकांनी केलेल्या असल्यामुळे मला धैर्य आलें हें कबूल केलें पाहिजे. स्वतःच्या कविता भानुसिंह या नांवानें प्रसिद्ध करून, भानुसिंह हा एक प्राचीन कवि आहे आणि त्याचें ग्राड आपणाला सापडलें, असे रवीन्द्रनाथ टागोरांनी जाहीर

केलें होतें. एका विद्वानाने भानुसिंहाच्या काव्यावर प्रबंध लिहून पदवीहि मिळविली! पुन्हा एकदा सर्वांची क्षमा प्रार्थून 'रुपेरी वाळू' वरील तज्ज्ञांच्या अभिप्रायांतील उतारे देतों.

"...जिब्रानच्या अशा छोटया कथा परिच्छेदांतून प्रामुख्याने नजरेंत भरणारे सर्व विशेष—मार्मिकपणा, उपरोध, भेदक दृष्टि ,जीवनमूल्यांचें समन्वयी आकलन —यांतहि आहेत. 'प्रश्नोत्तरें' खरोखर विस्मयकारक आहेत 'वशिष्टच', 'माकड', 'शत्रु', 'शिंपी', 'शक्ति' यांतील मार्मिक व्याजोक्ति 'सौजन्य', 'भिकारी' यांमधील भेदक उपरोधीपणा, 'शहाणा' 'स्वातंत्र्य', 'सौंदर्य', वगैरेंतून दिसणारें जीवन-दर्शन यांवर खास जिब्रानचा ठसा स्पष्ट उमटला आहे"

"—प्रत्येक कणिकेमध्ये कांही तरी नावीन्यपूर्ण विचार ग्रथित केला आहे. कणिकांचें वैशिष्टय हें की, त्यांत विचारांचा किंवा भावनेचा विस्ताराने आविष्कार नसतो. एकच विचार अतिशय थोडक्या शब्दामध्ये व सौंदर्यपूर्ण रीतीने प्रकट केलेला असतो. त्यामुळे त्या तत्त्वगंभीर वाटतात . . . . या कणिकांत असेंच तत्त्वदर्शन आहे. 'प्रश्नोत्तरें', 'सत्याची सावली', 'भांडण', 'कलावंत', 'शहाणा', 'स्वातंत्र्य', 'शत्रु', 'सौंदर्य', 'उधळपट्टी' या कणिका विचार-मनोहर वाटतात आणि आपल्याला कांही तरी नवीन विचार-सौंदर्याचें दर्शन झाल्याचा आनंद होतो. कल्पनावैचित्र्य आणि अर्थप्रतीति या बाबतीत या कणिका सरस वाटतात . . . ."

" . . या सुललित अनुवादांतील रूपक-कथा रेखीव, हृद्य आणि जिब्रानच्या उत्तंग प्रतिभेचें अस्फुट दर्शन घडविणाऱ्या आहेत. 'रुपेरी वाळू' मधील 'शक्ति', 'मजूर' या कथांत जिब्रानचा सामाजिक समानता आणि संघटणा यावरील पुरोगामी दृष्टिकोन प्रतीत होतो. 'कलावंत', 'वैशिष्टच', 'सौंदर्य' 'शिंपी' या रूपक-कथांत मानवी जीवनांत विवेक आणि वासना यांचा सुरेख संगमच अंतिम मांगल्यकारक आहे, हें सूचित केलें आहे. 'तारका' आणि 'शत्रु' या कथा जिब्रानचें कल्पनावैभव कसें अपूर्व होतें याची प्रचीति देतात . . ."

" . . . जीवनांतील विविध सूक्ष्म अनुभूति कथारूपाने मोठ्या कल्पनापूर्ण रीतीन मांडण्यांत जिब्रान सिद्धहस्त आहे . . . त्याच्या गोष्टी आकाराने अतिशय लहान असल्या तरी त्यांत आशय फार मोठा असतो. जगांतील ढोंगसोंगें, मर्खपणा, आंधळेपणा, यांच्यावर असल्या कथांतून तो मोठ्या

सफाईने हत्यार चालवितो. कल्पकता व उपरोध यांच्यामुळेच त्याच्या चुटके-वजा गोष्टींनासुद्धा कांही वेगळीच आकर्षकता येते.

'रुपेरी वाळू' मध्ये जिब्रानचे हे सर्व गुण प्रतिबिंबित झाले आहेत. कणिका म्हणजे एखाद्या सनातन सत्याचें अथवा सुंदर सुभाषिताचें केवळ नाट्यरूपांतर आहे असें वाटतें. कित्येकदां तो पूर्वपरिचित कल्पनाच त्यांचा घाट बदलून पुढें मांडतो. 'सत्याची सांवली', 'स्वातंत्र्य', 'ताजवा' वगैरे या कथासंग्रहांतली प्रकरणें अशांपैकीच आहेत, पण 'भिकारी', 'शहाणा', 'कलावंत', 'सौंदर्य', इत्यादि कथा हे जिब्रानची सर्वस्पर्शी कल्पकता आणि त्याची जीवन दर्शनाची सूक्ष्मता यांचा मेळ किती मनोहर होऊं शकतो याचे नमुनेच आहेत . . . ."

" . . . . या अनुवादाचें महत्त्वमापन करावयाचें म्हणजे तें कणिकांत प्रतिपादलेल्या विचारांच्या मौलिकतेवरून करावें लागेल. त्या दृष्टीने . . . त्यांत व्यक्त झालेली स्वतंत्र आणि मर्मग्राही जीवनदृष्टि आपणांस मननीय वाटूं लागते. प्रत्येक कणिकेंतून घडविलेले मानवी जीवनाचें वस्तुनिष्ठ दर्शन चिंतनशील वाचकाच्या अन्तःकरणावर तत्काळ प्रभाव पाडूं लागतें. . . . . 'शत्रु' या कणिकेंत नेहमीं दुर्लक्षिलें जाणारे जीवनांतील एक महान् सत्य अत्यंत मर्मभेदक आणि सूचक रीतीने प्रतिपादिलेलें आहे . . . एकेक कणिकेवरील प्रतीकात्मकतेचें आवरण दूर सारून आपण त्यांचें वाचन करूं लागलों म्हणजे कधी जुन्या तर कधी नव्या अनुभूतींच्या संप्राप्तीचा आपणास लाभ होतो..."

". . . जिब्रानच्या या कथांमध्ये कथानक आणि पात्रें यांचें महत्त्व त्यांच्या निमित्ताने व्यक्त होणाऱ्या तत्त्वज्ञानामुळें आहे, आणि हें तत्त्वज्ञानहि उत्तुंग कल्पनाशक्तीच्या या प्रतिभेंतून काव्यमय स्वरूपांत बाहेर पडते. पानापानावर याचीं उदाहरणें हवीं तेवढीं मिळतील. रूपकांचा अवलंब हें जिब्रानच्या कल्पनाशक्तीचें सर्वांत मोठें वैशिष्ट्य. त्या दृष्टीने या सर्व कथा रूपककथाच आहेत. जिब्रानची खोल, गंभीर आणि चिंतनात्मक जीवनदृष्टि, गगनाला वेधणारी कल्पनाशक्ति आणि अन्तःकरणाची उत्कटता यांचा नमुनाच हवा असेल तर 'रुपेरी वाळू'मधील 'प्रश्नोत्तरे', 'स्वातंत्र्य', 'उघळपट्टी', 'ताजवा,' या कणिकांचा उल्लेख करावा लागेल. जिब्रानची जीवनदृष्टि आणि प्रतिभा यांचा अर्कच त्यामध्यें उतरला आहे . . ."

● ● ●

१८

# मी 'आम्ही' होतों तेव्हा

वृत्तपत्र सृष्टींतले माझे कांही मनोरंजक अनुभव संपादकांनी मागितले तेंव्हां डोकें खाजवून मी विचार करूं लागलों. गेलीं पंधरा वर्षे वृत्तपत्र-सृष्टीशीं माझा निकटचा संबंध आला आहे हें खरें, पण मुद्दाम सांगण्या-सारखा असा कांही मोठा अनुभव मला आहे, असें म्हणतां येणार नाही. या सृष्टींत वावरणाऱ्यांच्या अनुभवाला येणाऱ्या दोन चार मनोरंजक गमती मलाहि अर्थात् सांगतां येतील. त्यांपैकी कांही सांगतों.

अलीकडे बहुतेक मराठी पत्रांना मालकशाहीचे चटके बसत आहेत. 'चित्रा' साप्ताहिक मीं आणि रांगणेकरांनी काढलें तेव्हा पहिल्यांदा मालकहि आम्हीच आणि नोकरहि आम्हीच होतों; पण चार-सहा महिन्यांत भांडव-लाची टंचाई निर्माण झाल्याबरोबर चित्राची लिमिटेड कंपनी करावी लागली. तसे लिमिटेड कंपनींत आम्ही डायरेक्टर असल्यामुळे एका अर्थीं अंशतः मालकच होतों. पण श्री. लोटवाला यांचे शेअर्स आमच्यापेक्षां कितीतरी पटींनी अधिक असल्यामुळे शेवटीं सत्ता त्यांच्या हातीं जावी यांत आश्चर्य करण्या-सारखें कांहीच नव्हतें. इथे त्यांच्या आणि आमच्या मतभेदाची कहाणी मला पुन्हा सांगावयाची नाही. कुठे तरी एकदा ती सांगून झालेली आहे. श्री. लोटवाला यांचे कांही चांगले गुणच मला इथे सांगावयाचे आहेत. सत्ता हातीं असल्यामुळें श्री. लोटवाला शेवटी कांहीहि करीत असले तरी आम्हाला एक मोठें समाधान होतें. त्यांच्याशीं भांडतांना किंवा वादविवाद करतांना त्यांचें वय, संपत्ति, प्रतिष्ठा यांचा कांहीएक मुलाहिजा न ठेवतां तुम्ही त्यांना कितीहि शिव्या हासडल्यात तरी त्या ते मुळींच मनाला लावून घेत नसत. ( या बाबतींत त्यांची शंभर टक्के लोकशाही वृत्ति होती ! ) त्यांच्या मालकीच्या गुजराती पत्राच्या एका संपादकाच्या खोलींत त्यांचा एक

मुलगा–तो आता हयात नाही–एकदां गेला आणि कांही बडबड करूं लागला. संपादकानें खाडकन् त्याच्या श्रीमुखांत भडकावून त्याला बाहेर जावयास सांगितलें. बापाकडे तो संपादकाविरुद्ध तक्रार घेऊन गेला. बापानें "फार चागलं केलंस–आणखीं एक ठेवून द्यायची होतीस!" म्हणून संपादकाला शाबासकी दिली!

माफी (अँपॉलॉजी) व दिलगिरी (रिग्रेट) यांतल्या सूक्ष्म फरकासंबंधी न्यायालयांत वाद करण्याचा एक प्रसंग आमच्यावर आला होता. सुदैवानें न्यायाधीशाला आमचें म्हणणें पटलें. जाणूनबुजून आपण एखाद्याला दुखावला किंवा त्याचा अपमान केला तर माफी मागण्याची पाळी येते. आपल्या नकळत आपला हेतु नसताना, चुकून आपल्याकडून कुणी दुखावला गेला किंवा त्याचा अपमान झाला तर दिलगिरीवर भागवायला हवें. दिलगिरी व्यक्त करणाऱ्याचें मन आणि बाजू शुद्ध असते; माफी मागणाराचें तसें नसतें. हा या दोहोंमधला फरक आहे, असे मला वाटते.

कॉंग्रेसचे एके काळचे खजीनदार आणि प्रख्यात कॉंग्रेसभक्त जमनालाल बजाज यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप करणारा एका लेखकाचा एक लेख एकदा 'चित्रांत' छापला गेला. त्या लेखकाचे लेख नेहमी 'चित्रांत' यायचे; तेव्हा आमच्या सहकाऱ्यानें तो छापून टाकला होता. संपादकांच्या नकळत हा प्रकार झाला होता. अंक दुसऱ्या दिवशी हातीं आल्याबरोबर तो लेख माझ्या दृष्टीस पडला. लेख वाचतांच मी सर्दच झालों. कॉंग्रेस आणि जमनालालजींवर आम्हीं खूप टीका करीत होतों; पण ती राजकीय टीका होती. त्या टीकेनें प्रतिपक्षाला कितीहि राग आला तरी तो आमचें कांहीहि वाकडें करूं शकत नव्हता; पण जे आरोप आम्ही कधीहि प्रसिद्ध करूं शकलो नसतों ते प्रतिपक्षावर करून त्याची बदनामी करणें असभ्यपणाचें नव्हे तर स्वतःच्या गळ्याला स्वतःच फांस लावून त्यांचीं टोंकें प्रतिपक्षाच्या हातीं देण्यासारखें होतें. नकळत कां होईना, हा मूर्खपणा आमच्या हातून झाला होता. तेव्हा आपली चूक प्रांजळपणें कबूल करणें हें सभ्य गृहस्थ म्हणून आमचें कर्तव्य होतेंच. पण पुढे कांही खटला झाला तर आमची बाजू बळकट करण्याकरतांहि तें करणें आवश्यक होतें. ताबडतोब त्याच दिवशीं आम्ही श्री. जमनालालजींना एक पत्र लिहून हा प्रकार चुकून झाल्याचें कळविलें

आणि त्यांचें या प्रकरणासंबंधीचें जें कांही म्हणणें असेल तें पुढल्या अंकांत छापण्याकरिता पाठविण्याची विनंती केली. तिसऱ्या दिवशीं त्यांच्या वकिलाची नोटीस आली आणि आमच्यावर फिर्यादहि दाखल झाली. मात्र त्यांच्या नोटिशीने किंवा ते खटला भरणार म्हणून भिऊन नव्हे, तर त्यांची नोटीस मिळण्याआधी आम्ही आमची चूक कबूल करणारें पत्र धाडलें होतें ही गोष्ट पत्रावरच्या पोस्टाच्या शिक्क्यांनी सिद्ध होण्यासारखी होती. तिचा आम्हाला फार उपयोग झाला. आम्ही दिलगिरी व्यक्त करायला तयार होतों, माफी मागायची आमची मुळीच तयारी नव्हती. पुष्कळ घासाघीस झाली, तारखा पडल्या; पण शेवटीं दिलगिरी पुरेशी आहे, असें कोर्टालाहि पटलें आणि फिर्यादीनेहि तेवढ्यावर भागवून घेतलें.

'चित्रा'मध्यें एकदा कुठल्या तरी केशवर्धक तेलाची जाहिरात आली होती. तिच्यांत "कु. ...(नांव) ... (आडनांव) ... हिला पडलेलें टक्कल साफ भरून आलें!" अशा प्रकारचा कांहीतरी मजकूर जाड टाइपांत होता. खाली अर्थात् तेलाचें नांव, गुण, किंमत, पत्ता वगैरे संबंधीचा इतर मजकूर होता. 'कु. ...' हें एक काल्पनिक नांव जाहिरातदारांनी दिलें होतें आणि आमचीहि अर्थात् तशीच कल्पना होती; पण जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर दोन-तीन दिवसांनी आमच्यावर शिव्यांचा वर्षाव करणारें आणि एकाहून एक गंभीर धमक्या देणारें एका गृहस्थाचें पत्र आम्हाला आलें. दक्षिणेकडल्या कोठल्यातरी संस्थानांतला तो गृहस्थ होता आणि त्याच्या मुलीचें नांव तेंच होतें. त्याच्या मुलीला मुळीच टक्कल नव्हते, चांगले भरदार केस होते. जाहिरातदाराने एक काल्पनिक नांव दिलें होतें. त्याला किंवा आम्हाला खरोखर या नांवाचें कुणी माणूस असेल अशी मुळीच कल्पना नव्हती, वगैरे वगैरे आम्ही त्या गृहस्थाला लिहिलें. कांही दिवसांनी ती जाहिरात बंद झाली आणि त्या गृहस्थानेहि कांही केलें नाही.

आपल्या मुलीची बदनामी झाली म्हणून नुकसानभरपाईची फिर्याद त्या गृहस्थाला आमच्यावर करतां आली असती. मुद्दाम केलेली सहेतुक बदनामी नव्हती हें सिद्ध झालें असतें तर फौजदारी खटला आणि दंड किंवा तुरुंगवास भोगावा लागला नसता; पण दिवाणी खटला होऊन नुकसानभरपाई आम्हाला द्यावी लागली असती.

या बदनामीच्या कायद्याची पुष्कळांना पुरेशी कल्पना नाही. जाणून बजून बदनामी केल्याचें सिद्ध झाल्यास फौजदारी आणि दिवाणी दोन्ही शिक्षा होतात. पण लेखक, नाटककार, कादम्बरीकार, चित्रपट-निर्माते यांच्यापैकीं कुणी एखाद्याने काल्पनिक नांवाचें एखादें दुर्गुणी पात्र रंगविलें आणि खरो-खरच त्या नांवाचें, तसेंच दिसणारें व इतर बाबतींतहि बरेंचसें साम्य असलेलें एखादें माणूस निघालें, तर त्यांच्या ध्यानींमनीं कांही नसल्याचें सिद्ध झालें, तरी योग्य नुकसानभरपाई द्यावीच लागते. विडी ओढतांना बाजूला फेकलेली काडी एखाद्याच्या घरावर पडून तें जळून खाक झालें, तर काडी फेंकणाराचा आग लावण्याचा हेतु नसला तरी त्याच्या हातून ज्याचें नुकसान झालें त्याची भरपाई त्याने केलीच पाहिजे. हेतु सिद्ध झाल्यास भरपाई देऊन आणखी तुरुंगांत खडी फोडावी लागेल इतकेंच. " मॉं व्हेदो " या चित्रपटांत चॅपलीनने बायका मारून विम्याचे पैसे मिळविणाऱ्या एका कारकुनाचें चित्र रंगविलें आहे. पॅरिसमध्यें त्याच नांवाचा, त्याच वयाचा एक कारकून निघाल्याची आणि कित्येक लाख फ्रॅंकची नुकसान-भरपाई त्याने चॅपलीनकडे मागितल्याची बातमी कुठेतरी वाचल्याचें आठवतें.

वृत्तपत्राच्या संपादकाला सर्वशक्तिमान समजन म्हणा किंवा कोणतें गाऱ्हाणें वर्तमानपत्रांतून मांडावयाचें आणि कोणतें मांडावयाचें नाही, याची कांहीच कल्पना नसल्यामुळे म्हणा, कांही भाबडे वाचक संपादकाला मजेदार पत्रें पाठवितात. एकदा एका मुलीने अमक्या अमक्या तरुणाने मला विवाहाचें वचन देऊन फसविलें आहे आणि आता तो दुसऱ्या एका मुलीबरोबर फिरतो. तेव्हा तुमच्या साप्ताहिकांत त्या दोघांची चांगली खरडपट्टी काढा असें लिहून त्या मुलाचें आणि दुसऱ्या मुलीचें नांव, गाव, पत्ता सर्व कांही कळविलें होतें.

असाच प्रकार माझ्या ओळखीच्या एका वृद्ध गृहस्थानेंहि केला होता. " कांही पाहुणे वर्षातून तीन-चार वेळां येतात आणि घरांत गोंधळ घालतात, काय करावें मला सुचत नाही. गांधी, स्टालिन, चर्चिल यांच्यासारख्या मोठमोठ्या लोकांविरुद्ध तुम्ही इतकें कडक लिहितां. तेव्हा एकदा या पाहुण्यां-विरुद्ध चांगलें सणसणीत लिहा; म्हणजे तरी त्यांना कळेल, " अशी या गृहस्थानें विनंती केली होती.

● ● ●

१९

# उत्सवमूर्ति

"तुम्हाला अनेक प्रकारचीं माणसं भेटतात. त्यांत कांहीं वल्लीहि भेटत असतीलच," असा प्रश्न अनेक वेळां अनेक लोक मला विचारतात. तेव्हा अर्थात्, 'हो' असं उत्तर मी देतों; पण अनेक प्रकारच्या वल्लींत कोणी एक विशेष वल्ली अशा वेळीं माझ्या डोळयासमोर उभी राहात असेल तर ती उत्सवमूर्तीची. माणसांच्या अनेक व्याख्या आहेत. माणूस हा समाज करून राहाणारा प्राणी आहे, हसणारा प्राणी आहे, माणूस विवेकशील प्राणी आहे, तसाच माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे, हीहि व्याख्या आपण लक्षांत ठेवली पाहिजे. कांही माणसं वाचिवीर असतात; तर कांही माणसं कृतिवीर असतात. त्याचप्रमाणें उत्सव सर्वांनाच हवेसे वाटत असले तरी सर्वांनाच उत्सव जमवून आणतां येत नाहीत. कांही उत्सव जमवून आणणारे असतात. वाचिवीर फार नि कृतिवीर थोडे तसाच थोडाफार हा प्रकार आहे. उत्सव जमवून आणणारे थोडे आणि उत्सवासाठी जमणारे फार. हे जे जमवून आणणारे त्यांनाच मी उत्सवमूर्ति म्हणतों. खूप माणसं जमवावीं आणि खूप कांही तरी करावं, असं या उत्सवमूर्तींना वाटतं. कांही तरी करतां बऱ्याच वेळां कांही तरीच होतं, आणि मग मात्र मानवजातीसाठी निःस्वार्थपणें हाडाचीं काडं करणाऱ्या या वीरांना आपण 'वल्ली' म्हणतों.

माझ्या माहितींतील अशी एक मोठी वल्ली म्हणजे आमचे बापूमामा. सर्व कांही मोठ्या प्रमाणावर झालं पाहिजे, हें त्यांचं ब्रीद. लहान बारीक हे शब्दसुद्धां त्यांना आवडत नाहीत. मुंबईच्या उपनगरांतील एका शाळेचे ते हेडमास्तर आहेत. त्यांच्या शाळेंतल्या मुलांना खेळायला फारशी मोकळी जागा नाही. शाळेच्या इमारतीला लागूनच असलेली एक मोकळी जागा मालकानं विकायला काढली आहे, असं आमच्या बापूमामांना कळलं. मालक

७-८ हजार रुपये सांगत होता. शाळेजवळ ७-८ रुपयेहि शिल्लक नव्हते, पण असल्या लहान गोष्टींनी बापूमामा कधीच डगमगत नाहीत. आपण एक टोलेजंग नाट्यनृत्य संगीताचा कार्यक्रम करूं नि एका तडाख्यांत ७–८ हजार रुपये उभे करूं म्हणून बापूमामांनी जाहीर केलं. मुलांना खेळायला जागा घेऊन द्यायची हें सत्कार्य आहे. तेव्हा मोठमोठे कलावंत कार्यक्रमासाठी फुकट येतील आणि मुलांचे पालक आणि गावांतले लोक दहा-दहा, पांच-पांच रुपयांचीं हवीं तितकीं तिकिटं विकत घेतील. तिकिटं शिल्लक उरणार नाहीत, याबद्दल बापूमामांची खात्री होती.

चित्रपट-सृष्टींतल्या मोठमोठ्या नटनटी, मुंबईतल्या गायिका, नृत्याप्सरा वाद्यवादक–यांच्यासाठीं सुंदर विनंतीपत्रं मामांनी तयार केलीं. आपल्या पत्रावर ते बेहद्द खूष होते. 'हीं पत्रें वाचल्यावर कुणी नाही म्हणणं शक्यच नाही', ते मला म्हणाले. शाळेंतल्या एका मास्तरांनी हीं पत्र त्या त्या कलावंताच्या हातीं नेऊन दिली. ते मास्तर परत आल्यावर मामांनी विचारले 'काय काय म्हणाले हे लोक?' 'कुणी नाही म्हणालं नाही,' मास्तर म्हणाले, 'चांगलं काम आहे, आम्ही येण्याचा प्रयत्न करूं असं म्हणाले.' मामांनी लगेच कार्यक्रम-पत्रिका छापून टाकल्या. अमक्या चित्रपट-तारकेचा नाच, तमक्याच्या अभिनयछटा, अमकीचें गाणें, तमक्याचं सतारवादन. मधून मधून शाळेंतल्या मुलांमुलींचे संवाद, गाणीं, नाच, भाषणें वगैरे वगैरे असा तब्बल चार तासांचा कार्यक्रम होता. मोठमोठ्या ख्यातनाम नटनटींचीं, गायिकांचीं, व नर्तिकांचीं नांवं कार्यक्रम-पत्रिकेवर वाचल्यावर मामांनी म्हटल्याप्रमाणें खरोखरच पांच–पांच, दहा–दहा रुपयांच्या तिकिटासाठीं तोबा उडाला. 'नाही–संपली' म्हणतां म्हणतां मामांची पुरेवाट झाली. शाळेसाठी सातआठ हजार रुपये एका तडाख्यांत मिळणार, यांत शंकाच उरली नाही. कार्यक्रमांतल्या मुलांच्या एका नाटिकेंत मामा दाढीमिशीवाल्या म्हाताऱ्याचं काम स्वतः करणार होते.

उत्सवाचा दिवस उजाडला. संध्याकाळीं सहाला कार्यक्रम सुरू व्हावयाचे होते. पांचपासूनच मंडपांत गर्दी होऊं लागली. सहा वाजतां मंडप फुलून गला. पण मुंबईतल्या नटनटींचा किंवा गायक-नर्तिकांचा पत्ता नव्हता.

त्यांनीं एकदा 'येऊं' 'पाहूं' म्हटल्यानंतर आणखी कांहीं व्यवस्था करण्याची मामांना कांहींच आवश्यकता वाटली नव्हती. साडेसहा वाजले तरी कार्य-क्रमाचं कशालाच कांहीं चिन्ह दिसेना. तेव्हा श्रोत्यांत थोडी गडबड सुरू झाली. दाढीमिशा लावून बुवाच्या वेषांत मामा असल्यामुळे बाहेर येऊन त्यांना कांही सांगतां येईना. तरी पण पडद्याआडून मायक्रोफोनवरून लोकांना त्यांनी गर्जून सांगितलं, 'मोठमोठ्या मंडळींना यायला उशीर झालाय ही गोष्ट खरी आहे; पण तोपर्यंत मुलामुलींचे आणि स्थानिक कलावंतांचे कार्यक्रम सुरू होतील, ते आपण शांतचित्तानें ऐकून घ्यावे.' अशा तऱ्हेने सात वाजतां कार्यक्रम सुरू झाला.

कांही मुलांच्या आया-बहिणींना थोडंफार गातां येत होतं–त्यांना आग्रहानं रंगभूमीवर आणून मामांनी गायला बसविलं. आठ वाजले तरी पोरांचे संवाद, त्यांच्या आयांचीं गाणीं, मुलींचे नाच यापेक्षां दुसरं कांही नाही, जाहिरातींत चमकलेल्या मोठ्या एकाहि कालावंताचा पत्ता नाही हें पाहून प्रेक्षक संतापले आणि आरडाओरड करूं लागले. 'बापू मामा कुठं आहेत?' म्हणून कित्येकांनी मला विचारलं.

आंत जाऊन मीं मामांना म्हटलं, 'मामा, मामला फार गंभीर झालाय्. तुम्ही दिसलां तर लोक तुम्हाला खाऊन टाकतील. दाढीमिशा, कफनी न काढतां. तुमचा प्रवेश होण्यापूर्वीच बुवांच्या कपड्यांतच तुम्ही असेच्या असे घरीं जा. लोकांचं लक्षण ठीक नाही. तुम्ही बोलावलेला एकहि नट किंवा नटी आली नाही याचा अर्थ काय? लोकांनी तरी का रागावूं नये?'

'अरे माहीत आहेत तुझ लोक!' मामा गरजले, 'मीं सगळ्या नटनटींना बोलावलं होतं, ते आले नाहीत त्याला मी काय करूं? मी काय लोकांचे चार चव्वल लागतोंय की काय? लोकांसाठीच तरी मीं हें सर्व केलं'.

बापूमामा हें बोलताहेत तों बाहेरचा गलका फारच वाढला. तेव्हा दाढी-मिशा ओरबाडून काढून मामांनी फेकून दिल्या नि ते तसेच तडक रंगभमी-वर गेले. 'शांत रहा,' म्हणून लोकांना सांगून लोकांना त्यांनी दम भरायला सुरवात केली.

'हें काय माझ्या घरचं कार्य आहे काय? तुमचीं मुलं, तुमच्या मुलांसाठी शाळा नि तुमच्या मुलांसाठीच मोकळी खेळायला जागा घ्यायची. मग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३०९२५ दि: १।९।७


आरडाओरड कुणाविरुद्ध करतां ? नटनटी आले नाहीत त्याला मी काय करूं? त्यांना जाऊन विचारा हवं तर. कार्यक्रम कसा का होईना, पैसे भरपूर जमलेत. तुमच्याच मुलांना खेळायला जागा मिळेल आरडाओरड कसली करतां ? आता वंदेमातरम् होऊन कार्यक्रम समाप्त होईल ! ' मामांचं भाषण ऐकून लोक खरोखरच गप्प बसले, नि वंदेमातरम् होऊन कार्यक्रम समाप्त झाला. ' तुमच्या बापूमामांसारखे उत्सवमूर्ति पाहिले नाहीत, बुवा ! ' असं कित्येक लोक मला भेटले की म्हणतात.

कांही कां असेना, खूप माणसं जमवावीं नि आपण त्यांच्यासमोर कांहीतरी सेवा करावी, हीच बापूमामांची मनोमन इच्छा असते. केव्हा केव्हा त्यामुळे भलताच प्रसंग ओढवतो,—लोकांवर नि मामांवरहि !

मामांच्या नात्यांतले एक खूप म्हातारे गृहस्थ मृत्युशय्येवर होते. मामा त्यांना पाहायला गेले होते. म्हातारा शेवटची घटका मोजीत होता. घरांतल्या नि पहायला आलेल्या माणसांची खात्री होती की आता तास अर्ध्या तासांत म्हातारा राम म्हणणार. उत्साहमूर्ति मामा कुणाला कांही न बोलतां तेथून उठले ते तडक बाजारांत गेले. बांबू, कडबा वगैरे अंत्यविधीचं सामान त्यांनी खरेदी केलं. चार-चौघाना गोळा केलें, नि पहिला नंबर पटकावलेल्या विद्यार्थ्याच्या आवेशांत त्या नातेवाईकाच्या घराशीं आले. सुदैवाने ते घराच्या दाराशीं पोहोचायच्या आधींच तिथून बाहेर पडलेला कुणीतरी त्यांना भेटला, ' काय, आटोपला ना म्हातारा ? सगळं घेऊनच आलोय् मी,' मामा ऐटीत उद्गारले. तो माणूस विजेचा धक्का बसल्यासारखा चमकला. ' अहो, भलतंच काय केलंत ! ' तो म्हणाला, ' आताच डॉक्टर येऊन गेले. ते म्हणतात—आणखी दोन दिवस सहज काढील म्हातारा. कुणी पहायच्या आत मागं पळा हें सगळं घेऊन.' मामांना पळतां पळतां भुई थोडी झाली.

कुठहि गेलं तरी मामांना स्वस्थ बसवतच नाही. लोक जमविले पाहिजेत, कांहीतरी केलं पाहिजे, हा निदिध्यास त्यांना लागलेला असतो. एकदा हवा पालटण्याकरिता म्हणून कुठल्याशा खेडेगावीं ते जाऊन राहिले होते. तिथल्या लोकांसाठी तेवढ्या वेळांत त्यांनी व्याख्यानमाला सुरू केली, नि पहिलं व्याख्यान स्वत: देऊनहि टाकलं. ' लोक फारच ज्ञानपिपासू आहेत, आधुनिक मराठी वाङमयाबद्दल त्यांना अतिशय जिज्ञासा आहे, तेव्हा ' आजची लघुकथा

या विषयावर येथे येऊन तूं बोल,' असा तातडीचा निरोप त्यांनी मला पाठविला. शहराजवळचं खेडं होतं, तेव्हां कांही वाङमयप्रेमी लोक असतीलच, असं मलाहि वाटलं, नि व्याख्यानासाठी मी तिथं गेलों.

गावांतल्या शाळेच्या आवारांत व्याख्यानमालेची जागा होती. व्याख्यानाची वेळ संध्याकाळीं सहाची होती. बापूमामा पावणे सहालाच मला तिथे घेऊन गेले. शाळेच्या शिपायाखेरीज तिथं कुणी नव्हतं. सव्वासहाच्या सुमारास सातआठ लोक व्याख्यानासाठी आलेले दिसले. साडेसहाला श्रोत्यांची संख्या चाळीस-पन्नास झाली, तेव्हां व्याख्यान सुरूं करायला हरकत नाही, असं मामांनी तयार केलेले व्याख्यानमालेचे चिटणीस मला सांगूं लागले. श्रोत्यांचे चेहरे पाहतां ते शेतावर काम करणारे खेडुत दिसत होते. आजचीच काय, पण कालची, परवाची, कुठलीच लघुकथा त्यांनी स्वप्नांतहि पाहिलेली नव्हती, हें त्यांच्या चेहऱ्यावरून उघड दिसत होतं. त्यांच्यासमोर, वाङमय, लघुकथा या विषयांवर बोलायला कां म्हणून तुम्ही मला बोलावलंत असं मीं मामांना विचारलें, तेव्हा खेडुतांना सुसंस्कृत करण्याच्या पांढरपेशाच्या कर्तव्यावर ते मला व्याख्यान देऊं लागले. शेवटीं भूदानावर चार शब्द सांगून मी कशी तरी वेळ मारून नेली आणि नंतर उत्सवमूर्ति बापूमामांना साष्टांग नमस्कार घातला.

● ● ●

मराठी ग्रंथ सं..ा.य, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३०३२५ वि: निबंध
क्रमांक ११३२५ नों दि २१।७।७१



११५२४

# सरकार आणि साहित्यिक

सरकार आणि साहित्यिक यांचे संबंध कसे असावेत, असे मला कुणी विचारिले तर साहित्यिकाने सरकारसाठी कांहीएक करू नये, आणि सरकारने साहित्यिकांसाठी सर्व कांही करावे, असें मी म्हणेन. अर्थात् ही अगदी आदर्श व्यवस्था झाली; पण समाजाची आदर्श अवस्था कधीच नसते. त्यामुळे इतकी आदर्श-व्यवस्था कधीच होणें शक्य नाही. तेव्हा प्राप्त परिस्थितींत काय करणें शक्य आहे त्याचा विचार केला पाहिजे. समाजकल्याणाचे सर्वश्रेष्ठ राखणदार म्हणून कोणतेंहि सरकार (आधुनिक काळांतलें विशेषच) समाजाच्या इतर घटकांप्रमाणेंच साहित्यिकांवरहि नाना प्रकारचीं नियंत्रणे घालण्याचा प्रयत्न करते. साहित्याला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने नोकऱ्या, पारितोषिकें, मानसन्मानहि देतें. साहित्यिकाचा सरकारशीं संबंध या दोन मार्गांनी येतो. पैकी नियंत्रणाच्या बाबतींत राजद्रोह, जातीय तेढ, अश्लील प्रकाशन वगैरे सर्वसामान्य नागरिकांच्या बाबतींत जीं कायद्याची नियंत्रणें आहेत त्यांपेक्षा वेगळीं कोणतींच नियंत्रणें साहित्याच्या बाबतींत नसावीत. कथा, कविता, कादंबऱ्या किंवा नाटकांचीं पुस्तकें या बाबतींत वेगळीं नियंत्रणें नाहीतच; पण नाटकांच्या प्रयोगाबाबत मात्र आहेत. पोलीस खात्याकडे नाटकाचें हस्तलिखित किंवा पुस्तक प्रयोगाच्या आधीं द्यावें लागतें. सुप्रसिद्ध नाटककारांचें नवें नाटक पोलीस खात्यांतला सबइन्स्पेक्टर वाचतो, आणि तें समाज-कल्याणाच्या दृष्टीने योग्य आहे किंवा नाही हें ठरवितो! नाटककाराच्या नावाला भिऊन हें नाटक ठीक आहे, असें तो म्हणण्याचा काही तरी संभव आहे, पण अगदीं अप्रसिद्ध नव्या नाटककारांत एखादा भावी खाडिलकर किंवा उदयोन्मुख गडकरी असेल तर त्याची समाजकल्याणाच्या दृष्टीने योग्यता एक पोलीस अधिकारी कशी काय ठरवणार? प्रतिभाशाली लेखक समकालीनांच्या चार पावलें पुढेंच असतो. एकंदर समाजालासुद्धां त्याचीयोग्यता

पुष्कळ वेळां समजत नाही. समाज त्याच्याकडे दुर्लक्ष करतो; किंवा त्याचा छळ करतो. मग कट्टर स्थितिवादी अशा पोलीसखात्याला त्याची योग्यता काय समजणार? हजारों टाकाऊ नाटककारांत एखादाच भावी खाडिलकर किंवा उदयोन्मुख गडकरी असेल हें मला एकदम मान्य. पण संततिनियमनाच्या चळवळीबाबत तिचे सनातनी विरोधक जें म्हणतात तें साहित्याच्या बाबतींत मला सर्वस्वीं मान्य आहे. हजारों दुबळीं किंवा नालायक पोरें जन्माला येण्याचें टळत असेल; पण त्यांना टाळतांना एखादा भावी शिवाजी किंवा लोकमान्य तुम्ही जगांत येऊं देत नाही, हें विसरूं नका, असें तें म्हणतात. हजारों वाईट नाटकांचे प्रयोग झाले तरी हरकत नाही. लोक—म्हणजे समाजच त्याची छी: थू: करून ते बंद पाडतील; किंवा वर उल्लेखिलेले जे सर्वसामान्य कायदे आहेत त्यांचा उपयोग करून न्यायालयीन मार्गांनी सरकारने ते बंद पाडावे, पण मुळांतच प्रयोग होऊं न देण्याची सत्ता पोलीसखात्याला किंवा कुणालाच असतां कामा नये. हजारों बऱ्यावाईट नाटकांचे प्रयोग सर्रास होऊं लागले म्हणजेच रंगभूमि आणि नाट्यकला ऊर्जितावस्थेला येईल.

जें नियंत्रणाच्या संबंधीं तेंच उत्तेजनाबाबत. रंगभूमीला किंवा साहित्याला उत्तेजन देण्यासाठीं सरकार स्पर्धा करतें, पारितोषिकें देतें, नटनटींना सुवर्ण पदकें देतें, हें सर्व ठीक आहे. पण एवढ्याने उत्तम साहित्य किंवा उत्तम नाट्य निर्माण होत नाही. नाट्याच्या किंवा साहित्याच्या भरभराटीला पोषक अशी परिस्थिति सरकारने निर्माण केली पाहिजे ही परिस्थिति करमणुकीचा जीवघेणा कर उठवून, उत्तमोत्तम नाट्यमंदिरें बांधून आणि तीं माफक दराने सर्व प्रकारच्या बऱ्यावाईट, कोणत्याहि मताच्या नाटकांसाठी देऊन सरकारला निर्माण करतां येईल. साहित्याला उत्तेजन देण्याकरिता स्वायत्त, स्वतंत्र साहित्य संस्थांना संशोधनासाठी, प्रकाशनासाठी भरपूर आर्थिक साहाय्य संशोधनाच्या किंवा प्रकाशनाच्या विषयासंबंधीं कोणतीहि अट न घालतां, सरकारने दिलें पाहिजे. पारितोषिकें आणि मानसन्मान यांच्यासाठी साहित्यिकांची निवड करतांना सरकारी अधिकारी किंवा मंत्र्यांची लहर यांचें सहाय्य न घेतां या संस्थांचा सल्ला सरकारने मानला पाहिजे या संस्थांनी शिफारस केलेल्या असहाय्य, वयोवृद्ध आणि तपोवृद्ध साहित्यिकांना किंवा कलावंतांना मासिक किंवा वार्षिक सहाय्य द्यावयाचें तर भरपूर दिलें पाहिजे आणि तें देतांना

मानहानिकारक असें असतां कामा नये. अशा कलावंतांना साहाय्य करीत असतांना सरकार उपकार करीत नसून समाजाच्या वतीनें आपलें कर्तव्य करीत असते आणि ऋण फेडीत असते, हें सरकारी मंत्रि आणि त्यांचे नोकरशहा जितक्या लवकर ध्यानांत घेतील तितकें बरें. अमुक पक्षाचें आज सरकार आहे, त्यालाच उद्देशून मी म्हणत नाही. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचें सरकार महाराष्ट्रांत झालें किंवा दिल्लीला सोशालिस्ट सरकार झालें तरी त्यांनाहि मला एकहि शब्द न बदलतां हेंच सांगावयाचें आहे.

सरकारी नोकऱ्या किंवा सरकारी पारितोषिकें घेणाऱ्या साहित्यिकांनी एका गोष्टीबाबत डोळ्यांत तेल घालून काळजी घेतली पाहिजे. नोकरी टिकविण्याकरितां आपल्या साहित्यिक मूल्यांना किंवा मतांना मुरड घालावी लागत असेल, तर अशी नोकरी करीत राहणें म्हणजे ती साहित्यिक आत्महत्याच आहे. त्याचप्रमाणें आपण जें लिहिलेलें असेल त्याला पारितोषिक मिळालें तर उत्तमच, पण अमक्या प्रकारचें साहित्य लिहिलें तर अमुक सरकार किंवा अमुक सरकारी समिति पारितोषिक देईल म्हणून लेखणी उचलणें हा साहित्यद्रोह होय. अर्थात् एखादी देशहिताची सरकारी योजना एखाद्या साहित्यिकाला मनापासून आवडली, त्यानें तिच्यासंबंधी लिहिलें, आणि सरकारनें त्याला पारितोषिक दिलें, तर त्याला कुणीच दोष देणार नाही. केवळ पारितोषिकाच्या लोभानें कांही सरकारी गोष्टी कांही साहित्यिकांना केव्हा केव्हा आवडूं लागतात तें मात्र ठीक नाही. स्वातंत्र्य हा कोणत्याहि साहित्याचा किंवा कलेचा आत्मा आहे, आणि कोणत्याहि सरकारी नियंत्रणानें किंवा उत्तेजनानें या स्वातंत्र्याला बाधा येतां कामा नये.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक ३०५२५ वि: १७९७
९३२५ नों: दि: २१।५।५७

# घंटा कोणी बांधावी ?

[ मराठी वृत्तपत्र-सृष्टींत आज जरी राजकीय वा अन्य सामाजिक स्वरूपाचीं व्यंगचित्रें सर्रास दिसत असलीं तरी अशी परिस्थिति २५–३० वर्षांपूर्वी नव्हती. 'व्यंगचित्रें' ही एक उत्तम कला आहे. प्रा. अनंत काणेकर यांच्या कल्पनेंतून स्फुरलेलीं व सुप्रसिद्ध चित्रकार श्री. दलाल यांनीं रेखाटलेलीं राजकीय व्यंगचित्रें सुप्रसिद्ध आहेत. नमुन्यादाखल येथे एक व्यंगचित्र घेतलें आहे. ]

* * *




"सुडेटेन प्रान्त घेऊन माजलेल्या हिटलरनें म्युनिक करारानंतर सबंध चेकोस्लोव्हाकिया घशाखाली घातला आणि मग वेळ निघून गेल्या-नंतर हिटलरला कसा आवरावा म्हणून रशिया, पोलंड, फरान्स इत्यादि राष्ट्रांशीं चेंबर्लेन वाटाघाटी करूं लागला."

● ● ●

## काव्य

### चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर

निळ्या नभांवर गिरिराजींची काळिभोर आकृति,
उमटली चांदण्यांत मोडती;
काठच्या नारळी जोत्स्नेंतुनि रंगती;
नस्तांत झपूर्झा उर्मी या खेळती;
कांठास शुभ्र शुभ फेनहार अर्पिती !
नौका काळ्या ' डबुक डुबक ' या जळावरी डोलती;
मर्मरत ऊर्मि तयां चुंबिती !

वाळवंटि पसरल्या वाळुच्या लहरी लहरी किती !
हिऱ्यासम कण मधुनी चमकती !
युगयुगें घेउनी लोळण पायावरी,
गिरिकडे कशाची सागर विनती करी ?
गंभीर न बघतो वळुनि मुळीं हा गिरी !
दुःख गिळुनियां अंतरिं सिंधू फेसाळे परि वरी,
हांसतो निराश जणु वरिवरी !

चराचरावरि शुभ्र रुपेरी मोहन हें पसरलें,
मोहनें जीवभाव भारलें;
अस्मान वर्षतें शीत धवलता अशी;
नसनसांत थरके लहर थंड गोडशी
कुणि जवळ बसावें बिलगुनियां छातिशीं !
चांदरातीच्या कोंदणांत दिक्काल विसरुनी असें,
पडावे स्पर्शसुखी धुंदसें !

दिव्य कुणी यक्षिणी येउनी सौंदर्यक्षण असा,
अक्षयी ठसविल, का गोडसा !
चांदणें असेंच्या असें फुलुन राहिल,
गिरिपदीं स्थिरावुन राहिल सिंधूजल,
वक्षावर माझ्या मान तिची निश्चल !
भावि युगें विस्मयें पाहतिल कोरिव लेणें असें,
म्हणतिल 'झालें तरि हें कसें ?'

* * *

## चंदाराणी

निळ्या निळ्या आकाशांत
शोधाया आले नाथ
शुभ्र ढगांचा—
—मऊ पिसांचा
करुनि गालिचा,

जरा पहुडलें त्यावरतीं
घेण्याला क्षण विश्रांती
चैन मुळीं नच पडे परी;
तशीच फिरलें माघारी;
मेघनगांच्या घनकुहरीं
धुंडधुंडिलें किती तरी !

*  *  *

चपला येउनि मजजवळीं,
'शोधाया जाते' वदली
इथें पळाली,
तिथें भटकली,
पुन्हां चमकली;
चंचल परि त्या बालेला
तो कुठचा गवसायाला !

*  *  *

मग म्हटलें जावें आतां,
पाताळीं शोधित नाथा,
शोधुनि दमलें,
विकल जाहलें,
तेज पळालें;
दाटुनि आला मम ऊर
अश्रूंचा वाहे पूर !

*  *  *

जीवा भावाच्या सखया
तारा भेटाया आल्या
त्यामधल्या वदल्या कोणी,
'नका भिऊं, चंदाराणी !
जलधीमध्यें शिरतांना,
दिसला आम्हां रविराणा'
ऐकुनि त्यांच्या वचनाला,
किती उठल्या झणिं जाण्याला
    रविरायाला
    शोधायाला
    जलधितळाला,
उड्या पटापट त्या घेती
जीवाची सोडुनि भिती !

*    *    *

किती जाहलीं युगें तरी,
अशीच फिरतें पिशापरी,
प्रेमामृत जोंवरि जवळी,
आशा तोंवर ना सुटली !

*  *  *

## संध्या-संगीत

सिंधूचें मर्मर गीत
फेंसाळें कानीं शांत.
संध्येची पिवळी माया
रंगविते डोंगर-काया.
शुभ्र अभ्र दाटे गगनीं,
मोत्यांचें चढवुनि पाणी.
फिकट पांढरा रविराणा
मंद हांसला बुडतांना !
दडले मग पिवळे किरण
तरल निळ्या पाण्यांतून.
लेवुनि तें पिवळें तेज
जग गमलें यक्षिणी-कुंज !
मधुनि मधुनि जन जे फिरती
गूढ कुणी यक्षचि गमती !
पीत विरल वातावरणीं
जिव गेला वेडावोनी !
स्वप्नफुलें रंगित फुललीं;
दिवसाही स्वप्नें दिसलीं

नारळिच्या झाडांतून
रजनि बघे डोकावून.
रजनीची काळी काया
घट्ट हृदयिं आलिंगुनियां,
रजनी-रमणीच्या हृदयीं
दिवस-रमण विरुनी जाई !
काळवंडलीं हीं रानें,
झाडांचीं हिरवीं पानें.
आणिक त्या काळ्या छाया
माझ्या ही हृदयीं शिरल्या !
हृदयिं दाटली हुरहूर;
कां न कळे दुखती ऊर !

* * *

## सावल्यांचें गाणें.

तेजाचीं आम्हीं बाळें,
रूप जरी आमुचें काळें !
लहान वा कोणी मोठीं
ससेमिरा अमुचा पाठीं !
जनीं स्मशानीं कुठें तरी
अशी तरळतों पिशांपरी.

* *

मेघांच्या काळ्या पंक्ती
निळ्या नभीं जेव्हां फिरती,
राक्षसरूपांना धरुनी
सिंधूच्या पृष्ठावरुनी
मंद मंद आम्हीं फिरतों;
निळ्या जळा काळें करितों !

*  *  *

पीतारुण संध्या बघुनी
वंदन दीर्घ करूं पडुनी !
मग येई रजनीमाई
पदराखालिं अम्हां घेई.
चांदण्यांत अमुची माया
भुताटकी गमते हृदया.

*  *  *

पांढुरक्या तेजांतून
कुठें कुठें बसतों दडुन.
पांढुरक्या वाटेवरुनी
एकलेच फिरती कोणी,
लपत छपत पाठुनि त्यांच्या
फिरत असूं आम्हीं वेड्या !

*  *  *

पानांचें पसरुनि जाल
आणिक, पारंब्या लोल;
वर कोणी ध्यानस्थ बसे;
मंद अनिल त्या डुलवितसे.
मग अमुचीं रूपें डुलती;
बाळांना बागुल दिसती !

*   *   *

जुनाट हे पडके वाडे
पर्णहीन त्यांतिल झाडें
धवल चंद्रिका रंगवितें
आम्हीं मग त्यांतील भुतें !
जर का कुणि चुकुनी आला
वाटसरू रात्रीं मधला,
बघुनि विकट अमुचे चाळे
चरकुनि तो मागेंच वळे !

*   *   *

प्रेमस्थल अमुचें एक;
त्यासाठीं विसरुनि भूक,
दाहि दिशा मागुनि फिरणें
जीवाभावानें जपणें !
ही अमुची वेडी प्रीत
झिडकारा- मारा लाथ !

*  *  *

# चान्दरात

चान्दरात पसरिते पांढरी माया धरणीवरी;
लागली ओढ कशी अन्तरीं !
हा बालतरू गंभीर शान्तता धरी;
लेवुनी सुधेचें वल्कल अंगीं शिरीं,
कुणि शुचिर्भूत मुनि तपा जणूं आचरी !
केस पिंजुनी उभी निश्चला कोणी वेडीपिशी,
भासते छाया काळी तशी !

जलवल्यांचे तरल नृपेरी नूपुर पदिं बांधुनि,
खळखळत गुंग झरा नर्तनी.
पांढरा पारवा हुं हूं कोठें करी,
क्षण मंद वायुनें लता हले कांपरी,
जणुं शांतताच ही निःश्वसनातें करी !
लपत छपत विधुकिरण खेळती हिरव्या पानावरी;
लागली ओढ कशी अन्तरीं !

निळ्या, तांबड्या, हिरवट, पिवळ्या तेजाची सांडणी,
करितसे व्याधाची चांदणी

बेफाम पसरितें पंख हृदय-पांखरूं,
उडुनियां पाहतें अनंत अंबर भरूं !
या इवल्या देहीं कसें तया आवरूं !
चैन पडेना काय करूं—ही आग लागली उरीं,
लागली ओढ कशी अन्तरीं !

* * *

## माझें गाणें

वसुधामाई माझी जननी, हृदयिं तिच्या बिलगुन,
सदा मी जगालाच गाइन,
बाळांच्या गोंडस गालांचें चुंबन,
युवतीयुवकांचें सुगाढ आलिंगन,
वृद्धांच्या प्रेमळ अश्रूंचें सिंचन,
सारें माझ्या गानिं सांठवे घ्या, घ्या तें वांटुन;
सदा मी जगालाच गाइन.

प्रेमाचा मी सागर, आणिक वैराचा डोंगर
दयाळू आणिक अति निष्ठुर
अर्भकांवरी आपुलें शौर्य दावुन
अबलांना दुबळ्या जुलुमानें गांजुन,
सत्तेचे चाबुक गरिबांवर ओढुन,
अश्रु उधळिले जगतीं कोणी, त्यांना मी शापिन;
सदा मी जगालाच गाइन.

अज्ञानाच्या अमर्याद या दर्यावर भडकुन,
चाललें मानवताजीवन,
दैवाच्या लाटा येउनियां कोठुन
सवंगडी आपुले टाकितील उलथुन,
हें मनांत माझ्या राहि कसें डांचुन;
म्हणुनिच माझें विसरुनि 'मी' पण, प्रेमानें रंगुन
सदा मी जगालाच गाइन.

* * *

## कोळ्याचें गाणें

आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर, होडीला देइ ना ठरूं
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

हिरवं हिरवं पाचूवाणि जळ,
सफेत् फेसाचि वर् खळबळ,
माशावाणी काळजाची तळमळ
माझि होडी समिंदर, ओढी खालींवर पाण्यावर देइ ना ठरूं
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

तांबडं फुटे आभाळान्तरीं,
रक्तावाणी चमक् पाण्यावरी;
तुझ्या गालावर तसं काइतरी !
झाला खुळा समिंदर, नाजुक् होडीवर, लाटांचा धिंगा सुरू,
ग सजणे; होडीला बघतो धरूं !

सूर्यनारायण हंसतो वरी,
सोनं पिकलं दाहि दिशान्तरीं,
आणि माझ्याहि नवऱ्या उरीं !
आला हांसत् समिंदर, डुलत् फेसावर, होडिशीं गोष्टी करूं,
ग सजणे, होडीला बघतो धरूं !

गोऱ्या भाळीं तुझ्या लाल् चिरी
हिरव्या साडीला लालभडक धारी;
उरीं कसली ग गोड शिरशिरी ?
खुशी झाला समिंदर, त्याच्या उरावर, चाले होडी भुरुभुरू,
ग सजणे, वाऱ्यावर जणुं पांखरूं !

* * *

## लग्न-घरांतील स्वयंपाकिणींचें गाणें

### (१)

कुणि नाहीं ग कुणि नाहीं
आम्हाला पाहत बाई !
झोंपे मंडळि चोहिकडे
या ग आतां पुढें पुढें
थबकत थबकत
'हूं' 'चू' न करित
चोरुं गडे थोडें कांहीं;
कोणीही पाहत नाहीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ (वि:) ........ ........
क्रमांक .............................. नों: दि: ..............

या वरच्या माळ्यावरतीं
धान्याचीं भरलीं पोतीं;
जाउं तिथें निर्भय चित्तीं,
मारुं पसे वरच्यावरतीं
उडवुनि जर इकडे तिकडे
दाणे गोटे घाल गडे,
किंवा चोरुनि घेतांना
वाजवाल जर भांड्यांना,
जागी होउन
मग यजमानिण
फसेल सगळा बेत बरें !
चळूं नका देऊं नजरे.

(३)

एखादी अपुल्यामधुनी
या धंद्यांत नवी म्हणुनी
लज्जामूढा भीरुच ती
शंकित जर झाली चित्तीं,
तर समजावुनि
अथवा भिववुनि
धीट तिला बनवा बाई,
करूं नका उगिचच घाई,

(४)

आशा ज्या वस्तुचि चित्तीं
तीचि हळुच उचला वरतीं
डब्यांत जर थोडें असलें
घेउं नका बाई, सगळें;
मिळे म्हणोनी,
उगाच लुटुनी
यजमानिण जरि ती बाला,
करूं नका शंकित तिजला

(५)

जपून असले खेळ करूं
ओटिंत जिन्नस खूप भरूं
लागतां न कोणा वास
'हाय' म्हणुनि सोडूं श्वास
प्रभातकाळीं
नामनिराळीं
होउनियां आपण राहूं
लोकांच्या मौजा पाहूं !

* * *

## फांसावरून

हा प्रणाम भारतमाते
घे शेवटला बाळाचा । माय भू ।
ही थोडी प्रियतम माती
हृदयीं धरितों दो हातीं । घट्ट गे.
जरि असल्या चरणीं बेड्या
विसरशील का मज वेड्या । कधिं तरी ?
इतरांस
दुष्ट दैत्यांस
भासलों खास
जरी द्रोही मी - नाहलों तरी तव
प्रेमी । उत्कट !

मज नको स्वर्ग सुखधाम
चिंतीन सदा तव नाम । गोडसे.
मरणाची भीती कोणा ?
देशद्रोही षंढांना । भेंकडा !
देशार्थचि जन्मा आलों
देशार्थाचि स्वर्गा गेलों । हांसत
हे प्राण
देश निर्वाण
माय भूत्राण
कराया नाहीं—वेचिले जसें
लवलाहि । धिक् तया ।

दे जन्म हजारों मजला
स्वातंत्र्यास्तव लढण्याला । देशिं या
पाहतोंच डोळे भरुनी
रूप गे तुझें प्रिय जननी । एकदां !
बघुं नकोस केविलवाणी
मजकडे दीन नयनांनीं । देवते !
स्वातंत्र्य
दिव्य हा मंत्र
स्फुरवि जीर रक्त
तुझ्या बाळांचे–दिन पूर्ण
स्वातंत्र्याचे । जवळची !

या शेवटल्या घटिकेला
दिसतसे भावि तव काळ । मज गडे !
स्वातंत्र्याच्या उद्यानीं
फिरतांना दिसशी जननी । वैभवीं
करितांना तव प्रिय काज
देहास ठेवितों आज । धन्य मी !
पाहुनी
प्रेत मम कुणी
थरकला जनीं
देशभक्तीनें-तरि धन्य धन्य मम
मरणें । जाहलें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठ
अनुक्रम ........................ वि: REFBK-0011524

# प्रा. अनंत काणेकर यांचें प्रकाशित साहित्य

## काव्य

चांदरात व इतर कविता

## लघुनिबंध

पिकलीं पानें
शिंपले आणि मोती
तुटलेले तारे
उघड्या खिडक्या
विजेची वेल
पांढरीं शिडें

## लघुकथा

जागत्या छाया
मोरपिसें
दिव्यावरती अंधेर
काळी मेहुणी आणि इतर कथा

## नाटकें

निशिकान्ताची नवरी
फांस
घरकुल
पतंगाची दोरी
झुंज

## प्रवास लेखन

धुक्यांतून लाल ताऱ्यांकडे
आमची माती, आमचें आकाश
निळे डोंगर, तांबडी माती
सोनेरी उन्हांत, पांचूचीं बेटें
रक्ताचीं फुलें

## एकांकिका

धूर आणि इतर एकांकिका
सांबर व इतर एकांकिका

## परीनाट्य

सोनपरी–चांदपरी

## रूपक कथा

रुपेरी वाळू

## संकीर्ण

राखेंतील निखारे (लेखसंग्रह)
हिरवे कंदील (लेखसंग्रह)
बोलका ढलपा (भाषणें व लेख.)
रसेलनीति
अमेरिका (पुस्तिका)
समाजवादाचा फेरविचार (अनुवादित पुस्तिका)